Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १८/ २०१३** **दिनांक १४.११.२०१३**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सायंकाळी ०६.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दि.१४.११.२०१३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस/ वशी-०४/ ३६५६/२०१३, दिनांक १३ नोव्हेंबर, २०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दि.१४.११.२०१३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य

मा.श्री.आप्पासाहेब शिंदे,
उपकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत श्री.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य यांनी दूरध्वनीवरुन कळविले. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०८.१०.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.८९०** **दिनांक ०८.१०.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०२** **दिनांक १८.१०.२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.८९१** **दिनांक १८.१०.२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०३** **दिनांक २७.१०.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.८९२** **दिनांक २७.१०.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०४** **दिनांक ०४.११.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.८९३** **दिनांक ०४.११.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०५ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. जमाखर्च तक्ता माहे ऑगस्ट-२०१३**

माहे ऑगस्ट- २०१३ मधील जमा रु.४८,३६,६७,०५८/- आणि खर्च रु.१९,०९,३५,४९४/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे ऑगस्ट-२०१३ मधील रुपये ३,०१,४१५/- चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दि.३१.०८.२०१३ रु.९,७७,७८,८०,०३४/- चा तक्ता.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.८९४ (A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**०२. मासिक लिलाव विक्री अहवाल- ऑक्टोबर, २०१३.**

श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तु यांच्या विक्रीचा माहे ऑक्टोबर- २०१३ मधील रु.५,८७,५६५/- मात्र अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८९४ (B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**०३. पाणी तपासणी अहवाल माहे ऑक्टोबर, २०१३.**

माहे ऑक्टोबर- २०१३ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८९४ (C) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०६ व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा यांना मेंटेनन्सचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **१.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८/१०/२००८ चे सभेतील विषय नं.३६, निर्णय क्र.७९३ नुसार समाधी मंदीर व मंदीर परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या विविध उपाययोजना व अत्याधुनिक सुरक्षा साहित्याचे खरेदीस व त्याकामी येणारे रु.४.५ कोटीचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

**२.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८३ नुसार मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी नोईडा यांची सुरक्षा साहित्य पुरविणेबाबत निवड झालेली आहे.

**३.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१० चे सभेतील निर्णय क्र.५८४ नुसार सदरील सुरक्षा साहित्याचा दर्जा, गुणवत्ता, पुरवठा आदेशानुसार तपासणे, साहित्याची देखरेख व सुपरविजन करणेसाठी पुढील पाच वर्षासाठी ट्रायकलर कन्सलटंट, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**४.** जा.नं.एसएसएस/वशी-संरक्षण/५९५८/२०१० दि.१४/०४/२०१० ने मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा यांना सुरक्षा साहित्य पुरविणे व इन्स्टॉलेशन करुन देणेकामी वर्क ऑर्डर दिलेली आहे.

**५.** तसेच मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी नोईडा यांनी दि.०४/०९/२०१३ चे पत्राने पुढील कालावधीकरीता सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट मिळणेकामी पत्र दिलेले आहे.

वर्कऑर्डरमधील मे.व्हेन्टेज इंटिगेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोइडा यांनी पुरवठा करुन कार्यान्वीत केलेल्या सुरक्षा साहित्यापैकी खालील Annexure-A तपशिलाप्रमाणे साहित्याची AMC देणे आवश्यक आहे.

**Annexure - A. List of equipment for First Work Order**

| Sr. No | Work Order Serial No. | Description Of Work/ Item | Unit | Qty | Unit Rate | Total Price |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | Sony 26x Optical Zoom Outdoor PTZ Camera. | Nos | 10 | 191493 | 1914930 |
| 2 | 3 | Sony fixed high resolution IP camera. | Nos | 68 | 108999 | 7411932 |
| 3 | 13 | Hand Held Metal Detector. | Nos | 50 | 8955 | 447750 |
| 4 | 28 | 25mm Rigid/ Flexible PVC conduits | mtr | 840 | 35 | 29400 |
| 5 | 11 | Mutizone doorframe metal Detector | Nos | 11 | 472268 | 5194948 |
| 6 | 12 | weatherproof mutizone Doorframe metal detector | Nos | 4 | 648750 | 2595000 |
| 7 | 23 | UTP Cable CAT-6 | mtr | 4270 | 39 | 166530 |
| 8 | 30 | 6 c single mode 9/125 micron, 6 core fiber optic armored | mtr | 4167 | 45 | 187515 |
| 9 | 28 | 25mm Rigid/Flexible PVC conduits | mtr | 4180 | 35 | 146300 |
| 10 | 20 | Power cable-3 CORE UNARMOURED 1.5 sq mm | mtr | 1200 | 61 | 73200 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 11 | 20 | Power cable-3 CORE UNARMOURED 1.5 sq mm | mtr | 2032 | 61 | 123952 |
| 12 | 22 | Power cable-3 CORE UNARMOURED 2.5 sq mm | mtr | 2026 | 87 | 176262 |
| 13 | 24 | 6 u 19" Rack (Network rack) | Nos | 5 | 7250 | 36250 |
| 14 | 26 | 27U rack for main Control Room | Nos | 1 | 49500 | 49500 |
| 15 | 28 | 25mm Rigid/ Flexible PVC conduits | mtr | 350 | 35 | 12250 |
| 16 | 27 | Power Strip with 5 sockets. | Nos | 19 | 2550 | 48450 |
| 17 | 14 | Drop Arm tripod turn stile motorized locking mechanism 3*120 degree indexing. | Nos | 11 | 170100 | 1871100 |
| 18 | 15 | automatic boom vehicle barrier | Nos | 2 | 150300 | 300600 |
| 19 | 16 | supply of computers based (multi energy) X-ray baggage inspection system make rapiscan. | Nos | 2 | 2175500 | 4351000 |
| 20 | 8 | 24 port managed POE switch | Nos | 6 | 198250 | 1189500 |
| 21 | 9 | Main fiber switch for control room with 12 fiber port and 12 UTP copper ports managed Layer 2 configuration. | Nos | 1 | 692000 | 692000 |
| 22 | 10 | Gigabit single fiber port modules | Nos | 12 | 38500 | 462000 |
| 23 | 2 | Sony 18x optical zoom indoor PTZ Camera | Nos | 2 | 169539 | 339078 |
| 24 | 5 | Server for monitoring and recording, Analytics and storage of video streams from cameras. | Nos | 5 | 291668 | 1458340 |
| 25 | 6 | workstations with high resolution video cards for client software application. | Nos | 5 | 44500 | 222500 |
| 26 | 17 | 6 KVA Online UPS | Nos | 4 | 178650 | 714600 |
| 27 | 18 | 3 KVA Online UPS | Nos | 2 | 78450 | 156900 |
| 28 | 7 | 42' LCD Color Monitor | Nos | 5 | 61650 | 308250 |
| 29 | 24 | 6 u 19" Rack(Network rack) | Nos | 1 | 7250 | 7250 |
| 30 | 28 | 25mm Rigid/Flexible PVC conduits | mtr | 340 | 35 | 11900 |
| 31 | 4 | Sony Video management, monitoring & recording software with video analytics | Nos | 5 | 209862 | 1049310 |
| 32 | 22 | Power cable-3 CORE UNARMOURED 2.5 sq mm | mtr | 180 | 87 | 15660 |
| 33 | 28 | 25mm Rigid/ Flexible PVC conduits | mtr | 382 | 35 | 13370 |
| 34 | 31 | 24 port LIU with splice tray and sc coupler for single model fiber. | Nos | 14 | 16500 | 231000 |
| 35 | 32 | single mode fiber media converter with 10/100 Base T,RJ 45 Ethernet Port. | Nos | 14 | 7500 | 105000 |
| 36 | 33 | Fiber patch cord-2 mtr, sm to sm. | Nos | 52 | 670 | 34840 |
| 37 | 34 | Electrical Panel with MCB. | Nos | 11 | 39000 | 429000 |
| 38 | 35 | Outdoor Weather Proof Box | Nos | 15 | 8795 | 131925 |
| 39 | 23 | UTP Cable CAT-6 | Mtr | 610 | 39 | 23790 |
| **Total** | | | | | | **32733082** |

**Equipment list for Second work Order**

| Sr. No | Work Order Serial No. | Details Of Works/Items | Unit | Qty | Unit Rate | Total Price |
|---|---|---|---|---|---|---|

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6 | RG-11 Shielded Cable | mtr | 915 | 67 | 61305 |
| 2 | 14 | 4 zone power supply for em locks with in built battery charger & 12V 7 AH battery for backup. | Nos | 1 | 3250 | 3250 |
| 3 | 16 | Automatic fire detector system control plate.(Make GST/Agni) | Nos | 1 | 35000 | 35000 |
| 4 | 17 | Optical smoke detector with base plate.(Make system Sensor/Cooper/GST) | Nos | 5 | 6580 | 32900 |
| 5 | 18 | Manual call point with "Break Glass". | Nos | 2 | 3895 | 7790 |
| 6 | 19 | Hooters 120/db for alarm alert. | Nos | 2 | 2900 | 5800 |
| 7 | 5 | 10 or more mega pixel still shot web based camera for database portrait acquisition. | Nos. | 1 | 25000 | 25000 |
| 8 | 9 | Biometric face recognition based + RFID machine with TCP/IP Connectivity, Color LCD screen, inbuilt 2 cameras with night mode. | Nos | 1 | 167000 | 167000 |
| 9 | 10 | Motion sensor based exit switch. | Nos | 1 | 14500 | 14500 |
| 10 | 11 | single Leaf Electro magnetic lock with 600 Lbs strength. | Nos | 1 | 6950 | 6950 |
| 11 | 13 | LZ bracket for EM lock. | Nos | 1 | 1900 | 1900 |
| 12 | 2 | 42" LCD Colour monitor.(Make LG/Samsung/Sony) | Nos | 4 | 61650 | 246600 |
| 13 | 20 | Walkie -Talkie handsets frequency range of 350 MHz,10 pre-programmed channels-range of upto 1.5-2 kms. | Nos | 25 | 14000 | 350000 |
| 14 | 15 | Work station for time attendance & access management application & supervisor reporting. Make Acer/ HCL/ Wipro | Nos | 1 | 44500 | 44500 |
| 15 | 1 | High performance heavy duty Control room Servers for Face recognitions GUI applications with licensed Windows 64 Bit operating system. Make Acer/HP/IBM/DELL. | Nos. | 4 | 346500 | 1386000 |
| 16 | 12 | Licensed time attendance and access management software for daily, weekly, monthly reporting and log reports | Nos | 1 | 45000 | 45000 |
| 17 | 10 | Gigabit Single Fiber Port Modules | Nos | 2 | 38500 | 77000 |
| | | **Second work order Total** | | | | **2510495** |
| | | **+ First work order Total** | | | | **32733082** |
| **TOTAL equipment for consideration under AMC proposal** | | | | | | **35243577** |

तसेच सुरक्षा साहित्य कार्यान्वीत करणेकामी केलेले फर्निचर, इन्स्टॉलेशन व कमिश्नींग, मॅनेजमेंट खर्च, सिक्युरिटी इक्वीपमेंट गायडन्स खर्च, ट्रेनींग व हॅण्डओव्हर, इंजिनीयर पगार, सर्व्हीस टॅक्स, व्हीडीओ लायसन्स, सॉफ्टवेअर इत्यादी करीता झालेला खर्च AMC मध्ये येत नाही. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

**Annexure - B. First Work Order(Old Work Order)**

| Sr. No | Work Order Serial No. | Description Of Work /Item | Unit | Qty | Unit Rate | Total Price |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **Cameras** | | | | |
| 1 | 52 | Installation ,commissioning, and Integration of IP Video Monitoring Systems, Automated Barriers, Electronic Access Control & Lighting system. | 1 | 1 | 1590300 | 1590300 |
| 2 | 54 | Management-end to end project management | 1 | 1 | 580500 | 580500 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 55 | 21 working days*8 hours of usage guidance all the supply of security equipment and solution to the USERS at the Installation site. | 1 | 1 | 690300 | 690300 |
| 4 | 53 | Training and handover. | 1 | 1 | 238500 | 238500 |
| 5 | 56 | During two years of warranty period one qualified engineer along with four supporting technical persons shall be posted on regular basis at site for providing necessary support round the clock to the user. | 1 | 1 | 2592000 | 2592000 |
| | | **Toatal** | | | | **5691600** |

**Second work Order**

| Sr. No | Work Order Serial No. | Details Of Works/Items | Unit | Qty | Unit Rate | Total Price |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 21 | Service charges for Installation ,Implementation, Commissioning and end to end project management charges for new solutions and architectural designing charges for control room consoles and fixtures. | Job | 1 | 445000 | 445000 |
| 2 | 3 | Licensed Video scan 4 channel/camera Graphical user interface software for control room servers with live tracking and monitoring module, facial matching and analysis algorithm, reporting and log archiving module, Video searching modules, setup and health monitoring module. | | 3 | 282000 | 846000 |
| 3 | 4 | Master software with Graphical user interface for control room face recognition application with master photo database setup, database updation module, portrait acquisition module, and log module. | | 1 | 375000 | 375000 |
| 4 | 7 | Control Room rack fixtures and console for supporting 10 nos 42" LCD TVs and 10 servers with fan cooled encloses for servers, power strips in each server cabinet. | | 1 | 375000 | 375000 |
| 5 | 8 | PC Workstation storage and tables for sitting 5 operators with storage drawers and keyboard sliders for each operator. | | 1 | 225000 | 225000 |
| | | **Second Work Order Total** | | | | **2266000** |
| | | + **First Work Order Total** | | | | **5691600** |
| | | **Total Amount 1st and 2nd work order not for Warranty** | | | | **7957600** |

मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा यांना वर्कऑर्डर देतांना वर्क ऑर्डरमधील मुद्दा क्र.५६ नुसार प्रोजेक्ट पुर्ण झाल्यानंतर व्हेन्टेज यांचेकडून ०१ क्वॉलीफाईड इंजिनीयर व त्यांचे सोबतीला ०४ टेक्नीकल व्यक्ती ०२ वर्षाकरीता साईडवर मेन्टेनंन्सचे काम करणेकरीता पुरविणेबाबत देणेचे ठरलेले आहे. त्याकामी मे.व्हेन्टेज यांना दोन वर्षाकरीता रक्कम रु.२८,५८,९७६/- सर्व करांसह देण्याचे ठरलेले होते.

तसेच मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा व संस्थानमध्ये झालेल्या कराराचे मुद्दा क्र.१२ नुसार प्रोजेक्ट पुर्ण झालेचे तारखेपासून दोन वर्षाकरीता सुरक्षा साहित्याची गॅरंटी/ वॉरंटी देण्यात आलेली आहे. व्हेन्टेज यांनी प्रोजेक्ट पुर्ण व कार्यान्वीत करुन दि.१०/१०/२०११ रोजी संस्थानकडे हस्तांतरीत केलेला आहे. दि.१०/१०/२०११ पासून दोन वर्षाकरीता मे.व्हेन्टेज यांचा दोन वर्षाचा वॉरंटी/ गॅरंटीचा कार्यकाल हा दि.०९/१०/२०१३ रोजी संपृष्टात येत आहे. सुरक्षा साहित्य उभारणी व दोन वर्षाचे दुरुस्ती/ देखभालीचे काम मे. व्हेन्टेज यांनी केलेले असलेमुळे पुढील दोन/ चार वर्ष कालावधीसाठी त्यांना मेन्टेनंन्सचे काम देणे योग्य राहील असे नम्र मत आहे. त्यासाठी मे.व्हेन्टेज यांनी संदर्भ क्र.०५ नुसार पुढील दोन/ चार वर्षाचे कालावधीसाठी दुरुस्ती/ देखभाल, तसेच इंजिनीयर एका इंजिनीयरसाठी वार्षिक वेतन खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

**(अ)** Comprehensive Annual Maintenance Contract (AMC) मिळणेबाबत व्हेन्टेज यांचे मागणी प्रमाणे AMC कॉन्ट्रॅक्ट देणे झाल्यास खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| ०१. | एकुण प्रोजेक्ट किंमत | ४,५०,०१,१७७.०० |
| ०२. | AMC न देण्याच्या सुरक्षा साहित्याची किंमत | ७९,५७,६००.०० |
| ०३. | AMC देण्याच्या सुरक्षा साहित्याची किंमत | ३,५२,४३,५७७.०० |
| ०४. | प्रोजेक्ट किंमतीच्या १५% | ५२,८६,५३६.५५ |
| ०५. | सर्व्हीस टॅक्स १२.३६% | ६,५३,४१५.९१ |
| | **एकुण देय्य रक्कम** | **५९,३९,९५२.४६** |
| | **पुर्णांकित रक्कम रु.** | **५९,३९,९५२.००** |

**(ब)** एक इंजिनीयरकरीता एका वर्षासाठी रु.३,५०,०००/- + १२.३६% (४३,२६०/-) असे एकूण रु.३,९३,२६०/- खर्च येणार आहे. मेन्टेनंन्सचे कामाकरीता असे दोन इंजिनीयर घेणे झाल्यास एक वर्षाकरीता रु.७,८६,५२०/- खर्च येणार आहे.

अ + ब प्रमाणे मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा यांना कॉन्ट्रॅक्ट देणे झाल्यास (अ) प्रमाणे AMC कॉन्ट्रॅक्ट खर्च रु. ५९,३९,९५२/- + (ब) ७,८६,५२०/- (इंजिनीयर वेतन) = ६७,२६,४७२/- एक वर्षासाठी खर्च येणार आहे. सदरचा खर्च हा जादा होत असलेने, मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा यांना सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन चे प्रतिनीधी यांचेशी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये दर कमी करणेकामी समक्ष चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा हे दोन वर्षापासून करीत असलेल्या कामाचा अहवाल तयार करणेत यावा व सदरच्या सिस्टीममधील स्पेअर पार्ट किती वेळा नादुरुस्त झाले व त्यानंतर त्याची किती वेळामध्ये, दिवसामध्ये दुरुस्ती/ बदली करणेत आली, बॅग्स स्कॅनर दोन महिन्यांपासून बंद आहे, त्याचा करारानुसार किती कालावधी वाढतो याचा समावेश अहवालात असावा.**

**तसेच, याबाबत महाराष्ट्र शासनाच्या असलेल्या अटी/ शर्तीची व दरांची माहिती घेण्यात येऊन, सदर सिस्टीमच्या मेंटेनन्सचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत सविस्तर प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **साईआश्रम भाग ०१/ ०२ व संस्थानचे इतर इमारतीमध्ये सी सी टी व्ही कॅमेरा बसविणेकामी सुरक्षा कन्सल्टंट नेमणूकीसाठी आलेल्या निविदेतील दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्यानुसार निर्णय होऊन सुरक्षा कन्सल्टंटची नियुक्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग ०१/०२, श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती व इतर संस्थान संलग्न इमारती तसेच संस्थानचे महत्वाचे परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन सी.सी.टी.व्ही.कॅमेरे व इतर अनुषंगीक सुरक्षा साहित्य खरेदी करुन कार्यान्वीत करणेकामी तांत्रीक सुरक्षा सल्लागार नियुक्त करणे आवश्यक असल्याने संदर्भ क्र.०१ अन्वये दि.१७/०४/२०१२ रोजी महाराष्ट्र टाईम्स या वर्तमान पत्रात नाशिक, पुणे, मुंबई या ठिकाणी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. निवीदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.३०/०४/२०१२ अखेर पर्यंत ठेवण्यात आलेली होती.

उपरोक्त मुदतीअंती १) महेंद्रा स्पेशल सर्व्हीस ग्रुप,पुणे २) इंडियन इंडस्ट्रीअल सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि, दिल्ली ३) डिग्निटी आय.टी.कन्सल्टंट, पुणे ४) मे.डॉल्फिन, अहमदनगर अशा ०४ निविदा धारकांनी सुरक्षा कन्सल्टंट बाबत निविदा या कार्यालयाकडे सादर केलेल्या होत्या.सदरच्या निविदा संदर्भ क्र.०२ दि.०१/०५/२०१२ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये दि.१४/०७/२०१२ रोजी मा.त्रीसदस्सीय समितीचे सभेपुढे समक्षपणे उघडण्यात आल्या.परंतु निविदाधारकांनी निविदेच्या दरामध्ये एकत्रीत मानधन रकमेचा सर्व करांसहित स्पष्टपणे उल्लेख केलेला नसल्याने सदर निविदाधारकांना सर्व करांसहित एकत्रीत मानधनाची रक्कम पुढील १५ दिवसांत सुधारीत दरासहित सादर करावी असे सांगण्यात आले.

त्यानुसार संदर्भ क्र.०३ अन्वये दि.२९/०७/२०१२ रोजीचे मा.त्रीसदस्सीय समितीचे सभेपुढे उपरोक्त ०४ निविदाधारकांना बोलविण्यात आले.त्यांनी सुरक्षा कन्सल्टंन्सी बाबत सर्व करांसहित एकत्रीत मानधन रकमेची सुधारीत दरपत्रके पुन्हा सादर केली.सदरची सुधारीत दरपत्रके पुन्हा त्याच दिवशी समक्षपणे उघडण्यात आली. त्या सुधारीत दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्याच दिवशी सभेपुढे सादर करण्यात आला.त्यानंतर उपरोक्त निविदाकर्त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले.

१. निविदाधारकांनी दि.१४/०७/२०१२ सादर केलेल्या सुधारीत दरपत्रकानुसार तुलनात्मक तक्ता तयार करुन चर्चा/ वाटाघाटीमध्ये त्यांनी मान्य केलेले सर्व करांसहित दर त्याच तुलनात्मक तक्त्यात नमुद करण्यात आलेले आहे. सदरचा तुलनात्मक तक्ता अवलोकनार्थ सोबत जोडण्यात आलेला आहे.

२. दि.२९/०७/२०१२ रोजी निविदाधारकांचा तांत्रीक तुलनात्मक तक्ता तयार करुन तो अवलोकनार्थ सोबत जोडण्यात आलेला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**तरी उपरोक्त कामी चर्चा करणे करीता-**

अ) महेंद्रा स्पेशल सर्व्हीस ग्रुप,पुणे

ब) इंडियन इंडस्ट्रीअल सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि,दिल्ली

क) डिग्निटी आय.टी.कन्सल्टंट,पुणे

ड) मे.डॉल्फिन, अहमदनगर या ०४ निविदा धारकांनी मिटींगच्या दिवसी हजर राहाणे कामी दुरध्वनी व्दारे कळविता येईल.

साई आश्रम भाग ०१/०२ व संस्थानचे इतर परिसरासाठी सुरक्षा कन्सल्टंटची नियुक्ती करणे बाबतचे उपरोक्त दोन्ही तुलनात्मक तक्ते आपले अवलोकनार्थ व निर्णयास्तव सादर

**निर्णय क्र.८९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित कामी संस्थानचे पुर्वीचे कन्सल्टंट ट्रायकलर हे करत असतील तर त्यांना विचारणा करुन पहाण्यात यावी व उपरोक्त चारही कन्सल्टंटला सभेपुढे चर्चेसाठी बोलविणेत यावे.**

**तसेच, महाराष्ट्र शासनाच्या गृह मंत्रालयाकडे अशा प्रकारची मोठी कामे केलेली असतील अशा कन्सल्टंटला याकामी विचारणा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८** **संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेबाबत निविदा सादर केलेल्या कंत्राटदारांशी/ ठेकेदारांशी चर्चा वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७-०२-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३७ नुसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे यांची दि.०१-०४-२०११ पासून ते दि.३१-०३-२०१३ अखेर ०२ वर्षे कालावधीसाठी लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०३-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२११ नुसार अनुक्रमे **१)** मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि.,पुणे, **२)** मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी), **३)** मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, **४)** मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस अ‍ॅन्ड सिस्टम्स प्रा.लि.,पुणे व **५)** मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची दि.०१-०५-२०११ पासून ते दि.३०-०४-२०१३ अखेर ०२ वर्षे या कालावधीसाठी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे.

त्याप्रमाणे संबंधीत लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानला प्रतिदिनी व मंजुर संख्येनुसार कंत्राटी पध्दतीने खालीलप्रमाणे अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहेत.

| **अ. नं.** | **एजन्सीचे नांव** | **संबंधीत एजन्सीला नेमून दिलेला परिसर** | **पुरविणेत येणारी प्रतिदिनी कंत्राटी कर्मचारी संख्या** | | | **विभागांना दिलेल्या मंजुरी प्रमाणे कंत्राटी कर्मचारी संख्या** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अकुशल | कुशल | **एकुण** | अकुशल | कुशल | **एकुण** |
| १. | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे **(लेबर कॉन्ट्रॅक्टर)** | संस्थानचे सर्व संबंधीत विभाग | ९०४ | २८४ | **११८८** | ११२० | ४३१ | **१५५१** |
| २. | मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि., पुणे **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | हॉस्पीटल, द्वारावती धर्मशाळा इ.परिसर | १०६ | ०५ | **१११** | ११६ | ०५ | **१२१** |
| ३. | मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी) **(महाद्वार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | मंदिर व महाद्वार परिसर | ६० | २३ | **८३** | ८२ | ३४ | **११६** |
| ४. | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | मंदिर व मंदिर परिसर | ८४ | ०६ | **९०** | ९८ | ०६ | **१०४** |
| ५. | मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस अ‍ॅन्ड सिस्टम्स प्रा.लि., पुणे **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | नविन पिंपळवाडीरोड दर्शनलाईन, साई प्रसाद-०१ व ०२, प्रसादालय, साई आश्रम इ.परिसर | १८० | ०९ | **१८९** | ३९१ | २२ | **४१३** |
| ६. | मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | साईबाबा भक्तनिवासस्थान, वाहन व शैक्षणिक संकुल परिसर | ७२ | ०४ | **७६** | ७६ | ०४ | **८०** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| एकुण (२ ते ६) | ५०२ | ४७ | ५४९ | ७३३ | ७१ | ८३४ |
| एकुण (१ ते ६) | १४०६ | ३३१ | १७३७ | १८८३ | ५०२ | २३८५ |

सदर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे कामाची (कॉन्ट्रॅक्टची) मुदत अनुक्रमे दि.३१-०३-२०१३ व दि.३०-०४-२०१३ अखेर संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे पुढील ०३ वर्ष कालावधीसाठी संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी प्रचलित पध्दतीप्रमाणे नविन ठेकेदारांची/कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक होईपर्यंत मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई यांचे व्यतिरिक्त वरिल लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस/करारास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०२-२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६६ अन्वये मुदतवाढ देणेत आलेली असुन, त्याचप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार, अनुभवी सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील तीन वर्षे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची/ कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करणेसाठी दि.१९-०५-२०१३ रोजी विविध वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्दीस देऊन, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून "सिलबंद निविदा" मागविणेत आल्या होत्या. "सिलबंद निविदा" विक्रीची मुदत दि.२१-०५-२०१३ पासून ते दि.०१-०६-२०१३ पर्यंत अशी होती. तसेच "सिलबंद निविदा" स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.०३-०६-२०१३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार, अनुभवी सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून विक्री झालेल्या ३३ निविदांपैकी संस्थानचे मुंबई कार्यालयास-०६ व शिर्डी कार्यालयास-१३ अशा एकूण-१९ "सिलबंद निविदा" प्राप्त झालेल्या आहेत.

सदर प्राप्त झालेल्या १९ "सिलबंद निविदा" मा.कार्यकारी अधिकारी तथा सदस्य, मा.त्रिसदस्य समिती यांचे समक्ष दि.१५-०६-२०१३ रोजी उघणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला आहे. सदर तक्ता यासोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे. तसेच संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी निविदा सादर केलेल्या निविदाधारकांपैकी अ.नं.०४, ०७, ०९ व १५ अपात्र असलेमुळे त्यांचे व्यतिरिक्त ज्या निविदाधारकांची/ ठेकेदारांची वार्षिक उलाढाल किमान रूपये ०३ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे. अशाच पात्र ठेकेदारांना चर्चा/वाटाघाटीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१०-२०१३ रोजीचे सभेपुढे उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते.

"त्याप्रमाणे पात्र १५ ठेकेदारांना सभेसमोर बोलविणेत येऊन, सर्वांना त्यांचेवर असलेला आर्थिक बोजा व कायदेशीर उत्तरदायीत्वाची जाणीव करून देणेत आली. तसेच त्यांना संस्थानचे कामासंदर्भात व कर्मचारी पुरविणे संदर्भात सुचना देण्यात आल्या व निविदेत दिलेल्या दरामध्ये आणखी काही सुट देणार का, याबाबत ठेकेदारांना विचारणा करणेत आली.

संबंधीत ठेकेदारांपैकी कोणाला दर कमी करावयाचे असतील तर पुनश्य संधी म्हणून त्यांना बंद पाकीटामध्ये अंतीम दर देऊन पुढील सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत यावे." असा निर्णय पारीत झालेला आहे.

त्यास अनुसरून संस्थानला अ) सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी सोबतचे तक्त्यातील पात्र १३ ठेकेदारांना तसेच ब)संस्थानला अकुशल, कुशल कामगार पुरविणेकामी सोबतचे तक्त्यातील पात्र ११ ठेकेदारांना त्यांचे अंतिम दराचे बंद पाकीटासह चर्चा/वाटाघाटीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले आहे.

सबब, संबंधीत पात्र निविदाधारकांशी/ ठेकेदारांशी त्यांचे अंतिम दरांसंदर्भात चर्चा/ वाटाघाटी होऊन, पुढील ०३ वर्षे कालावधीसाठी नविन लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकीबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संबंधीत पात्र निविदाधारक/ ठेकेदार यांनी बंद पाकिटामध्ये दिलेले अंतीम दरांचे लिफाफे स्विकारणेत येऊन सभेपुढे सदर पाकिटे उघडण्यात आली असता, त्यामध्ये कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या रोजगारामध्ये तफावत दिसून आली. त्यामुळे उपस्थित ठेकेदारांना सभेने कर्मचाऱ्यांना सध्या मिळत असलेल्या रोजगारापेक्षा कमी रोजगार देता येणार नाही, कंत्राटी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन दराप्रमाणे व त्या नियमाप्रमाणे टॅक्स वगैरे सर्वांचे दर एकच राहतील फक्त सर्व्हिस चार्जेस वरच चर्चा/ वाटाघाटी केल्या जातील, त्यामुळे पुन्हा एकदा बंद पाकिटामध्ये फक्त सर्व्हिस चार्जचा दर देणेत यावा, याकामी त्यांचेकडून पुन्हा बंद पाकिटे घेण्यात यावी, असे उपरोक्त ठेकेदारांना सांगणेत आले.**

**तसेच, निविदाधारक/ ठेकेदारांनी सर्व्हिस चार्जची दिलेली बंद पाकिटे पुढील सभेसमोर उघडणेत येऊन संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेबाबतचा निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.०९** **साईआश्रम भाग-०१ येथे आर ब्लॉक इमारतीचे दुकान गाळयामध्ये स्टॉलकरीता पार्टीशन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (२) च्या खंड (ठ) अन्वये, "श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील," अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम भक्तनिवास या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. दि.११/०४/२०१३ पासून साई आश्रम भाग-०१ हा प्रकल्प साई भक्तांसाठी खुला करणेत आलेला आहे.साई आश्रम भाग-०१ येथील आर ब्लॉक इमारतीचे तळमजल्यावर ९.४५ मीटर x ४.५० मीटर यासाईजचा तीन शटर असलेला एक मोठा दुकान गाळा उपलब्ध आहे. त्याठिकाणी पार्टीशन टाकून एका दुकान गाळयामध्ये बुक स्टॉल सुरु करणेकामी मा. अध्यक्ष सो।, यांनी सूचना केल्या होत्या. प्रकाशने विभागाने दि.०३/०७/२०१३ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये इकडील विभागास ॲल्यु. पार्टीशन टाकून मिळणेबाबत कळविले होते. त्यानुसार इकडील विभागाचे दि.३०/०७/२०१३ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये सदर ठिकाणी ॲल्यु. पार्टीशन तयार करणेसाठी येणारे रु.३८,४७५/- मात्रचे खर्चास व सदरचे काम स्थानिक ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागवून करुन घेणेस मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार विहीत पध्दतीने स्थानिक ठेकेदार यांना दरपत्रक मागणी पत्र देऊन त्यांचेकडून दरपत्रके मागविणेत आली. त्यानुसार निम्नतम दरधारक ठेकेदार रविंद्र रबर प्रोडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर यांना याकामी कार्यादेश देऊन त्यांचेकडून सदरचे काम पूर्ण करुन घेण्यात आले आहे. त्याचे त्यांनी संस्थानला रु.३६,९८४/- मात्रचे बिल सादर केले होते. परंतू ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार रक्कम रु.३१,८७४/- मात्र इतके रकमेचे बिल अदा करणेत आले आहे.

**प्रस्ताव:-** उपरोक्त विषयांकीत कामी रु.३१,८७४/- मात्र इतका खर्च झालेला आहे. त्यास मा. व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय / मत:-** साई आश्रम भाग-०१ येथे बुक स्टॉल सुरु करणेपुर्वी सदरचे काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक होते. त्यामुळे मा. व्यवस्थापन समितीचे कार्योत्तर मान्यतेचे अपेक्षेवर सदरहु काम पूर्ण करुन घेणेत आले आहे.

तरी याकामी झालेल्या रु.३१,८७४/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **On Consignment Basis वरील Stent चे सम प्रमाणात वापराबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयोलॉजी विभागात लागणारे विविध प्रकारचे Stent साठी सन २०१२-१३ या वर्षाकरिता On Consignment Basis वर दि.२६/११/२०१२ रोजी एकुण १५ पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्यानुसार ते आपणास लागेल त्याप्रमाणे Stent चा पुरवठा करत आहेत.

केंद्र शासनाने सदर Stent च्या किंमती यांचे दि.२१/०२/२०१३ रोजीचे परिपत्रकान्वये दर कमी केलेले होते. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Type of Coronary Stents | | Ceiling Rate |
|---|---|---|---|
| 1. | DRUG ELUTING CORONARY STENTS | All DCGI and FDA approved Drug Eluting Stents<br>All DCGI and CE approved Drug Eluting Stents<br>All DCGI approved Drug Eluting Stents | Rs.25,000/- |
| 2. | BARE METAL CORONARY STENTS | COBALT Stents (including coated and other stents)<br>All DCGI and FDA approved<br>All DCGI and CE approved<br>All DCGI Approved | Rs.12,000/- |
| 3. | BARE METAL STAINLESS STELL STENTS | Rs. 10,000/- the rates were already notified vide OM of even number dated 7 th February 2013 | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



याकामी सर्व पुरवठाधारकांना दि.१७/०४/२०१३ चे मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे सदरील परिपत्रकातील दराप्रमाणे दर कमी करणेबाबत सांगण्यात आले होते, त्यानुसार पुरवठाधारकांशी चर्चा / वाटाघाटी होऊन खालील प्रमाणे निर्णय झालेला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कंपन्यांनी चर्चा वाटाघाटीत दर कमी केले तरी स्टेंट हॉस्पिटलमध्ये पोहोच करणेसाठी अनेक वेळा येणे-जाणे करावे लागते, यामुळे कंपन्यांना जास्त खर्च येतो. यासाठी पर्याय म्हणुन सध्या वापरत असलेल्या सर्व स्टेंटधारकांचे स्टेंट साधरणत: ५% पर्यंतच्या फरकाने कार्डीयालॉजीस्ट समान वापर करत असतील, तर सर्व पुरवठाधारक स्टेंटचे दर कमी करुन देण्यास तयार आहेत, अशी माहिती पुरवठाधारकांनी दिली. यावर कार्डीयालॉजीस्ट यांचेबरोबर समक्ष चर्चा करुन सध्या वापरत असलेल्या पुरवठाधारकांचे स्टेंटस् समान वापरण्यात येतील, असे सांगीतले. प्रसंगी माहे डिसेंबर २०१२ ते मार्च २०१३ कालावधीतील स्टेन्ट वापराचा तक्ता सर्वांना पुरविण्यात आला. चर्चा वाटाघाटीअंती या पुरवठाधारकांचे स्टेंटस् साधरणत: ५% पर्यंतच्या फरकाने वापरण्यात यावे, याबाबत वैद्यकिय संचालक यांनी त्रैमासिक आढावा घेऊन नियंत्रण ठेवावे व CGHS Circular/ २१/०२/२०१३ मध्ये नमुद केलेले सर्व करांसहीत दर रु.२५,०००/-, १२,०००/-, १०,०००/- हे दि.१८/०४/२०१३ पासुन लागु करण्यास मान्यता देण्यात आली.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी दि.१८/०४/२०१३ पासुन करणेबाबत दि.१८/०४/२०१३ परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. वरील ठरावानुसार दि.१८/०४/२०१३ ते दि.१८/०७/२०१३ या तीन महिन्यात वापरलेल्या Stent चा तपशील कॅथलॅब विभागाकडुन प्राप्त झालेला आहे. तो सोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे. तसेच सदर वापराबाबत डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांना दि.२५/०७/२०१३ रोजीचे पत्रान्वये वापरण्यामध्ये असलेल्या तफावतीबाबत विचारणा करण्यात आलेली होती. त्यावर दोन्ही डॉक्टरांनी त्यांचा अभिप्राय दिलेला आहे.

डॉ. हरिष बजाज -

We have 26 different types of Stents which have various characteristics line. there is variation in flexibility of balloon, thickness of Stent struts, composition of metal, opening profile of balloon, scientific data done etc. hence they all are not same.

Even lesions or stenos is where they are used in different line location (Ostial/ Bifurcation) Length, tortuosity, Calcification, size (Diameter), CTO hence not all stents are suitable for all types of lesion.
Also note availability of particular brand of stent is a major issue which limits the equal usage of all stents.

Total Stents used were 1148 & Total Balloons used were 425 Re usage of Balloon is high hence it is very cost effective to Sansthan hospital.

It is our request not to keep all brands of balloon/ Stents and limit the number of them in different category, which would help to match the numbers in range of 10-20% variation.

डॉ. गौरव वर्मा -

1) Each & every Stent & Balloon have different frame work, different track ability different compliance and results.
2) Balloon are made for different lesion hence they have to be used accordingly to there merits like special CTO balloons are only for 100 % chronic occlusion some chip balloon do not cross there thickness lesion because of tough material and super fine balloon like 1.1 mm are selectively made by few Companies only.
3) There is a big problem of stock in our medical store. All sizes are not available at (you can personality check for it) any time.
4) some special sizes of stents are made by few companies only like 1) 2 mm size stent are available only in Yukon and Pro kinetic, 2) 2.25 are available in pronova & albuminius, Genx sync, biomime make it but they do not have supply to our store.
5) 43 mm and 48 mm size stents are available only in Pronova.
Because of these reasons we are unable to match the hombres hence please consider our difficulty and we are ready to comply with whatever decision you take.

प्रत्येक वर्षी आपण वेगवेगळया प्रकारचे व वेगवेगळया कंपनींचे Stent ठेवत असतो कारण सर्वच कंपन्यांच्या सर्वच साईज येत नाही. त्यामुळे प्रत्येक प्रकारामध्ये कमीतकमी ५ ते ६ कंपन्यांचे Stent हे ठेवावे लागतात. त्यामुळे कुठल्याही कंपनीचे साईज वेळेत उपलब्ध होऊ शकते. ठराविक कंपनीचे Stent ठेवल्यास वेळेवर साईज उपलब्ध होणार नाही. तसेच प्रत्येक पुरवठाधारक हा जास्तीत जास्त प्रत्येक साईजचे ४ ते ५ नग ठेवत असतात. एका दिवशी सदर साईज वापरल्या गेल्यातर दैनंदिन

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कामकाजात मोठी अडचण येऊ शकते. शिवाय ठराविक कंपन्यांची Monopoly पण होऊ शकते. त्यामुळे ठराविक कंपनीचे Stent ठेवणे उचित होणार नाही.

औषध भांडारात बऱ्याच वेळा बऱ्याच साईजे्स उपलब्ध नाही असे होत नाही. फक्त काही वेळा काही कंपनीच्या ठराविक साईज उपलब्ध नसतात. परंतु त्या फार कमी कालावधीसाठी असतात नंतर त्या साईज उपलब्ध होतात. परंतु जी पाहिजे ती साईज ही कोणत्या न कोणत्या कंपनीची उपलब्ध असते पण जर डॉक्टरांनीच ठराविक कंपनीची मागणी केली तर साईज कमी पडु शकतात.

तसेच काही कंपनीचे Stent मागील ४ ते ५ महिन्यात चांगल्या प्रकारे वापरत होते. परंतु त्यानंतर उपलब्ध असून देखील वापरले गेले नाही असे देखील होते. वास्तविक सदर कंपन्यांचे साईज उपलब्ध असतांना देखील वापरणे गरजेचे आहे.

काही ठराविक साईज हया ठराविक कंपन्यांकडे असतात म्हणूनच मा व्यवस्थापन समिती सभेत ५ ते १०% कमी किवा जास्त प्रमाणात वापर करावा असे धोरण ठरलेले आहे.

परंतु मागील तीन महिन्याच्या अहवाल बघता काही साईजस् हया खुप कमी प्रमाणात तर काही खुप जास्त प्रमाणात वापरलेचे दिसून येते.

वार्षीक खरेदीमध्ये निवड करतांनी कॅथलॅब विभागातील डॉक्टरांनीच कंपन्यांची शिफारस केलेली असते व त्याच कंपन्यांचे Stent/ Balloon वार्षीक खरेदी मध्ये निवडलेले असतात. परंतु तेच पुन्हा फक्त विशिष्ट कंपनीचे Stent/ Balloon जास्त प्रमाणात तर काही कमी प्रमाणात वापरतात ही मोठी विसंगती आहे. शिवाय उपलब्ध Stent बद्दल कुठलीही तांत्रीक तक्रार कॅथलॅब विभागाकडुन आज तागायत आलेली नाही. उपभांडार विभागात एकाच साईजचे दोन ते तीन प्रकारच्या कंपनीचे Stent पाहिजे त्या साईजमध्ये बऱ्याच वेळा उपलब्ध असतात परंतु कॅथलॅब मध्ये केसेस चालू असतांना कॅथलॅब विभागातील कर्मचारी फक्त विशिष्ट कंपनीच्याच Stent ची मागणी करत असतात असा आज पर्यंतचा अनुभव आहे.

तसेच दि.१८/०४/२०१३ चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयापासून असे निदर्शनास आले आहे की, Xience V व Xience Prime Stent चा पेमेंटच्या रुग्णांना जास्तीत जास्त प्रमाणात वापर झाल्याचे दिसते. जो यापुर्वी फारच कमी प्रमाणात असे

दि.२६/११/२०१२ ते दि.१८/०४/२०१३ अखेर रु. ९३,०००/- असलेल्या Xience Prime = ३८ नग व रु. ५९,४००/- असलेल्या Xience V=१३ नग तसेच दि.१८/४/२०१३ ते दि.३१/०८/२०१३ अखेर Xience Prime=४८ नग व Xience V=७९ नग तेव्हा डॉक्टरांनीच ५ ते १०% पर्यंत कमी जास्त प्रमाणात Stent वापरणेस तरी काही अडचण दिसुन येत नाही असे मत आहे.

माहितीस्तव सादर.

**निर्णय क्र.८९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.११ श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी Semi Automatic Rotary खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.१२/०६/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये ०१ नग Semi Automatic Rotary Microtome ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Microtome हे सन २००६ साली M/s. Sanjay Scientific Co., Mumbai यांचेकडुन रक्कम रु. १९६४२/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले असून ते व्यवस्थित काम देत नाही, तसेच कंपनीने त्यांचे Production बंद केलेले असून दुरुस्तीसाठी त्यांचे स्पेअर्स पार्टस् देखील उपलब्ध होत नाही. सध्या त्यांचेकडे असलेले मशिन हे Mannual असल्यामुळे Testing साठी वेळ लागतो व Proper Output मिळत नाही. तसेच सध्या रुग्णालयात पेशंटची संख्या वाढत आहे, त्यामुळे त्यांनी नवीन Semi Automatic Rotary Microtome ची मागणी केलेली आहे.

उपरोक्त Semi Automatic Rotary Microtome खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Labcon Scientific Instruments Pvt. Ltd., Mumbai यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि.२७/०६/२०१३ रोजीचे दरपत्रकानुसार खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Semi Automatic Rotary Microtome | 01 Nos. | 825525.00 | 825525.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **825525.00** |

**मागणी:-** श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभाग यांचे दि.१२/०६/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.२३/०९/२०१३) चे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** तरी वरीलप्रमाणे ०१ नग Semi Automatic Rotary Microtome विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ८२५५२५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९०० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी ०१ नग Semi Automatic Rotary Microtome विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु. ८,२५,५२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१२ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन २०१३-१४) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये सर्व वार्ड / विभागात दैनंदिन वापरासाठी लागणारे वार्षिक (सन २०१३ - २०१४) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी इ. दरवर्षी वार्षिक सर्व विभागाची वार्षिक मागणी घेऊन ती एकत्रीत करुन मा. व्यवस्थापन समिती सभेचे मान्यतेने विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेत येत असते. मागील वर्षी मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १४.०७.२०१२ चे निर्णय क्रमांक ५०९ अन्वये दोन्ही रुग्णालयांची मिळून रु. १८,५७,२९२/- ची छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करण्यात आली होती. सदर छपाई व कार्यालयीन स्टेशनरीकामी दि. २८.०३.२०१३ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले होते. सध्या सदर छपाई व कार्यालयीन स्टेशनरी संपत आलेली असून ती जास्तीत जास्त तीन महिने पुरु शकेल. त्यामुळे पुढील वर्षाचे वार्षिक छपाई करीता इकडील पत्र क्रं. ७०५ दि. ०८.०८.२०१३ रोजीचे परिपत्रकान्वये सर्व विभागांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड व विभागाकडून वार्षिक छपाई व कार्यालयीन स्टेशनरीची मागणी प्राप्त झालेली आहे. सदरची प्राप्त मागणी एकत्रित करुन त्याची होणारी एकूण मागणी व सध्या स्टोअरमध्ये असलेली शिल्लक व वापर / खप इ. बघून निव्वळ मागणी तयार करण्यात आली असून त्याचा तक्ता सोबत परिशिष्ठ अ व ब म्हणून सादर केला आहे.

गतवर्षाच्या तुनलेत या वर्षाच्या मागणीत वाढ झालेली आहे. त्याबाबत थोडक्यात कारणमीमांसा खालीलप्रमाणे-

१) अंर्तरुग्ण व बाहयरुग्ण व शस्त्रक्रीया यांचे तुलनेत मागील वर्षापेक्षा १० ते १५ टक्के रुग्णांत वाढ झालेली आहे.

२) गतवर्षीच्या तुलनेत यावर्षीच्या दरात वाढत्या महागाईमुळे (पेट्रोल,डिझेल व RAw मटेरियलच्या किंमती वाढलेल्या आहे.)

३) सदरची मागणीही अंदाजे १ वर्षा करिता असून त्यात कमी किंवा जास्त खप होऊ शकतो.

४) दोन्ही रुग्णालयात नेहमीच लागणारी छपाई त्याशिवाय काम करणे अशक्य होते. अशा आइटमची छपाई मागील वर्षी तुटवडा भासला होता. त्यामुळे या वर्षी सदर ॲटमची मागणी २५ ते ३० टक्के वाढीव धरली आहे. उदा. आय.पी.डी. फाईल, ओ.पी.डी. केसपेपर, सी.टी.स्कॅन व एम.आर.आय.बॅग, झेरॉक्स पेपर, रिपोर्ट पेपर व वार्ड मधील तपासणीसाठी लागणारे विविध प्रकारचे फॉर्म व रजिष्टर्स इ.

वरील कारणास्तंव मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी छपाईच्या तुलनेत छपाईची रक्कम वाढलेली आहे. त्याचा रक्कमेचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **विभागाचे नाव** | **एकूण रक्कम रु.** |
|---|---|---|
| **अ** | **छपाई** | |
| | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३१,७४,५८०.०० |
| | श्री साईनाथ रुग्णालय | १५,९३,०२५.०० |
| **ब ब)** | **कार्यालयीन स्टेशनरी** | |
| | श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय (सारखेच आयटम असल्याने एकत्रित मागणी) | ९,००,९२४.०० |
| **एकूण रक्कम रु.** | | **५६,६८,५२९.००** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त तपशिलाप्रमाणे छपाई करुन घेण्यास व कार्या. स्टेशनरी खरेदी करणेकामी अंदाजे रु. ५६,६८,५२९/- (अक्षरी रु. छपन्न लाख अडुसष्ठ हजार पाचशे एकोणतीस) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदरचे छपाई कामी येणाऱ्या अंदाजे रु. ५६,६८,५२९/- (अक्षरी रु. छपन्न लाख अडुसष्ठ हजार पाचशे एकोणतीस) चे खर्चाचा विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.९०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन २०१३-१४) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५६,६८,५२९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व त्यानंतरच कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३** **राजमाता जिजाऊ मदर्स ॲण्ड चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्युट्रिशीअन मिशन या संस्थेस आर्थिक मदत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती वंदना क्रिश्ना, डायरेक्टर जनरल, राजमाता जिजाऊ मदर चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड चाईल्ड डेव्हल्पमेंट डिपार्टमेंट, मुंबई यांनी दि. ०५/०४/२०१३ रोजीच्या पत्रान्वये कुपोषित बालकांसाठी संस्थानमार्फत आवश्यक ते साहित्य, खाद्यपदार्थ व फळे इत्यादी मोफत पुरविण्यासाठी कळविले आहे. उपरोक्त पत्रामध्ये दि. १३/०३/२०१३ रोजी सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी व संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी यांची यशदा, पुणे येथे झालेल्या सभेत कुपोषित बालकांसाठी व गर्भवती महिलांसाठी लागणारे खाद्यपदार्थ व साहित्य संस्थानमार्फत देणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल, असे सांगणेत आले होते.

त्यानुसार कुपोषण व बालविकास प्रस्तावावर चर्चा करणेसाठी दि. १७/४/२०१३ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सदर संस्थेचे व शासनाचे विविध स्तरावरील अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. सदर सभेमध्ये राजमाता जिजाऊ मदर चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड चाईल्ड डेव्हल्पमेंट डिपार्टमेंट, नवी मुंबई, यांचेमार्फत मिशनची वैशिष्ट्ये/भुमिका, कुपोषण निर्मुलनाची सद्यस्थिती, कुपोषण म्हणजे काय व ते मापण करण्याची पध्दत, तसेच मिशनचा प्रस्ताव/मागणी आणि कुपोषण व बालविकास यांचे कशा प्रकारे नियोजन करणेत येत आहे, याबाबतचे सादरीकरण सभेसमोर दाखविले. सदरचे मिशन नं. १ - सन २००५ ते २०१० व मिशन नं. २- सन २०११ ते २०१५ असे आहेत. यासाठी त्यांचे प्रस्तावित असलेले नियोजनाकामी येणारा खर्च त्यांनी सोबतचे तक्त्यामध्ये दर्शविलेला आहे. त्यातील **अ** मध्ये रु. २६.२९ कोटी **ब** मध्ये ३.५० कोटी **क** मध्ये रु. १७.२५ कोटी असा एकुण रु. ४७.०५ कोटी मात्र खर्च दर्शविलेला आहे. याकामी त्यांनी संस्थानकडून आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केली होती.

त्यानुसार दि. १७/४/२०१३ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितील विषय नं. १ निर्णय क्र. ३३८ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन,

**अ)** राजमाता जिजाऊ मदर-चाईल्ड हेल्थ न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड चाईल्ड डेव्हलपमेन्ट डिपार्टमेन्ट, नवी मुंबई या संस्थेला प्रस्तावित नियोजनासाठी महाराष्ट्र शासनाकडून किती निधी मिळाला आहे व किती मिळणार आहे. वजनकाटे (लहान मुले/ प्रौढांसाठी), Stadiometer, उंचीनुसार वजनाचे तक्ते सध्या किती उपलब्ध आहेत व किर्तीची आवश्यकता आहे, यांची निश्चित आकडेवारी मिळावी.

**ब)** राजीव गांधी योजनेअंतर्गत होणाऱ्या ह्रदय शस्त्रक्रियेस रु. १,५०,०००/- मात्र पेक्षा जास्त खर्च येणाऱ्या रुग्णांची नेमकी संख्या किती आहे, याची आकडेवारी देण्यात यावी. ज्या ठिकाणी अशा रुग्णांची संख्या जास्त आहे, अशा ठिकाणी संस्थानमार्फत शिबीर आयोजित करण्यात यावे, जेणेकरुन संस्थान आर्थिक मदत करु शकेल.

**क)** महाराष्ट्रातील गरोदर मातांची नोंदणी करणेकामी संगणकावर Software तयार करण्यात यावे. कुपोषित बालकांची संख्या कमी व्हावी याकरिता गरोदर मातांना प्रसुतीपुर्व तीन महिने अगोदरपासुन बाळाची वाढ योग्य क्षमतेने होणेसाठी, योग्य- प्रकारचा पुर्ण आहर देण्यात यावा. त्याचप्रमाणे नऊ महिन्यांपासुन चोविस महिन्यांपर्यंतची बालके कुपोषित होऊ नये, यासाठी त्यांना पुर्ण आहार देण्यात येतो. यास अनुसरुन प्रायोगिक तत्वावर आदिवाशी व दुष्काळी भागातील एखाद्या तालुक्याची निवड करुन, तेथे अशा प्रकारचा प्रयोग करण्यात आवा. तसेच संगणकावर Software नोंदणीद्वारे तेथे गरोदर माता लाभार्थी होत आहे, याची आकडेवारी उपलब्ध होईल व त्याभागातील बालकांवर देखरेख ठेऊन तेथील कुपोषित बालकांची संख्या लक्षात घेऊन तेथील उणिवा व अधिकच्या उपाययोजना करणे उचित होईल. याकरिता सदरची माहिती राजमाता जिजाऊ मदर चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड चाईल्ड

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



डेव्हल्पमेंट डिपार्टमेंट, नवी मुंबई यांचेकडून मिळवून प्रथमत: प्रायोगिक तत्वावर करण्यात येणाऱ्या तालुक्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे, यांची आकडेवारी व सविस्तर माहिती प्राप्त झालेनंतर सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

त्यास अनुसरुन राजमाता जिजाऊ मदर-चाईल्ड हेल्थ न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड चाईल्ड डेव्हलपमेन्ट डिपार्टमेन्ट, नवी मुंबई यांनी दि. ९/५/२०१३ रोजी प्रस्ताव सादर केला आहे.

परंतु सदर प्रस्तावामध्ये त्यांना प्रस्तावित नियोजनासाठी महाराष्ट्र शासनाकडून किती निधी मिळाला आहे, किती मिळणार आहे, वजनकाटे (लहान मुले/प्रौढांसाठी), Stadiometer, उंचीनुसार वजनाचे तक्ते सध्या किती उपलब्ध आहेत, राजीव गांधी योजनेअंतर्गत होणाऱ्या हृदय शस्त्रक्रियेस रु. १,५०,०००/- मात्र पेक्षा जास्त खर्च येणाऱ्या रुग्णांची नेमकी संख्या किती आहे व महाराष्ट्रातील गरोदर मातांची नोंदणी करणेकामी संगणकावर Software तसेच प्रायोगिक तत्वावर करण्यात येणाऱ्या तालुक्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे याबाबत दि. १७/४/२०१३ रोजी झालेल्या चर्चेप्रमाणे माहिती दिलेली नाही.

सदर प्रस्तावामध्ये त्यांनी त्यांचे मिशन करिता आवश्यक असलेले साहित्य व यावर येणारा खर्च नमुद केलेला आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

Proposal to strengthen critical services for addressing malnutrition in the state of Maharastra :

| Sr. No. | Paticular | Quantity required | Estimated cost per unit (Rs.) | Estimated budget (Rs.) |
|---|---|---|---|---|
| **A** | **Strenghen infrastructure at AWC s** | | | |
| 1 | Weighing scales (suspension type with pan for suspension preferable Salter) | 62112 | 1800.00 | 111,801,600.00 |
| 2 | Adult weighing scale | 88260 | 1000.00 | 88,260,000.00 |
| 3 | Stadiometer | 96801 | 350.00 | 33,880,350.00 |
| 4 | Weight for height charts | 96801 | 300.00 | 29,040,300.00 |
| **B** | **Strengthen services for children (not addressed though Govt.)** | | | |
| 1 | Heart surgeries for eligible children | - | - | 5000000 |
| 2 | Urban child Development Centres for SAM & MAM children from urban areas | 5000 | 2000.00 | 10,000,000.00 |
| **C** | **Focused interventions/ Innovations for high burden and drought hit projects** | | | |
| 1 | Additional meal to pregnant women (from the time of registry till delivery) from selected tribal and draught hit projects | 12250 | 9000.00 | 110,250,000.00 |
| 2 | Palnaghar/ creche for 6 months | 200 | 50000.00 | 10,000,000.00 |
| 3 | Micronutrient sprinkles sachets | 2000000 | 5.00 | 10,000,000.00 |
| 4 | Eggs, Bananas for 4 months for SUW, MUW | 50000 | 400.00 | 20,000,000.00 |
| 5 | Special feed and CMV for SAM, MAM, SUW | 20000 | 1000.00 | 20,000,000.00 |
| 6 | Assess feasibility and accuracy of non-invasive haemoglobinometer | - | - | 2,500,000.00 |
| **D** | Traning and monitoring of all activities | | | 10,000,000.00 |
| | **Total :** | | | **460,732,250.00** |

राजमाता जिजाऊ मदर चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड चाईल्ड डेव्हल्पमेंट डिपार्टमेंट, नवी मुंबई, यांनी उपरोक्त प्रस्तावामध्ये शेहेचाळीस कोटी सात लाख बत्तीस हजार दोनशे पंन्नास रुपये खर्चाची मागणी केली आहे.

तरी सदर प्रस्तावाबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.९०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, राजमाता जिजाऊ मदर चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड चाईल्ड डेव्हल्पमेंट डिपार्टमेंट, नवी मुंबई यांचेकडून प्रस्तावित नियोजनासाठी महाराष्ट्र शासनाकडून किती निधी मिळाला आहे, किती मिळणार आहे, वजनकाटे (लहान मुले/प्रौढांसाठी), Stadiometer, उंचीनुसार वजनाचे तक्ते सध्या किती उपलब्ध आहेत, राजीव गांधी योजनेअंतर्गत होणाऱ्या हृदय शस्त्रक्रियेस रु. १,५०,०००/- मात्र पेक्षा जास्त खर्च येणाऱ्या रुग्णांची नेमकी संख्या किती आहे व महाराष्ट्रातील गरोदर मातांची नोंदणी करणेकामी संगणकावर Software तसेच प्रायोगिक तत्वावर करण्यात येणाऱ्या तालुक्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**त्यामुळे राजमाता जिजाऊ मदर चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड चाईल्ड डेव्हल्पमेंट डिपार्टमेंट, नवी मुंबई यांना मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲड.संजय चौकीदार यांचेबरोबर चर्चा करुन त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देणेबाबत कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१४ डॉ.नितीन माधवराव वर्पे, वैद्यकिय अधिकारी (आर्थोपेडीक सर्जन), श्री साईनाथ रुग्णालय यांची सेवा पुढे चालू ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही अशी तरतूद आहे.

शासनाचे मंजूर केलेल्या आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी, असे नमूद केले आहे.

त्यानुसार दोन्ही रुग्णालयांमधील वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या आवश्यक रिक्त जागा जाहिरातीव्दारे भरणेकामी दि. २१/०६/२०१२ रोजी इंडियन एक्सप्रेस या वर्तमान पत्रामध्ये व संस्थान वेबसाईटवर प्रसिध्द करुन प्राप्त अर्जदार उमेदवारांच्या मुलाखती दि. २९/०७/२०१२ मा. वैद्यकिय उपसमितीसमोर घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०८/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८३ नुसार डॉ. नितीन माधवराव वर्पे यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकिय अधिकारी (आर्थोपेडीक सर्जन) या पदासाठी निवड करण्यात आली.

त्यानुसार डॉ. नितीन माधवराव वर्पे यांची जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ३५५८/ २०१२ दि. १०/१०/२०१२ अन्वये वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु. ६६०० मध्ये मुळ वेतन रु. १८७५०+ ग्रेड वेतन रु.६६०० व इतर अनुज्ञेय भत्ते लागू करुन वैद्यकिय अधिकारी (आर्थोपेडीक सर्जन) या पदावर एक वर्ष कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार ते दि. २२/१०/२०१२ रोजी कामावर हजर झाले आहेत.

शासन निर्णय क्र.सासंवि/२००५/३१७/(१०३) का.सोळा, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुं. दिनांक १३/०६/२००७ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/०८/२००७ रोजीच्या सभेत "ज्या कर्मचाऱ्यांना सेवेत एक वर्ष पूर्ण झालेनंतर त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी वाढविण्यात आला आहे. तो परिवीक्षाधीन कालावधी संपुष्टात आणून त्यांना दिनांक ०१/०८/२००७ पासून वेतनश्रेणीवर नेमणूका देण्यात याव्यात"असा निर्णय झालेला आहे. त्यांनुसार श्री साईबाबा हॉस्पीटलकडील मेडीकल व पॅरामेडीकल कर्मचारी यांना वेतनश्रेणी/वेतनबॅड देण्यात आलेले असून त्यांच्या सेवा पुढे चालू ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील एक वर्ष पूर्ण झालेल्या आर एम ओ यांना संस्थान सेवेत कायम केल्याचे नेमणूक आदेश द्यावेत अशी उपसमितीची शिफारस मा. व्य. समितीचे दि. १८/१०/२००८ रोजीचे सभेत मान्य करण्यात आलेली असून, त्याप्रमाणे आर एम ओ यांना वेतनश्रेणी देण्यात आलेल्या आहेत.

डॉ. नितीन माधवराव वर्पे, वैद्यकिय अधिकारी (आर्थोपेडीक सर्जन) यांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे सेवेत एक वर्ष पूर्ण झालेले आहे. सदर एक वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांचे काम व वर्तणूक समाधानकारक आहे. ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे विषयी काहीही प्रकरणे चालू नाहीत. तरी त्यांची संस्थान नियमाप्रमाणे सेवा पुढे चालू ठेवणे व संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नाही. असा अभिप्राय प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी दिलेला आहे. तसेच डॉ. वर्पे यांनी एक वर्ष कालावधीत (१५ ऑक्टोबर, १३ अखेर) २३ रजा उपभोगलेल्या आहेत. असा अहवाल कामगार अधिकारी यांनी दिलेला आहे.

डॉ. नितीन माधवराव वर्पे हे दि. २२/१०/२०१२ रोजी कामावर हजर झालेले असून, त्यांनी एक वर्षाचे नेमणूक कालावधीमध्ये २३ रजा घेतल्या असल्याने त्यांचा तात्पुरत्या नेमणूकीचा कालावधी २३ दिवसांनी वाढलेला आहे. सदरचा वाढीव कालावधी दि. १३/११/२०१३ अखेर संपुष्टात येत असल्याने डॉ. नितीन वर्पे यांना नेमणूकी संदर्भात देण्यात आलेल्या आदेशातील अटी-शर्ती आहे तशाच कायम ठेऊन

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्यांची संस्थान सेवा वाढीव कालावधी संपुष्टात आल्याच्या लगतच्या तारखेपासून म्हणजेच दि. १४/११/२०१३ रोजीपासून पुढे चालू ठेवता येईल.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे गोपनीय अहवालानुसार डॉ. नितीन माधवराव वर्पे, वैद्यकिय अधिकारी (आर्थोपेडीक सर्जन)-श्री साईनाथ रुग्णालय यांची संस्थान सेवा दि. १४/११/२०१३ रोजीपासून पूर्वीच्याच अटी-शर्तीवर चालू ठेवणेच्या मान्यतेस्तव मा. त्रिसदस्यीय समितीसमोर प्रस्ताव सादर करावा लागेल. त्यास मान्यता असावी ही विनंती.

प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे अहवालानुसार डॉ. नितीन वर्पे यांची संस्थान सेवा दि. १४/११/२०१३ रोजीपासून वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु. ६६०० मध्ये मुळ वेतन रु. १८७५०+ ग्रेड वेतन रु.६६०० व इतर अनुज्ञेय भत्ते मंजूर करुन, त्यांना यापूर्वी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीवर चालू ठेवणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे अभिप्राय विचारात घेता डॉ. नितीन वर्पे यांची संस्थान सेवा दि. १४/११/२०१३ रोजीपासून वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु. ६६०० मध्ये मुळ वेतन रु. १८७५०+ ग्रेड वेतन रु.६६०० व इतर अनुज्ञेय भत्ते मंजूर करुन, त्यांना यापूर्वी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीवर चालू ठेवणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१५** **वैयक्तिक सवलतपात्र गृहकर्जधारकांचे संस्थान निवासस्थान व त्यांच्या गृहकर्जावर देण्यात आलेल्या व्याजाच्या सवलतीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेने जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांना संस्थानची निवासस्थाने उपलब्ध व्हावीत या हेतुने कर्मचाऱ्यांना त्यांनी वैयक्तिकरित्या बांधलेल्या स्वतःच्या घरांसाठी घेणेत आलेल्या गृहकर्जाची रकमेवरील व्याजाचा निम्मा आर्थिक भार संस्थानने उचलण्याचे उपरोक्त प्रमाणे विविध सभेमध्ये निर्णय घेऊन त्याबाबतीत नियम व अटी लागू करण्यात आलेल्या आहेत. यानुसार संस्थानच्या काही कर्मचाऱ्यांनी सदर योजनेत वैयक्तिक सवलतपात्र गृहकर्ज घेतले होते व घेत आहेत.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१५.११.२००८ चे सभेतील विषय क्र.२० व त्यावरीतल निर्णयाप्रमाणे मा.कार्यकारी अधिकारी सो.यांनी दि.१२.०१.२००९ रोजी परिपत्रक काढून संस्थान कर्मचाऱ्यांसाठी सवलतपात्र गृहकर्जाच्या सुधारीत नियम व अटी प्रदर्शित केल्या आहेत. त्यापुर्वी गृहकर्ज घेतलेल्या व पुढे गृहकर्ज घेणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना लागू केल्याबाबत कळविले आहेत. परिपत्रकातील महत्वाचे नियम व अटी खालीलप्रमाणेः

अ) दि.१२.०१.२००९ परिपत्रकातील नियम व अट क्र.८प्रमाणेः ज्या कर्मचाऱ्यांना गृहकर्जाची सवलत दिलेली आहे व त्यांची घरे/तयार सदनिका/सोसायटीतील घरे जर भाडयाने दिली असतील व ते संस्थानचे खोलीत राहत असतील तर त्यांना व्याजाची सवलत देण्यात येणार नाही व आजपर्यंत दिलेल्या संस्थान व्याजाच्या सवलतीची वसुली करण्यात येईल. तसेच त्यांचा खोली वापरण्याचा सेवा आकार तिप्पट करण्यात येईल.

ब) दि.१२.०१.२००९ परिपत्रकातील नियम व अट क्र.१२ प्रमाणेः ज्या कर्मचा-यांनी १५ किमीच्या बाहेर घरे बांधलेली आहे व ते त्या घरात राहत नाही तसेच ती भाडयाने दिलेली आहे त्या कर्मचा-यांची संस्थानची सवलत बंद करण्यात येईल, तसेच ते जर संस्थान खोलीत राहत असतील तर त्यांचा सेवा आकार तिप्पट करण्यात येईल.

उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांनी स्वतःचे निवासस्थान बांधणेसाठी सवलतपात्र गृहकर्ज घेतलेले आहेत. संस्थानने त्यांच्या गृहकर्जावर निम्मे व्याजही भरलेले आहे परंतु अजुनही काही कर्मचारी संस्थानचे वापरत असलेले निवासस्थान सोडत नाहीत. शिवाय गृहकर्ज आम्ही पुर्ण भरलेले आहे. आमच्याकडे बाकी नाही असे दर्शवुन संस्थानने केलेली दंडात्मक कार्यवाही म्हणजे संस्थान निवासस्थानास आकारलेला तिप्पट वसुली आकार माफ करावा असे संस्थानला कळवत आहेत. यामुळे इतर संस्थान कर्मचाऱ्यांना संस्थानचे निवासस्थान उपलब्ध होत नाहीत. संस्थानने दि.१५.०१.२००९ चे परिपत्रकामधील उपरोक्तप्रमाणे स्पष्ट नियम व अटी प्रदर्शित केलेल्या आहेत. यानुसार सवलतपात्र कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या गृहकर्जावर खालीलप्रमाणे स्पष्ट आदेश होण्याची आवश्यकता आहेत.

१. जे कर्मचाऱ्यांनी गृहकर्जाची सवलत घेऊन त्यांनी स्वतःची घरे बांधली. संस्थानकडून त्यावर निम्म्या व्याजाची सवलतही घेतली / घेत ओत किंवा घेणार ओत शिवाय त्यांनी बांधलेले घर हे १५ किमीच्या आतमध्ये ओ व ते संस्थानने घालवून दिलेली दिड वर्षाची मुदत संपुनही ते संस्थान निवासस्थान राहात आहेत, अशा कर्मचाऱ्यांना ते राहत असलेल्या संस्थान निवासस्थानाचे भाडे तेथील परिस्थितीच्या बाजारभावाने (नगरपालीकेच्या रेडीरेकनर स्वे.फुट/स्वे.मीटरप्रमाणे) आकारण्यात यावेत. त्यांची गृहकर्जावरील व्याजात देण्यात येत असलेली सवलत त्वरीत बंद करुन त्यांना दिलेल्या

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



गृहकर्जासवलतीवरील संस्थानने भरलेले संपूर्ण व्याज त्यांच्या एकुण मासिक पगाराच्या १० % प्रमाणे समान हप्त्यात वसुल करण्यात येईल.

२. जे कर्मचाऱ्यांनी गृहकर्जाची सवलत घेऊन त्यांनी स्वतःची घरे बांधली किंवा विकत घेतली. संस्थानकडून त्यावर निम्म्या व्याजाची सवलतही घेतली/ घेत आहेत किंवा घेणार आहेत शिवाय त्यांनी बांधलेले घर हे १५ किमीच्या बाहेर असले तरीही त्यांना संपुर्ण व्याजाची दिलेली सवलत त्वरीत बंद करुन त्यांना पुर्वी दिलेल्या व्याजाच्या सवलतीची संपुर्ण रक्कम त्यांच्या एकुण मासिक पगाराच्या १० % प्रमाणे समान हप्त्यात वसुल करण्यात येईल. तसेच ते राहात असलेल्या निवासस्थानाचे भाडे संस्थानच्या निवासस्थानाच्या सेवाआकाराच्या तिप्पट दराने आकारुन ते कायम करावे.

संस्थान कर्मचाऱ्यांसाठी सवलतपात्र गृहकर्जाच्या उपरोक्त सुधारीत नियम १ व २ च्या मान्यतेसाठी व त्याप्रमाणे पुढे कार्यवाही होणेसाठी अथवा योग्य तो निर्णयास्तव मा.त्रिसदस्यीय समितीसमोर सादर.

**निर्णय क्र.९०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१६ वॉटर हैड्रंट यंत्रणेकरीता डिझेल इंजिन पंप सेट व तत्सम यंत्रणा विहीत पध्दतीने खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परिसर, प्रसादालय जुना गॅस प्लॅन्ट व श्री साईप्रसादालय गॅस प्लँट इ. ठिकाणी वॉटर हायड्रन्ट यंत्रणा बसविणेत आलेली आहे. दि.१०/११ जुलै २०१३ रोजी केंद्रीय गुप्तचर विभाग (आय.बी) तसेच राज्य गुप्तवार्ता विभाग आणि दहशतवाद विरोधी पथक (ए.टी.एस) यांनी मंदिर परिसर व संस्थानचे सर्व इमारतींचा सुरक्षा आढावा घेतला असता सुरक्षा आढाव्यामध्ये वॉटर हायड्रन यंत्रणेकरीता डिझेल इंजिन बसविणेबाबत सुचना केलेली आहे.

उपरोक्त विषयाची कार्यवाही मेकॅनिकल विभाग व संरक्षण विभागाने समन्वयाने करण्यात येणार असून त्यास अनुसरुन मंदिर परिसर, प्रसादालय जुना गॅस प्लॅन्ट व श्री साईप्रसादालय गॅस प्लँट याठिकाणी वॉटर हायड्रन्ट यंत्रणा कार्यान्वित असून सदर तीन ठिकाणी डिझेल इंजिन ऑपरेटेड फायर हायड्रन्ट पंप व तत्सम यंत्रणा बसवावी लागणार आहे. त्याकामी अंदाजे रक्कम रु.२५,०००००/- (अक्षरी पंचविस लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे.

तरी नामांकीत कंपन्यांकडून **(अ)** ०३ नग डिझेल इंजिन ऑपरेटेड फायर हायड्रन्ट पंप व तत्सम यंत्रणा विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रु.२५,०००००/- (अक्षरी पंचविस लाख मात्र) चे खर्चास **(ब)** प्रस्तुत यंत्रणा विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी नामवंत वृत्तपत्रात जनसंपर्क विभागामार्फत जाहिरात देणेस व महाराष्ट्र शासनाचे/संस्थानचे वेबसाईट वर ई-निविदा आय.टी विभागामार्फत अपलोड करणेस **अ)** व **ब)** नुसार मान्यता असावी.

**निर्णय क्र.९०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या अ व ब प्रमाणे मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१७ श्री संत राममारुती महाराजांचा फोटो म्यूझियम हॉलमध्ये लावणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री संत राममारुती महाराज यांचा फोटो समाधी मंदिरामध्ये लावणेबाबत संदर्भीय पत्राद्वारे श्री.शिरीष अनंत गडकरी, अध्यक्ष व विश्वस्त, श्री संत राममारुती समाधी संस्थान, कल्याण यांनी विनंती केली आहे. यापुर्वी सन-१९९० पासून श्री राममारुती महाराजांचा फोटो सभागृहात लावणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यानंतर त्यांनी सदर फोटो द्वारकामाईत अथवा समाधी मंदिरात व नंतर म्युझियम हॉलमध्ये संत महंताचे फोटोचे शेजारी लावणेबाबत कळविले होते.

श्रीराममारुती समाधी संस्थान यांना संस्थानकडुन वेळोवेळी पत्राद्वारे कळविलेले आहे की, आर्ट गॅलेरी/ म्युझियम विस्तारीकरणानंतर त्या ठिकाणी श्री साईबाबांचे समाकालीन भक्तांचे / संतांचे फोटो सोबत श्रीसंत राममारुती महाराजांचा फोटो लावणेत येईल. सदर पत्राचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

०१. <u>जा.नं.एसएसएस-वशी-मंदिर-१६०१३-९०, दि.१५.०५.१९९०</u>

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, ज्यांचा श्री साईबाबांशी प्रत्यक्ष संबंध आला असेल व तसा श्री साईसत्‌चरित्रात उल्लेख आहे अशाच भक्तांचे फोटो श्री साईबाबा मंदिराचे सभामंडपात लावले आहेत.

"श्री संत राममारुती" यांचे नावाचा उल्लेख श्री साईसत्‌चरित्रामध्ये कोणत्या अध्यायात आलेला आहे याबाबत आपण आपल्या पत्रात खुलासा केलेला नाही. आपला खुलासा आल्यावर विश्वस्त मंडळाचे बैठकीत त्याबाबत निर्णय घेतला जाईल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०२. जा.नं.एसएसएस-वशी-मंदिर-४९७२-९१, दि.०७.०५.१९९१

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्राप्रमाणे आपणास कळविण्यात येते की, आपण श्री संत राममारुती माहाराजांचा फोटो समाधी मंदिरात केंव्हाही आणला तरी चालेल. तशा निश्चीत तारखेला आणावा असे बंधन नाही. गुरुपौर्णिमा उत्सवाचे पुर्वी फोटो केंव्हाही आणला तरी चालेल.

फोटोची फ्रेम पुढीलप्रमाणे असावी २ इंच रुंद पट्टी व फोटो १६"x२०" इंच असावा. तरी आपण वरील दिलेल्या साईजप्रमाणे फ्रेम फोटो आणावा म्हणजे इतर फोटोंचे बरोबर सभामंडपात लावता येईल. तरी आपण फोटो घेऊन येणेस हरकत नाही. तसेच सोबत नावाची नेमप्लेटही तयार करुन आणावी.(ती आमचे मंदिरातील इतर फोटो प्रमाणे असावी)

०३. जा.नं.एसएसएस-वशी-मंदिर-८८३५-९२, दि.२७.०८.१९९२

आपण दि.१७.०६.९२ रोजी पाठविलेले पत्र दि.२२.०७.९२ रोजी मिळाले. उपरोक्त विषयाबाबत आपण कळविले आहे. त्याप्रमाणे आपण दिलेला फोटो सध्या लावता येत नाही.

सदर फोटो लावणेकरीता मंदिर नुतनीकरण व स्वतंत्र म्युझियम नवीन जागी झालेनंतर उपरोक्त फोटो लावणेबाबत विचार करणेत येईल.

०४. जा.नं.एसएसएस-वशी-मंदिर-७४९५-२००३, दि.०६.०९.२००३

आपले विषयाचे संदर्भानुसार कळविणेत येते की, श्री संत राममारुती महाराजांचा फोटो संस्थानचे म्युझियम मध्ये लावता येईल. तरी १४"x२०" या साईजचा फोटो शिरडीस पाठविण्याचे करावे. व्यवस्थापन मंडळाचे झालेल्या निर्णयाप्रमाणे स्मकालीन संतमहंतांचे फोटो नवीन तयार करणेत आलेल्या म्युझियम मध्ये लावता येईल.

तरी शिरडी येथे उपरोक्त साईजचा फोटो पाठविण्याची तजवीज करावी ही विनंती.

तसेच श्रीराममारुती महाराज यांचेप्रमाणे इतर श्रींचे समकालीन साईभक्त यांचे फोटो म्युझियम अथवा समाधी मंदिरात लावणेबाबतचे प्रस्ताव आलेले आहेत. त्यामध्ये कै.सौ.गंगुबाई सखाराम औरंगाबादकर, कै.शांताराम बळवंत नाचणे, कै.वामनराव (दादा) माणकोजी पा.गोंदकर, कै.हरी केशव कर्णिक, कै.श्री.खुशालचंद सांड, कै.श्री.मार्तंड म्हाळसापती नागरे, कै.श्री.रावसाहेब बापुराव राघोजी बोरावके, कै.श्री.नृसिंह गोपालदास महाराज, प.पू.माधवनाथ महाराज, कै.डॉ.आण्णासाहेब गव्हाणकर, प.पू.अद्धवेश रानडे, कै.श्री.निवृत्ती हनुमंतराव पा.गोंदकर, कै.डॉ.एम.के.किर्तीकर, इ. यांचा समावेश आहे.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०७/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७३ अन्वये मा.श्री.गोरक्षकर साहेब, यांचे सल्ल्याप्रमाणे आर्ट गॅलेरीबाबत विचार व्हावा व विस्तृत माहितीसह फोटो त्याठिकाणी लावणेत यावेत. भक्तांना शांतपणे फोटो पाहता येतील व माहिती मिळेल, असा प्रस्ताव ठेवण्यात आला होता, मात्र सदरचा प्रस्ताव तुर्त तहकुब ठेवण्यात यावा, असे ठराव झालेला आहे.

तरी श्रीराममारुती महाराजांचा फोटो समाधी मंदिराचे सभामंडपात अथवा म्युझियम हॉल येथे लावल्यास इतर समकालीन भक्तांचे नातेवाईक अशाच पद्धतीने मागणी करतील, असे आहे. करीता मंदिरात अथवा मंदिर परिसरामध्ये श्रीसाई सच्चरितावर आधारित नवीन फोटो गॅलेरी करुन अथवा नुतनीकरण करतांना नवीन म्युझियममध्ये श्रीसाईसच्चरितामध्ये उल्लेख असलेल्या समकालीन भक्त व इतरांचे छायाचित्र लावावे, असे नम्र मत आहे. तोपर्यंत कोणत्याही समकालीन संतांचा अथवा भक्तांचा फोटो लावल्यास इतर वर वर्णन केलेल्या साईभक्तांचेही फोटो लावावे लागतील. त्यामुळे श्रीराममारूती महाराजांचा फोटो लावावा अथवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.९०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.१८ आठवड्यातील सर्व दिवस सशुल्क दर्शन/ आरती पासेस सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानने आठवडयातील सर्व दिवस सशुल्क दर्शन/आरती पासेस सुरु करावे किंवा कसे याबाबत माहिती मागविलेली होती. त्यानुसार सदरचा विषय संस्थान त्रिसदस्यीय समितीच्या दिनांक २७.०४.२०१३ च्या सभेतील विषय नंबर १४ निर्णय क्रमांक ४२७ अन्वये मुंबई हायकोर्टच्या औरंगाबाद खंडपिठात मान्यतेसाठी ठेवलेला होता.

आठवडयातील सातही दिवस सशुल्क दर्शन/आरती पासेस सुरु करताना त्याची कार्यवाही/ नियमावली बाबत तपशील सादर करावा असे म्हटले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे तपशील सादर केलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०१.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक २७२ अन्वये गुरुवार, शनिवार व रविवार या दिवशी दर्शन आरती पासेसवर जनसंपर्क कार्यालयामार्फत शुल्क आकारणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३०९ अन्वये सशुल्क दर्शन/आरती पासेसची अंमलबजावणी प्रत्यक्षात दिनांक १३.०३.२०१०

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



पासून सुरु करण्यात आलेली आहे. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३५८(२५) अन्वये सशुल्क दर्शन/आरती पासेस सुविधेतुन गुरुवारचा दिवस वगळण्यात आलेला आहे.

तसेच साईटेक प्रकल्पांतर्गत दिनांक १४ जुलै २०११ पासून ऑनलाईन दर्शन/आरती सुविधा सुरू करण्यात आलेली आहे.याबरोबरच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १३-१४.०१.२०१२ चे सभेतील

निर्णय क्रमांक १७० अन्वये श्रींचे दर्शन व आरतीचे पेड पासेस दररोज चालू ठेवणेबाबत प्रशासनाने नियमावली तयार करावी असा ठराव झालेला आहे.

**<u>शनिवार/ रविवार सशुल्क दर्शन/ आरती पासेस</u>**

दि. १३.०३.२०१० ते १६.०४.२०१३ अखेर सशुल्क शनिवार/रविवार दर्शन/आरती पासेसची माहिती.

| अ.नं. | सशुल्क दर्शन/आरती पासेस कालावधी | भक्तांची संख्या | रक्कम | सरासरी दिवस |
|---|---|---|---|---|
| ०१ | दि.१३.०३.२०१० ते १०.०७.२०११ | ४१८२०४ | ५,८८,३०,४००/- | १३८ |

दि.११.०७.२०११ ते १६.०४.२०१३ अखेर साईटेक प्रकल्पांतर्गत शनिवार/रविवार सशुल्क दर्शन/आरती पासेसची माहिती.

| अ.नं. | सशुल्क दर्शन /आरती पासेस कालावधी | भक्तांची संख्या | रक्कम | सरासरी दिवस |
|---|---|---|---|---|
| ०२ | दि.११.०७.२०११ ते १६.०४.२०१३ | ५२३८२० | ७,१४,८०,२००/- | १८४ |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं.१ व २ मधील माहितीनुसार दि. १३.०३.२०१० ते १६.०४.२०१३ या कालावधीत एकूण ९४२०२४. (नऊ लाख बेचाळीस हजार चोविस मात्र) इतक्या भक्तांनी शनिवार/रविवार या दिवशी सशुल्क दर्शन/आरती पासेसव्दारे साईदर्शन व आरतीचा लाभ घेतला. व त्यापासून संस्थानला एकूण ३२२ दिवसाला रक्कम रुपये १३,०३,१०,६००/- (अक्षरी रक्कम रूपये तेरा कोटी तीन लाख दहा हजार सहाशे मात्र) इतके उत्पन्न मिळालेले आहे. तर प्रतिदिवसाकरीता ४,०४,६९१/- रुपये उत्पन्न मिळाले.

**ऑनलाईन दर्शन/आरती पासेस**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीने जगभरातील साईभक्तांना लवकरात लवकर साई दर्शन मिळावे म्हणून ऑनलाईन दर्शन /आरती पासेसची सुविधा सुरू केलेली आहे. दि. ११.०७.२०११ पासून हि सुविधा साईभक्तांसाठी खुली केली आहे.

दि. ११.०७.२०११ ते १६.०४.२०१३ अखेर आठवड्यातील सर्व दिवस **ऑनलाईन दर्शन/आरती** पासेसची माहिती.

| अ.न. | ऑनलाईन दर्शन/आरती पासेस कालावधी | भक्तांची संख्या | रक्कम | सरासरी दिवस |
|---|---|---|---|---|
| ०३ | दि. ११.०७.२०११ ते १६.०४.२०१३ | ३८३३८४ | ९,३६,३९,४००/- | ६४५ |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं.३ मधील माहितीनुसारऑनलाईन दर्शन/आरती पासेसव्दारे ३८३३८४ (तीन लाख त्रेएंशी हजार तिनशे चौऱ्याएंशी) इतक्या भक्तांनी साईदर्शन व आरतीचा लाभ घेतला व त्यापासून संस्थानला ९,३६,३९,४००/- (अक्षरी रक्कम रुपये नऊ कोटी छत्तीस लाख एकोणचाळीस हजार चारशे मात्र) इतके उत्पन्न संस्थानला मिळालेले आहे.

उपरोक्त तक्त्यातील अ.नं.१,२ व ३ मधील दर्शविलेल्या माहितीनुसार शनिवार/रविवार सशुल्क व ऑनलाईन दर्शन/आरती पासेसव्दारे रुपये २२,३९,५०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये बावीस कोटी एकोणचाळीस लाख पन्नास हजार तिनशे मात्र) इतके उत्पन्न संस्थानला मिळालेले आहे.

दिनांक १३.०३.२०१० ते १६.०४.२०१३ याकालावधीत आठवड्यातील फक्त शनिवार व रविवार या एकुण ३२२ दिवसासाठी एकुण रक्कम रुपये १३,०३,१०,६००/- (अक्षरी रक्कम रुपये तेरा कोटी तीन लाख दहा हजार सहाशे मात्र) इतके उत्पन्न संस्थानला मिळालेले आहे. प्रतिदिवसाकरिता ४,०४,६९१/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख चार हजार सहाशे एक्यान्नव मात्र) इतके उत्पन्न फक्त शनिवार व रविवार गर्दीच्या काळात मिळालेले आहे. परंतु आठवड्यातील सर्व दिवस सशुल्क दर्शन/आरती पासेस चालु केले तर अंदाजे प्रतिदिवसाला रक्कम रुपये ३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख मात्र) तर वर्षाकाठी अंदाजे रुपये ११,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये अकरा कोटी मात्र) इतके उत्पन्न मिळू शकेल. परंतु सध्या महत्वाच्या अतिमहत्वाच्या व्यक्तींना तसेच शिफारस पत्र धारकांनाच पासेस दिले जातात. हे पासेस सर्वांसाठी खुले केल्यास उत्पन्नाची मर्यादा वाढु शकेल.

याबरोबरच राज्यातील देवस्थानांच्या दर्शनव्यवस्थेबाबत महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाने दिनांक ०७.०९.२०१० रोजी पारीत केलेल्या आदेशाची माहीती खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचा क्रमांक : संकीर्ण - २०१०/३५/ (प्र.क्र.८५)/ का.सोळा, मंत्रालय, मुंबई, दिनांक ०७.०९.२०१० रोजीचे आदेशाव्दारे उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी मंदिरामध्ये भाविकांना दर्शन देण्याबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय झालेला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०१. देवस्थानातील उत्सवाच्या दिवशी तसेच इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही व्यक्तीस नियमीत रांगेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने दर्शन घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये व तशी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात येऊ नये.

०२. कोणत्याही देवस्थानांमध्ये उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही मार्गाने (शुल्क, देणगी, फी इ.) रक्कम आकारुन दर्शनासाठी प्रवेश देण्यात येऊ नये.

०३. प्रत्येक देवस्थान समितीने संबंधित देवस्थानातील महत्वाचा उत्सवाचा दिवस व गर्दीचा दिवस कोणता आहे याबाबत दर्शनी भागावर स्पष्टपणे दिसेल अशा प्रकारे ठळक अक्षरात फलक लावणे बंधनकारक राहील. तसेच याबाबत समितीने संबंधित सहायक धर्मादाय आयुक्तांना माहिती देणे आवश्यक राहील.

०४. कोणत्याही देवस्थान समितीने महत्वाच्या सणाच्या दिवशी व इतर केव्हाही दर्शनाकरीता पासेस वा प्रवेश पत्रिका वितरीत करु नयेत.

०५. कोणत्याही देवस्थानामध्ये उत्सवाच्या व इतर महत्वाच्या दिवशी सर्व भाविकांना समानतेने एकाच रांगेतून प्रवेश देण्यात यावा, जेणेकरुन सर्वसामान्य भाविकांमध्ये अन्याय झाल्याची भावना निर्माण होणार नाही. तसेच विश्वस्त, अधिकारी व पोलिस यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन भक्तांना सामान्य रांगेव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने प्रवेश देऊ नये.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन महत्वाच्या दिवशी तसेच इतर दिवशीही रांगेचे सुयोग्य नियोजन करुन सर्वसामान्य भाविकांना शांततेने दर्शन घेण्याची व्यवस्था सर्व देवस्थान समित्यांनी करणे आवश्यक आहे. सदर सूचनांचे उल्लंघन झाल्यास त्याची शासनाकडून गंभीर दखल घेण्यात येईल व संबंधितांवर आवश्यक कारवाई करण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असा आहे.

वरील आदेशानुसार संस्थान आयोजित श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा व श्रीपुण्यतिथी या उत्सवांच्या काळात दर्शन/आरती पासेस बंद ठेवण्यात येतात.वर्षभरातील गर्दीच्या दिवशी ऑनलाईन दर्शन/आरतीचे दिवस ही लॉक करण्यात आलेले असून गर्दीच्या काळात ऑनलाईन पासेस ही बंद ठेवण्यात येतात. मात्र पासेस बंदच्या कालावधीमध्ये मान्यवर मंत्री महोदय, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, राज्य अतिथी व इतर महत्वाच्या व्यक्ती आदिंची दर्शन/आरती व्यवस्था करण्यात येते.

**आठवडयातील सर्व दिवस सशुल्क दर्शन/आरती पासेस सुरु करतांना खालील बाबीवर सांगोपांग चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा असे वाटते.**

**अ)** जनसंपर्क विभागाद्वारे सध्या साईबाबाच्या दर्शनासाठी येणाऱ्या अंध,अपंग,वयस्कर व अत्यंत आजारी असणाऱ्या व्यक्तींना त्यांचे सोबत एक व्यक्ती देऊन दर्शनाची व्यवस्था मोफत करण्यात येते. यासंदर्भात व्यवस्थापन समितीच्या दि.१५/०२/२०११ रोजीच्या विषय क्र.२२ अन्वये निर्णय झालेला आहे. सदरची कार्यवाही व्यवस्थापन समितीच्या निर्णयाप्रमाणे यापुढेही सुरु ठेवावी असे मत आहे.

**ब)** शिर्डीतील ग्रामस्थांची दर्शन/आरतीची व्यवस्थाही मोफत केली जाते. परंतु ती यापुढेही दर्शन गेट निश्चित करुन सुरु ठेवावी असे मत आहे.

**क)** जनसंपर्क विभागाव्दारे देण्यात येणाऱ्या सशुल्क पासेससाठी खालील व्यक्तींकडून सध्या शुल्क आकारले जात नाही ते यापुढेही चालू ठेवावे असे मत आहे. यामध्ये

१) श्री साईबाबा संस्थानचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त मंडळाचे सर्व सदस्य व त्यांचे कुटुंबीय, श्रीसाईबाबा संस्थान सेवेतील व निवृत्त कर्मचारी

२) श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागाच्या दैनंदिन कार्यालयीन कामाकरीता येणाऱ्या व्यक्तीं तसेच उत्सव काळात येणारे मानकरी व कलाकार.

३) श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शनाकरीता राज्याच्या व देशाच्या कानाकोपऱ्यातून **पालखी घेऊन येणाऱ्या पदयात्रींची दर्शन व्यवस्था पालखी गेटने करण्यात येते.** मात्र गर्दीच्या काळात सदरची व्यवस्था करण्यात येत नाही, तरी या संदर्भात योग्य तो धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

४) दर गुरुवारी शिर्डी पंचक्रोषीतून भाविक, पदयात्री साईबाबांच्या दर्शनासाठी येत असतात सध्या त्यांची दर्शनाची व्यवस्था संरक्षण कार्यालयाजवळील गेटने करण्यात येते. त्यांची दर्शनाची वेळ व गेट ठरवून त्या वेळेत मोफत दर्शन व्यवस्था करावी असे वाटते.

**ड) देणगीदार साईभक्त**

श्री साईबाबा संस्थानला रु.२५०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणाऱ्या (वस्तूरुप किंवा रोख स्वरुपातील) देणगीदार भक्तांना त्याच दिवसाकरीता दर्शन/आरतीची व्यवस्था मोफत करण्यात येते. त्यामध्ये देणगीचे स्वरुप पाहून व्यक्तींची संख्या निश्चित केली जाते.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेला काही दानशूर साईभक्त मोठया स्वरूपात देणगी देतात. या देणगीदार साईभक्तांची शॉल, नारळ व प्रसाद देऊन दर्शन/आरतीची व्यवस्था करण्यात येते. (सध्या ही व्यवस्था फक्त देणगी दिलेल्या दिवसापुरतीच मर्यादित असते.) श्री साईबाबा संस्थान प्रसादालयाच्या

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मोफत अन्नदान योजनेतही मोठया प्रमाणात साईभक्त सहभागी होत आहेत. त्यांचे देणगीचे स्वरूप बघून त्यांचीही वरीलप्रमाणे मोफत दर्शन/आरतीची व्यवस्था त्या दिवसाकरीता केली जाते.

**यासंदर्भात आंध्रप्रदेशातील तिरुपती देवस्थान देणगीदार भक्तांना काय सुविधा देते याकरिता या देवस्थानच्या वेबसाईटवर पुढीलप्रमाणे माहिती उपलब्ध झाली आहे.** (सोबत वेबसाईटवरील माहितीची छायांकीत प्रत)

तिरुपती देवस्थानमध्ये १ कोटी देणगी देणारे देणगीदार भक्त व त्यांचे कुटूबींय (पाच पेक्षा जास्त नाही) यांना खालीलप्रमाणे तह्यात (आयुष्यभरासाठी) वेगवेगळया स्वरुपाच्या सुविधा पुरविलेल्या आहेत.

०१) वर्षातील ३ दिवस रू. २,५००/- दराचे व्हीआयपी सुट राहण्यासाठी विनामुल्य देण्यात येतात.

०२) देणगीदार व त्यांचे कुटूबिंय यांची वर्षातील ३ दिवस विनामुल्य दर्शनव्यवस्था करण्यात येते.

०३) विनामुल्य दर्शना व्यतिरिक्त देणगीदार व त्यांचे कुटूबींय यांना सुप्रभात दर्शन वर्षातून ३ वेळेस देण्यात येईल.

०४) वेद आर्शीवचनम पुजा वर्षातून एक वेळेस मंदीरामध्ये किंवा रंगनाथकुलम मंडपामध्ये मंदीर पुजाऱ्यामार्फत करण्यात येईल.

०५) भक्ताला त्याच्या देणगी पावतीबरोबर १० मोठे लाडू प्रसाद म्हणून दिले जातात.

०६) देणगीदार भक्ताला एक दुप्पट्टा व ब्लाऊज पीस देणगी दिल्यामुळे बहूमान म्हणून सत्कार रुपात दिला जातो.

०७) पाच ग्रॅम्स वजनाचे सोन्याचे नाणे तसेच सोन्याचा मुलामा दिलेले चांदीचे श्रीवरू व पदमावती देवीची प्रतिकृती

असलेले नाणे सुध्दा मोफत दिले जाते.

०८) वैयक्तीक देणगीदारास सदरील सेवा आयुष्यभरासाठी राहील. तसेच दिलेली देणगी फर्म,कंपनी, एन्टरप्राइजेस यांच्या नावे असेल किंवा एकत्र स्वरुपाची असेलतर सदरील सेवा २० वर्षासाठी राहील.

०९) देणगीदार भक्ताला त्याने दिलेल्या देणगीवर नियमानुसार आयकरात सूट दिली जाते.

१०) देणगी दिलेल्या सदर वर्षभरात दिलेल्या भेटीत १० महाप्रसाद पाकिटे प्रसाद म्हणून दिले जातात.

याव्यतिरिक्त वर्षभरातील कोणत्याही एका मुहूर्तावर सर्वकामप्रदालक्ष्मी श्रीनिवास महायज्ञम ही पुजा श्रीनिवासमंगापूरम येथे देणगीदार किंवा त्यांचे नातेवाईक किंवा त्यांनी नाम निर्देशित केलेल्या व्यक्तीसोबत करता येईल.

तसेच रूपये १० लाख किंवा त्यापेक्षा जादा देणगी देणारे देणगीदार भक्त व त्यांचे कुटूबींय (पाच पेक्षा जास्त नाही) यांना खालीलप्रमाणे तह्यात (आयुष्यभरासाठी) वेगवेगळया स्वरुपाच्या सुविधा पुरविलेल्या आहेत.

०१) वर्षातील ३ दिवस रू.५००/- दराचे निवासस्थान विनामुल्य देण्यात येतात.

०२) देणगीदार व त्यांचे कुटूबिंय यांची वर्षातील ३ दिवस दर्शनव्यवस्था उपलब्धतेनुसार करण्यात येते.

०३) भक्ताला वर्षातील कोणत्याही एका भेटीच्या वेळी लहान आकाराचे २० लाडू प्रसाद म्हणून दिले जातात.

०४) देणगीदार भक्ताला एक दुप्पट्टा व ब्लाऊज पीस देणगी दिल्यामुळे बहूमान म्हणून सत्कार रुपात दिला जातो.

०५) पाच ग्रॅम्स वजनाचे सोन्याचे नाणे तसेच सोन्याचा मुलामा दिलेले चांदीचे श्रीवरू व पदमावती देवीची प्रतिकृती असलेले नाणे सुध्दा मोफत दिले जाते.

०६) वैयक्तीक देणगीदारास सदरील सेवा आयुष्यभरासाठी राहील. तसेच दिलेली देणगी फर्म,कंपनी, एन्टरप्राइजेस यांच्या नावे असेल किंवा एकत्र स्वरुपाची असेलतर सदरील सेवा २० वर्षासाठी राहील.

०७)देणगीदार भक्ताला त्याने दिलेल्या देणगीवर नियमानुसार आयकरात सूट दिली जाते.

०८)देणगी दिलेल्या सदर वर्षभरात दिलेल्या भेटीत १० महाप्रसाद पाकिटे प्रसाद म्हणून दिले जातात.

रूपये ५ लाख किंवा त्यापेक्षा जादा देणगी देणारे देणगीदार भक्त व त्यांचे कुटूबींय (पाच पेक्षा जास्त नाही) यांना खालीलप्रमाणे तह्यात (आयुष्यभरासाठी) वेगवेगळया स्वरुपाच्या सुविधा पुरविलेल्या आहेत.

०१) वर्षातील ३ दिवस एआरपी काऊटंरवर उपलब्धतेनुसार व्हीआयपी निवासस्थान विनामुल्य देण्यात येतात.

०२) देणगीदार व त्यांचे कुटूबिंय यांची वर्षातील ३ दिवस दर्शनव्यवस्था उपलब्धतेनुसार करण्यात येते.

०३) भक्ताला वर्षातील कोणत्याही एका भेटीच्या वेळी लहान आकाराचे १० लाडू प्रसाद म्हणून दिले जातात.

०४) देणगीदार भक्ताला एक दुप्पट्टा व ब्लाऊज पीस देणगी दिल्यामुळे बहूमान म्हणून सत्कार रुपात दिला जातो.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०५) सोन्याचा मुलामा दिलेले चांदीचे श्रीवरू व पदमावती देवीची प्रतिकृती असलेले नाणे सुध्दा मोफत दिले जाते.
०६) वैयक्तीक देणगीदारास सदरील सेवा आयुष्यभरासाठी राहील. तसेच दिलेली देणगी फर्म,कंपनी, एन्टरप्राइजेस यांच्या नावे असेल किंवा एकत्र स्वरुपाची असेलतर सदरील सेवा २० वर्षासाठी राहील.
०७) देणगीदार भक्ताला त्याने दिलेल्या देणगीवर नियमानुसार आयकरात सूट दिली जाते.
०८) देणगी दिलेल्या सदर वर्षभरात दिलेल्या भेटीत ५ महाप्रसाद पाकिटे प्रसाद म्हणून दिले जातात.

रूपये १ लाख किंवा त्यापेक्षा जादा देणगी देणारे देणगीदार भक्त व त्यांचे कुटूबींय (पाच पेक्षा जास्त नाही) यांना खालीलप्रमाणे तह्यात (आयुष्यभरासाठी) वेगवेगळया स्वरुपाच्या सुविधा पुरविलेल्या आहेत.
०१) वर्षातील १ दिवस एआरपी काऊटंरवर उपलब्धतेनुसार व्हीआयपी निवासस्थान विनामुल्य देण्यात येतात.
०२) देणगीदार व त्यांचे कुटूबिंय यांची वर्षातील १ दिवस दर्शनव्यवस्था उपलब्धतेनुसार करण्यात येते.
०३) भक्ताला वर्षातील कोणत्याही एका भेटीच्या वेळी लहान आकाराचे ६ लाडू प्रसाद म्हणून दिले जातात.
०४) देणगीदार भक्ताला एक दुप्पट्टा व ब्लाऊज पीस देणगी दिल्यामुळे बहूमान म्हणून सत्कार रुपात दिला जातो.
०५) वैयक्तीक देणगीदारास सदरील सेवा आयुष्यभरासाठी राहील. तसेच दिलेली देणगी फर्म,कंपनी, एन्टरप्राइजेस यांच्या नावे असेल किंवा एकत्र स्वरुपाची असेलतर सदरील सेवा २० वर्षासाठी राहील.

तिरुपती देवस्थानास देणगी देणाऱ्या देणगीदारांच्या वरील सुविधांचा विचार करता श्री साईबाबा संस्थाननेही देणगी देणारे दानशूर साईभक्त व त्याच्या कुटूंबातील (सात पेक्षा जास्त नाही) व्यक्तींचा देणगी दिलेल्या दिवशी सत्कार (शॉल, श्रीफळ देऊन) करून प्रसादालयाच्या व्हीआयपी कक्षात जेवणाची मोफत सुविधा उपलब्ध करून द्यावी तसेच खालीलप्रमाणे दर्शन/आरती सुविधा द्याव्यात असे मत आहे. देणगीदारांना त्यांच्या देणगीचे स्वरुप पाहून विविध प्रकारच्या सुविधा दिल्यास प्रसादालयाच्या अन्नदान योजनेस तसेच इतरही देणगीमध्ये वाढ होण्यास निश्चित मदत होईल असे वाटते. उत्सवकाळात तसेच वर्षाखेरीज ३१ डिसेंबर अशा जास्त गर्दीचे वेळी सशुल्क व ऑनलाईन पासेस बंद ठेवावे असे मत आहे.
देणगीदारांना त्यांचे देणगीचे स्वरुप पाहून द्यावयाच्या सुविधांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

| **देणगी मुल्य रुपये** | **दर्शन सुविधा** | **आरती सुविधा** | **एकूण वर्ष** | **गेट** |
|---|---|---|---|---|
| २५,०००/- | २ वेळा | ३ वेळा (उपलब्धतेनुसार) | १ | शनीगेट |
| ५०,०००/- | २ वेळा | ३ वेळा (उपलब्धतेनुसार) | २ | नंदीगेट |
| १,००,०००/- | ५ वेळा | ५ वेळा (दिवसात दोन पेक्षा जास्त आरती सुविधा नाही) | ५ | गर्दीचे स्वरुप बघून देणगी दिलेल्या दिवशी आरतीचे वेळी पुढे उभे केले जाईल. |
| २ लाख ते ५ लाख | ७ वेळा | ७ वेळा (दिवसात दोन पेक्षा जास्त आरती सुविधा नाही) | १० | गर्दीचे स्वरुप बघून देणगी दिलेल्या दिवशी आरतीचे वेळी पुढे उभे केले जाईल. |
| १० लाख ते २० लाख | १० वेळा | १० वेळा (दिवसात दोन पेक्षा जास्त आरती सुविधा नाही) | २० | गर्दीचे स्वरुप बघून देणगी दिलेल्या दिवशी आरतीचे वेळी पुढे उभे केले जाईल. |

रु.१ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देणारे देणगीदार साईभक्त व त्यांचे कुटूबींय (सात पेक्षा जास्त नाही) यांना खालीलप्रमाणे तह्यात (आयुष्यभरासाठी) खालीलप्रमाणे वेगवेगळया स्वरुपाच्या सुविधा द्याव्यात असे मत आहे.
१) देणगीदार साईभक्त व त्यांचे कुटूबिंय यांची वर्षातील १० वेळेस विनामुल्य दर्शनव्यवस्था करण्यात यावी.
२) देणगीदार साईभक्त व त्यांचे कुटूबिंय यांची वर्षातील १० वेळेस विनामुल्य आरतीव्यवस्था (दिवसात दोन पेक्षा जास्त आरती सुविधा नाही) करण्यात यावी.
**इ)** श्री.महेश रेड्डी यांनी सुमारे ११ कोटी रुपये खर्च करुन ९६ किलो सोन्याचे श्रींचे सिहासन श्री साईबाबा संस्थानला देणगी स्वरुपात दिले. त्यानुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०.०१.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १० (१६) अन्वये श्री महेश रेड्डी व त्यांचे कुटुंबियांची तहयात आरती व दर्शन व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

वरील निर्णयाप्रमाणे श्री.के.व्ही.रमणी, संस्थापक व कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी दिलेल्या ११० कोटी रुपये देणगीतून साईआश्रम-१ व साईआश्रम-२ हे प्रकल्प साकारलेले आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



श्री.के.व्ही.रमणी यांनी दिलेली देणगीही सर्वाधिक असून ऐतिहासिक आहे. त्यांचे बाबतही वरीलप्रमाणे निर्णय व्हावा असे मत आहे.

आठवडयातील सर्व दिवस सशुल्क दर्शन/आरती पासेस सुरु करतांना काही अतिमहत्वाच्या व्यक्तींची दर्शन/आरती व्यवस्था मोफत करावी असे मत आहे. यासंदर्भात आंध्रप्रदेशातील तिरुपती देवस्थानकडे दुरध्वनीवरुन संपर्क केला असता खालील एकूण २० मान्यवरांची मोफत दर्शन/सेवा या थेट महाव्दारम मधून केली जात असल्याचे कळविले आहे.

**ई) अतिमहत्वाच्या व्यक्तींची मोफत दर्शन व्यवस्था**

१.भारतीय गणराज्याचे मा. राष्ट्रपती.
२.भारतीय गणराज्याचे मा.उप राष्ट्रपती.
३.भारतीय गणराज्याचे मा.पंतप्रधान.
४.आध्रंप्रदेश राज्यपाल.
५.भारतीय गणराज्याचे भूतपूर्व मा. राष्ट्रपती, मा. उप राष्ट्रपती.
६.भारतीय गणराज्याचे मा. उप पतंप्रधान.
७.भारतीय गणराज्याचे मुख्य न्यायाधीश.
८.लोकसभा अध्यक्ष.
९.आध्रंप्रदेश मुख्यमंत्री.
१०.मंत्रीमंडळातील सर्व केंद्रीय मंत्री.
११.नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष.
१२.सर्व राज्यांचे मुख्यमंत्री.
१३.सर्व राज्यांचे राज्यपाल.
१४.सर्वोच्य न्यायालयाचे सर्व न्यायाधीश.
१५.आध्रंप्रदेश मंत्रीमंडळातील सर्व मंत्री.
१६.माजी राज्यपाल व माजी मुख्यमंत्री.
१७.भारतीय गणराज्याचे भूतपूर्व पतंप्रधान.
१८.आध्रंप्रदेश विधान सभा अध्यक्ष,उपाध्यक्ष.
१९. आध्रंप्रदेश विधान सभा माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष.
२०.आध्रंप्रदेश राज्याचे उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश.

आंध्रप्रदेशातील तिरुपती देवस्थानच्या धर्तीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेने खालील महत्वाच्या व्यक्तींची दर्शन/आरती व्यवस्था मोफत करावी असे मत आहे.

१.भारतीय गणराज्याचे मा. राष्ट्रपती.
२.भारतीय गणराज्याचे मा.उप राष्ट्रपती.
३.भारतीय गणराज्याचे मा.पंतप्रधान.
४.महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल.
५.भारतीय गणराज्याचे भूतपूर्व मा. राष्ट्रपती, मा. उप राष्ट्रपती.
६.भारतीय गणराज्याचे मा. उप पतंप्रधान.
७.भारतीय गणराज्याचे मुख्य न्यायाधीश.
८.लोकसभा अध्यक्ष.
९.महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री.
१०.केंद्रीय मंत्रीमंडळातील सर्व मंत्री.
११.नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष.
१२.सर्व राज्यांचे मुख्यमंत्री.
१३.सर्व राज्यांचे राज्यपाल.
१४.सर्वोच्य न्यायालयाचे सर्व न्यायाधीश.
१५.महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळातील सर्व मंत्री.
१६.भारतीय गणराज्याचे भूतपूर्व पतंप्रधान.
१७.महाराष्ट्र राज्य विधान सभा अध्यक्ष,उपाध्यक्ष.
१८.महाराष्ट्र राज्याचे उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश.

तरी वर नमूद केलेल्या अतिमहत्वाच्या व्यक्तींची मोफत दर्शन/आरती व्यवस्था व्हावी असे मत आहे.

**उ)** याचप्रमाणे शिर्डी विधानसभा व लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी तसेच जिल्हा व सत्र न्यायाधीश अहमदनगर, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून येणारे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



साधूसंत. इत्यादिंच्या बाबतही मोफत दर्शन/आरती व्यवस्था करणे बाबत निर्णय होणे आवश्यक आहे असे वाटते.

**ऊ) सशुल्क पासचे वितरण**

जनसंपर्क कार्यालयातून वितरीत होणारे दर्शन आरती पासेस सध्या शिफारसपत्र पाहून दिले जातात. मात्र ऑनलाईनवर सध्या हे पासेस सर्वाकरिता सशुल्क उपलब्ध आहेत. आठवडयातील सर्व दिवस जनसंपर्क कार्यालयाच्या काऊटंरवर सशुल्क दर्शन/आरती पासेस सुरु करताना प्रायोगिक तत्वावर पहिल्या सहा महिन्यांसाठी सध्याच्या पध्दतीनेच सशुल्क पासेसचे वितरण सुरु ठेवावे असे मत आहे. कारण सध्या सशुल्क दर्शन/आरतीचे सध्याचे दर अत्यंत कमी आहेत. देणगी काऊटंरवर दररोज सुमारे रु. २५ लाख पर्यत देणगी जमा होते. गर्दीच्या काळात या देणगीची रक्कम ५० लाख रुपयापर्यंत जाते. सदरचे पास सर्वांसाठी खुले केल्यास सशुल्क पासेसचे दर अत्यंत कमी असल्याने देणगी काऊटंरवर देणगी करिता जाणारे देणगीदार सशुल्क पासेसची मागणी करतील. तसेच दर्शनरांगेतूनही मोठया प्रमाणात भक्त पासेस वितरणाच्या रांगेत उभे राहतील व या सर्वांनाच पासेस देणे शक्य होणार नाही. याकरिता भविष्यकाळात स्वतंत्र सशुल्क दर्शन लाईनची रेलींग तिरुपती देवस्थानच्या धर्तीवर सुरू करणे आवश्यक आहे. तसेच सर्वाकरिता बिना शिफारस पत्र पासेस खुले करावयाचे झाल्यास एखादया राष्ट्रीयकृत बँकेची सेवा घ्यावी असे वाटते. उदा. स्टेट बँक ऑफ इंडीया यांचेशी करार करुन स्टेट बँकेच्या देशभरातील सर्व शाखांमधून दर्शन पासेस उपलब्ध करता येतील काय याबाबतही विचार विनिमय व्हावा असे मत आहे.

विशेषतः आरती करीता मोठया प्रमाणावर पासेसची साईभक्तांची मागणी असते. आरती करीता ही सध्याचीच पध्दत चालू ठेवावी असे मत आहे कारण मंदिराची क्षमता विचारात घेता यापेक्षा जास्त व्यक्तींना पासेस देता येणार नाहीत. जनसंपर्क कार्यालयाद्वारे प्रत्येक आरतीसाठी ३०० पासेस महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तीं तसेच शिफारसपत्रावरील व्यक्ती यांना दिले जातात. ऑनलाईन वरील दर्शन/आरती पासेस सर्वासाठी खुले केले असून त्याचा लाभ मोठया प्रमाणात साईभक्त घेत आहेत. ऑनलाईनवर प्रत्येक आरती करीता ३०० पासेस सर्वांकरीता खुले ठेवले असून प्रत्यक्षात एकुण सरासरी ३५० ते ४०० भाविक सध्या पासेसव्दारे श्रींच्या प्रत्येक आरतीचा लाभ घेतात.

**ए) सशुल्क व ऑनलाईन पासेस तपासणीबाबत**

सध्या जनसंपर्क विभागातून सशुल्क किंवा ऑनलाईन दर्शन/आरती पासेस सदर साईभक्तास दिल्यानंतर संरक्षण विभागातील कर्मचाऱ्याकडून संबधित गेटवर पासेसची तपासणी होऊन साईभक्तास मंदिरात सोडले जाते. आठवडयातील सातही दिवस सशुल्क दर्शन/आरती पासेस चालू केल्यानंतर पासेसची संख्या वाढली जाईल. तेव्हा गेटवरील तपासणी योग्य होते की नाही याची शहनिशा करणेकरीता अंतर्गत लेखापरिक्षण विभाग अथवा एखादया इतर विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वेळोवेळी तपासणी होणे आवश्यक आहे असे मत आहे. संबंधित तपासणी अधिकारी/कर्मचारी आपला अहवाल मा. कार्यकारी अधिकारी यांना सादर करतील.

या व्यतिरिक्त श्री साईबाबा संस्थानच्या दैनंदिन कामकाजाच्या दृष्टीकोनातून मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचे अधिकारात महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तींना मोफत दर्शन/आरतीकरीता सोडणेबाबतचीही तरतुद असावी असे वाटते.

तरी वरील बाबींवर व्यवस्थापन समितीच्या सभेत सांगोपांग चर्चा होवून निर्णय होण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९०७ यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

जोपर्यंत अद्ययावत अशा दर्शन लाईन आणि इंफ्रास्ट्रक्चर तयार होत नाही तोपर्यंत सध्या आहे त्याचप्रमाणे दर्शनाची व्यवस्था चालू ठेवावी. तसेच, सध्या शनिवार व रविवार या दोन दिवसांप्रमाणे प्रायोगिक तत्वावर सोमवार ते शुक्रवार या दिवशीही सर्व आरत्यांचे पासेस देणगी शुल्क आकारुन देण्याची कार्यवाही सुरु करणेत यावी. या निर्णयामुळे दर्शन रांगेतून जाणाऱ्या जास्तीत जास्त सर्वसामान्य भक्तांना श्रींचे आरतीचा लाभ घेता येईल.

**बाबांच्या आरत्यांसाठी खालील मान्यवर व्यक्तींना मोफत सोडण्यात यावे.**

१) शिर्डीतील ग्रामस्थांची आरतीची व्यवस्था मोफत केली जाते, ती यापुढेही सुरु ठेवावी. ग्रामस्थांची ओळख पटण्यासाठी त्यांचे आधारकार्ड/ निवडणूक ओळखपत्र गृहीत धरण्यात यावे.

२) श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागाच्या दैनंदिन कार्यालयीन कामाकरीता येणाऱ्या व्यक्तीं तसेच उत्सव काळात येणारे मानकरी व संस्थान निमंत्रीत कलाकार.

३) श्री साईबाबा संस्थानला रु.२५०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणाऱ्या (वस्तूरुप किंवा रोख स्वरुपातील) देणगीदार भक्तांची आरतीची व्यवस्था देणगी दिलेल्या दिवशी वा त्यांचे विनंतीनुसार इतर दिवशी एकदाच मोफत करण्यात यावी.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



४) श्री.के.व्ही.रमणी, अध्यक्ष व कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे रु.११० कोटी मात्रचे देणगीतुन साईआश्रम प्रकल्प साकारलेला आहे. त्यामुळे श्री.रमणी व त्यांच्या कुटूंबीयांचे साईप्रती योगदान लक्षात घेऊन त्यांना कायमस्वरुपी भेट देणे अगत्याचे ठरेल व साईदर्शनापेक्षा कुठलाही आनंद त्यांना भावणार नाही, म्हणून संस्थानतर्फे श्री.के.व्ही.रमणी व त्यांच्या कुटूंबीयांना तहयात मोफत निवास व दर्शन/आरती व्यवस्था करणेत यावी.

५) भारतीय गणराज्याचे मा. राष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.उप राष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.पंतप्रधान, भारतीय गणराज्याचे मा.उप पतंप्रधान, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, भारतीय गणराज्याचे भूतपूर्व मा.राष्ट्रपती व मा.उप राष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे भूतपूर्व पतंप्रधान, भारतीय गणराज्याचे मुख्य न्यायाधीश, लोकसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्रीमंडळातील सर्व मंत्री, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, सर्व राज्यांचे राज्यपाल, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, सर्वोच्य न्यायालयाचे सर्व न्यायाधीश, महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळातील सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य विधान सभा अध्यक्ष व उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश, महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयांचे सर्व न्यायाधीश आदि अतिमहत्वाच्या व्यक्तींची दर्शन/ आरती व्यवस्था निशुल्क राहील.

६) याचप्रमाणे शिर्डी विधानसभा व लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी, अध्यक्ष- शिर्डी नगरपंचायत तसेच देशाच्या कानाकोपऱ्यातून येणारे साधुसंत यांचीही आरतीसाठी निशुल्क व्यवस्था करणेत यावी.

७) उत्सव, जोडून येणाऱ्या सुट्टया, राष्ट्रीय सण, जास्त गर्दीचा कालावधी आदि वेळी दर्शन/आरती पासेस बंद राहतील. याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना राहील.

याव्यतिरिक्त दर्शन/आरतीसाठी विनाशुल्क व्यवस्था कोणत्या व्यक्तींची करावी, याबाबत प्रसंगानुरुप निर्णय घेण्याचा अधिकार पुर्णपणे त्रिसदस्यीय समितीचे अध्यक्ष, सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचेकडे राहील. तसेच सर्व आरती पासेससाठी आकारणेत येणारे मुल्य सध्याचे शनिवार/ रविवार प्रमाणेच 'देणगी मुल्य' म्हणून स्विकारण्यात यावे.

याचवेळी अशीही चर्चा झाली की, साईदर्शनासाठी येणारे अंध, मंतिमंद व अशा प्रकारचे अपंग अथवा अतिवृध्द की जे स्वतःची देखभाल करणेस असमर्थ आहेत, अशा साईभक्तांची फक्त दर्शन व्यवस्था मोफत करणेत यावी. त्यांच्या दर्शनाची पुर्ण जबाबदारी जनसंपर्क कार्यालय/ संरक्षण विभागाने घ्यावी.

याबाबत प्रसिध्दी माध्यमाद्वारे साईभक्तांना माहिती देण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ संरक्षण विभाग)

---

**विषय नं.१९** **पोस्टेज स्टॉकमधून भेट देण्यात आलेली प्रकशने किंमतीसह कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१२-२०१३ या कालावधीत संस्थानचे मा.अध्यक्ष, सदस्य, मा.कार्यकारी अधिकारी, मा उपकार्यकारी अधिकारी यांनी तसेच संस्थानअंतर्गत खात्यांचे संबंधीत संपर्कातील अधिका-यांना व वेगवेगळ्या क्षेत्रातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तिंना त्यांचे शिर्डी भेटीत जनसंपर्क कार्यालयामार्फत सप्रेम भेट तसेच हभप दासगणु महाराज जयंती उत्सव, कामगार दिनानिमित्तआयोजीत आदर्श कर्मचारी सत्कार सोहळा, साईबाबा रुग्णालया व्दारे होणारे शिबीरे, तसेच मान्यवरांना भेट म्हणून खालील दर्शविल्याप्रमाणे पुस्तके/ फोटो व सी.डी प्रकाशने विभागाकडून माहे १ एप्रिल २०१२ ते माहे ३१ मार्च २०१३ या कालावधीत मोफत देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | पी यु बी नं. | पुस्तकांचे नांव | भाषा | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पी यु बी नं.१ | श्री साई सच्चरीत्र | मराठी | ९ | ९७४.०५ | ६६६.४५ |
| २ | पी यु बी नं.२ | श्री साई सच्चरीत्र | हिन्दी | ६ | ४१.०३ | २४६.१८ |
| ३ | पी यु बी नं.३ | श्री साई सच्चरीत्र | इंग्रजी | ३ | २४.४२ | ७३.२६ |
| ४ | पी यु बी नं.४ | श्री साई सच्चरीत्र | गुजराथी | ३ | ३५.९० | १०७.७० |
| ५ | पी यु बी नं.५ | श्री साई सच्चरीत्र | कन्नड | ६ | ४४.९५ | २६९.७० |
| ६ | पी यु बी नं.६ | श्री साई सच्चरीत्र | तेलगु | १ | ३९.५२ | ३९.५२ |
| ७ | पी यु बी नं.७ | श्री साई सच्चरीत्र | तामीळ | ३ | ४५.१२ | १३५.३६ |
| ८ | पी यु बी नं.११ | श्री साई लिलामृत | हिन्दी | १ | १६.९० | १६.९० |
| ९ | पी यु बी नं.१६ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | गुजराथी | १ | २.९७ | २.९७ |
| १० | पी यु बी नं.१९ | श्री साई स्तवंन मंजरी | मराठी | ४५० | १.३४ | ६०३.०० |
| ११ | पी यु बी नं.२० | मुलांचे साईबाबा | मराठी | १ | ३.७५ | ३.७५ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | पी यु बी नं.३२ | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १ | ४.८७ | ४.८७ |
| १३ | पी यु बी नं.४३ | श्री साई सतचरित्र स्टोरी | मराठी | ३ | ८५.५५ | २५६.६५ |
| १४ | पी यु बी नं.४९ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती झरीन | इंग्रजी | १ | १२.९४ | १२.९४ |
| १५ | पी यु बी नं.५४ | दैनंदिन साईबोध | मराठी | ४ | ७०.३० | २८१.२० |
| १६ | पी यु बी नं.५५ | खापर्डे डायरी | तामिळ | १ | १३.६३ | १३.६३ |
| १७ | पी यु बी नं.६० | शिकवण व तत्वज्ञान | मराठी | १ | १३.१८ | १३.१८ |
| १८ | पी यु बी नं.६२ | श्री साईचरित्र | बंगाली | १ | ५१.२० | ५१.२० |
| १९ | पी यु बी नं.६५ | तेलगु पोथी (मनी अम्मा) | तेलगु | ३ | ८२.०० | २४६.०० |
| २० | पी यु बी नं.६७ | श्री साई सच्चरित सार | हिन्दी | ५ | ६१.७५ | ३०८.७५ |
| २१ | पी यु बी नं.६९ | मातृसाई | तेलगु | १ | २७.३२ | २७.३२ |
| २२ | पी यु बी नं.७३ | एक फकीर की पाठशाला | हिन्दी | ३ | ३७.४८ | ११२.४४ |
| २३ | पी यु बी नं.७४ | श्री साई समर्थ चरित्र (झरीन) | इंग्रजी | ५ | ९०.५८ | ४७२.९० |
| २४ | पी यु बी नं.७८ | श्री साईचरित्र | ओरीया | ९ | ३७.९३ | ३४१.३७ |
| २५ | पी यु बी नं.८५ | श्री साईचरित्र इंग्रजी (स्टर्लिग) | इंग्रजी | २२ | २३.३० | ५१२.६० |
| २६ | पी यु बी नं.९० | श्री साईचरित्र | मल्याळम | २ | ६३.५० | १२७.०० |
| २७ | पी यु बी नं.९१ | श्री साईचरित्र | कोंकणी | २ | ८४.४९ | १६८.९८ |
| २८ | पी यु बी नं.९३ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | पंजाबी | ५१ | १८.१२ | ९२४.१२ |
| | | | | **पुस्तकांची एकुण रक्कम** | | **६०१९.९४** |
| **अ.नं.** | **पी यु बी नं.** | **फोटोचे नांव** | **आकार** | **मोफत नग** | **छपाई दर** | **एकुण रुपये** |
| २९ | पी यु बी नं.१३८ | श्री साईबाबा अक्रोलिक फ्रे म फायबर | १२ x १७ | १६ | ३९५.०० | ६३२० |
| ३० | पी यु बी नं.१५४ | श्री साईबाबा अक्रोलिक फोटो स्टॅंडसह | ६ x ८ | ३५ | १७१.०० | ५९८५ |
| | | | | **फोटोची एकुण रक्कम** | | **१२३०५.००** |
| **अ.नं.** | **पी यु बी नं.** | **कॅसेट/सी.डी चे नांव** | **प्रकार** | **मोफत नग** | **छपाई दर** | **एकुण रुपये** |
| ३१ | पी यु बी नं.२१० | मंदिर आरती | Dvd | ५ | ४७.४५ | २३७.२५ |
| | | | | **सीडींची एकुण रक्कम** | | **२३७.२५** |

| **अ.नं.** | **पी यु बी नं.** | **डायरी** | **वर्ष** | **मोफत नग** | **छपाई दर** | **एकुण रुपये** |
|---|---|---|---|---|---|---|
| ३२ | पी यु बी नं.३०८ | श्री साई डायरी | २०१२ | १७ | ५२.०० | ८८४.०० |
| ३३ | पी यु बी नं.३०९ | श्री साई डायरी | २०१३ | ५९ | ५०.०० | २९५०.०० |
| | | | | **डायरीची एकुण रककम** | | **३८३४.००** |
| **अ.नं.** | **पी यु बी नं.** | **श्री साई कॅलेंडर** | **वर्ष** | **मोफत नग** | **छपाई दर** | **एकुण रुपये** |
| ३४ | पी यु बी नं.४३३ | श्री साईबाबा कॅलेंडर १ पानी लहान | २०१३ | २५ | ८.७७ | २१९.२५ |
| ३५ | पी यु बी नं.४३४ | श्री साईबाबा कॅलेंडर १ पानी - मोठे | २०१३ | १४ | १४.०० | १९६.०० |
| ३६ | पी यु बी नं.४३५ | श्री साईबाबा कॅलेंडर ६ पानी | २०१३ | २६० | २१.७५ | ५६५५.०० |
| ३७ | पी यु बी नं.४३६ | श्री साईबाबा कॅलेंडर ८ पानी | २०१३ | ८ | १७८.०० | १४२४.०० |
| ३८ | पी यु बी नं.४३७ | श्री साईबाबा कॅलेंडर ३डी टेबल ७ पानी | २०१३ | २ | १६६.०० | ३३२.०० |
| ३९ | पी यु बी नं.४३८ | श्री साईबाबा थ्री डी कॅलेंडर कलर | २०१३ | २ | २४०.०० | ४८०.०० |
| ४० | पी यु बी नं.४३९ | श्री साईबाबा कॅलेंडर मेटेलिक ७ पानी | २०१३ | २ | २३२.०० | ४६४.०० |
| | | | | **कॅलेंडर एकुण रककम** | | **८७७०.२५** |

| | |
|---|---|
| एकुण मोफत दिलेल्या पुस्तकांची रक्कम | **६०१९.९४** |
| एकुण मोफत दिलेल्या फोटोची रक्कम | **१२३०५.००** |
| एकुण मोफत दिलेल्या सी डी ची रक्कम | **२३७.२५** |
| एकुण मोफत दिलेल्या दैनंदिनीची रक्कम | **३८३४.००** |
| एकुण मोफत दिलेल्या कॅलेंडर्सची रक्कम | **८७७०.२५** |
| एकूण रक्कम- | **३१,१६६.४४** |

उपरोक्तप्रमाणे पुस्तके, फोटो, सी.डी. पोस्टेज स्टॉकमधून मोफत देण्यात आलेली आहेत. याकामी झालेला रु३१,१६६.४४ चे खर्चास मान्यता मिळणेस व सदरचा खर्च प्रकाशने विभाग (Publication Expenses) खाते नावे टाकणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.२०** **साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित पुस्तके/ फोटोंचे पुनर्मुद्रन विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील

उपरोक्त तरतूदीनुसार प.पू.श्री साईबाबांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबत प्रचार-प्रसार होणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी मार्फत संस्थान प्रकाशित साईचरीत्रे,पुस्तके,फोटो व ऑडीओ/ व्हीडीओ सीडी चे पुनरमुद्रण करुन साईभक्तांना माफक किंमतीने विक्री केली जाते.

सर्व साधारण एक वर्ष पुरेल एवढया प्रतींची छपाई केली जाते. जाहिरात प्रसिद्ध करणे, ई-निविदा मागविणे, प्राप्त सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणे, वाटाघाटी करणे, अशा कामासाठी बराच कालावधी लागतो त्यामुळे ५ ते ६ महिने पुरेल एवढा साठा शिल्लक राहिल्यानंतर छपाईची कार्यवाही चालू करण्यात येते. अनेक साईमंदिरात साईभक्त संमलने आयोजित केली जातात. त्यामुळे ठराविक प्रकाशनांची अचानक मागणी वाढते.

पुनर्मुद्रण करावयाची पुस्तके, शिल्लक साठा, अंदाजे किती महिने साठा पुरेल व प्रस्तावित छपाई याबाबतचे परिशिष्ट खालील प्रमाणे-

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | भाषा | वार्षिक विक्री | शिल्लक स्टॉक | दरमहा सरासरी विक्री | किती महिने पुरेल | नवीन छपाई संख्या | मागिल छपाई दर | अंदाजे छपाई दर | अंदाजे एकूण छपाई रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईसच्चरित पोथी- आवृत्ती क्र.३२ | मराठी | ३१३३२ | १४३२१ | २६११ | ५ | ३५००० | ७४.०५ | ९०.०० | ३१५००००.०० |
| ०२ | श्री साई सत्चरित्र - आवृत्ती क्र.२७ | हिंदी | ८७३९४ | ६०५०४ | ७२८३ | ८ | १००००० | ३९.२५ | ५०.०० | ५००००००.०० |
| ०३ | श्री साई सत्चरित्र- आवृत्ती क्र.२५ | इंग्रजी | ४६३८३ | १६१५७ | ३८६५ | ४ | ५०००० | ३२.६० | ४०.०० | २००००००.०० |
| ०४ | श्री साई सत्चरित्र - आवृत्ती क्र.१४ | गुजराथी | २४६४० | १००८० | २०५३ | ५ | ३०००० | ३५.९० | ४०.०० | १२०००००.०० |
| ०५ | श्री साई सत्चरित्र - आवत्ती क्र.२५ | तेलगु | ८६३२७ | २८२७२ | ७१९४ | ४ | १००००० | ४१.५० | ५०.०० | ५००००००.०० |
| ०६ | श्री साई सत्चरित्र - आवृत्ती क्र.१९ | तामीळ | ५०८९० | १४८५६ | ४२४१ | ४ | ६०००० | ४९.६० | ६०.०० | ३६०००००.०० |
| ०७ | श्री साईंचे सत्य चरित्र (गद्यात्मक)- आवत्ती क्र.०९ | मराठी | ११३७७ | ५३५३ | ९४८ | ६ | १५००० | ८५.५५ | १००.०० | १५०००००.०० |
| ०८ | श्री साईंचे सत्य चरित्र (गद्यात्मक) - आवृत्ती क्र.०२ | गुजराथी | ९९४ | ५३६ | ८३ | ६ | १००० | ८१.९० | १००.०० | १०००००.०० |
| ०९ | श्री साई समर्थ चरित्र (झरीन ) -आवृत्ती क्र.०४ | इंग्रजी | १५५६ | १२०१ | १३० | ९ | २००० | ९०.५८ | १००.०० | २०००००.०० |
| १० | श्री साईसतचरित्र तेलगु पोथी- आवृत्ती क्र.०७ | तेलगु | ४०३७ | १४८१ | ३३६ | ४ | ५००० | ८२.०० | १००.०० | ५०००००.०० |
| ११ | मुलांचे साईबाबा - आवृत्ती क्र.११ | हिंदी | २०४२७ | १०००० | १७०२ | ६ | २५००० | ६.१० | ७.०० | १७५०००.०० |
| १२ | मुलांचे साईबाबा - आवृत्ती क्र.१५ | इंग्रजी | ४०९५ | ९९५ | ३४१ | ३ | ५००० | ५.४० | ७.०० | ३५०००.०० |
| १३ | मुलांचे साईबाबा - आवृत्ती क्र.०८ | तामीळ | ५४२४ | ० | ४५२ | ० | ७००० | ४.२५ | ७.०० | ४९०००.०० |
| १४ | श्री साईबाबा चित्रावली -आवृत्ती क्र.१० | मराठी/ इंग्रजी | १५९२२ | १५००० | १३२७ | ११ | २०००० | ५.३० | ७.०० | १४००००.०० |
| १५ | साईबाबा ऑफ शिर्डी प्रधान -आवृत्ती क्र.१३ | इंग्रजी | २०१४ | १४४६ | १६८ | ९ | २५०० | ४.२५ | ७.०० | १७५००.०० |
| १६ | श्री साईबाबांची शिकवण व तत्त्वज्ञान -आवृत्ती क्र.०६ | मराठी | २७३८ | ० | २२८ | ० | ३००० | १३.१८ | १५.०० | ४५०००.०० |
| १७ | श्री साईबाबांची शिकवण व तत्त्वज्ञान - आवृत्ती क्र.०२ | गुजराथी | ६६१ | ५०० | ५५ | ९ | १००० | १३.३३ | १५.०० | १५०००.०० |
| १८ | श्री साई सगुणोपासना आरती -आवृत्ती क्र.५३ | मराठी | १३३८७१ | १०२२०१ | १११५६ | ९ | १५०००० | ४.९५ | ७.०० | १०५००००.०० |
| १९ | श्री साईनाथ सगुणोपास- | हिंदी | ३५६९८ | ५७८४ | २९७५ | २ | ४०००० | ६.७८ | ०९.०० | ३६००००.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ना - आवृत्ती क्र.०८ | | | | | | | | | |
| २० | श्री साई तेलगु पुजाविधी आरती -आवृत्ती क्र.१६ | तेलगु | ४१३२६ | २४३ | ३४४४ | ० | ५०००० | ६.९० | १०.०० | ५०००००.०० |
| २१ | श्री साईनाथ स्तवन मंजरी - आवृत्ती क्र.०९ | इंग्रजी | ६३०३ | ० | ५२५ | ० | ७००० | ३.१७ | ४.०० | २८०००.०० |
| २२ | श्री साईनाथ स्तवन मंजरी - आवृत्ती क्र.०८ | गुजराथी | २८९० | १०६० | २४१ | ४ | ३००० | २.७२ | ४.०० | १२०००.०० |
| २३ | श्री साईनाथ स्तवन मंजरी - आवृत्ती क्र.०४ | तेलगु | ३२८३६ | २८५०० | २७३६ | १० | ३५००० | ३.३० | ४.०० | १४००००.०० |
| २४ | श्री साईनाथ भजनमाला -आवृत्ती क्र.०५ | हिंदी | १३३७ | ११८९ | १११ | ११ | २००० | २५.८० | ३०.०० | ६००००.०० |
| २५ | गुरुपाठाचे अभंग - आवत्ती क्र.०४ | मराठी | १९६३ | ० | १६४ | ० | २५०० | २.७० | ४.०० | १००००.०० |
| २६ | दगडावर बसलेले बाबा कलर | १४"x२०" | ४४७९२ | २९०६० | ३७३३ | ८ | ५०००० | ३.१५ | ५.०० | २५००००.०० |
| २७ | कानाला हात लावलेले बाबा | १४"x२०" | २४४५५ | १६८०० | २०३८ | ८ | ३०००० | ३.२२ | ५.०० | १५००००.०० |
| २८ | श्री डी फोटो दगड ब. बाबा b/w | २.५"x३.५" | २९१७७ | ० | २४३१ | ० | ५०००० | ६.५० | ८.०० | ४०००००.०० |
| २९ | श्री डी फोटो फ्रिलीप | २.५"x३.५" | २८२६२ | १९११८ | २३५५ | ८ | ५०००० | ६.५० | ८.०० | ४०००००.०० |
| | | | | | | | | एकुण रु- | | २,६०,८६,५००.०० |

वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसारीत करुन ई-निविदा मागवून छपाईची कार्यवाही करावी लागेल. उपरोक्त परिशिष्टात दर्शविलेनुसार पुस्तके/फोटो छपाई करणेकामी अंदाजे एकूण रू.२,६०,८६,५००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा पुस्तके/फोटो छपाईसाठी सन २०१३-२०१४ मंजूर शिल्लक बजेट रुपये १०,१२,०६,७५७/- मधून करता येईल. उपरोक्त पुस्तके/फोटोंची विक्री होऊन रक्कम संस्थान जमा होते.

जाहिरातीनुसार नियत मुदतीत प्राप्त निविदा मा.व्य.समितीचे सभेपुढे उघडणेत येऊन, पात्र निविदा धारकांना चर्चा/वाटाघाटीस मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निमंत्रित करणेत येईल. चर्चा वाटाघाटी अंती देऊ केलेल्या निम्नतम दराने छपाईकामी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेऊन छपाई कार्यादेश देणेत येतील.

सबब प्रस्तावित पुस्तके/फोटोंचे पुनरमुद्रण विहीत पद्धतीने ई-निविदा मागवून करणेस व छपाईकामी येणा-या अंदाजे रु.२,६०,८६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस व जनसंपर्क कार्यालयाद्वारा वृत्तपत्रात जाहिरात देणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मंजूरी मिळणेसाठी सादर.

**निर्णय क्र.९०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित पुस्तके/ फोटोंचे पुनरमुद्रण करणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस व सदर छपाईकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,६०,८६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२१** **सिलंबद केलेल्या महारतन गावरान तुपाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.सहाय्यक आयुक्त कार्यालय अहमदनगर यांचेकडील मिसलेनीअस ॲप्लीकेशन नं ०८/१२ नुसार दि.२१.०८.२०१३ रोजीचे आदेशास अनुसरुन कळविण्याचे की, दि.२८/०८/२०१२ रोजी मा.सहा.आयुक्त कार्यालय, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचे कार्यालयाकडील अन्न सुरक्षाअधिकारी श्री. का.सु.शिंदे यांनी "महारतन" गावरान तुप बॅच नं.१२ चे ४२७ डबे व बॅच नं.१५ चे ९०४ डबे असे एकूण १३३१ डबे भांडार विभागात येवून सिलबंद केले होते. सिलबंद केलेल्या एकूण डब्यांची किंमत रू.४३,३९,०४४.९९ इतकी आहे. गावरान तुपाचे मे.बाफना बाजार, नासिक यांचे रू ६१,९४,४७५.०० मात्र रकमेचे देय्यके प्रलंबित आहेत .

सदरच्या जप्त केलेल्या गावरान तुपा संदभार्त पुरवठादार मे.बाफना बाजार, नासिक यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद येथे अन्न व औषध प्रशासन कार्यालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर क्रिमिनल रिट पिटीशन नं.२९६/२०१३ दाखल केलेली आहे.

रिट पिटीशन नं.२९६/२०१३ संदर्भात दि.१२/०७/२०१३ रोजी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

"<u>O R D E R</u>

a) Criminal Writ Petition is allowed

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



b) The order passed by the respondent No.3 - Designated Officer, Food and Drugs Administration (Maharashtra State), Ahmednagar is set aside.
c) We direct that the appropriate afficer/ authority shall issue notice to the petitioner Sanjay Suvalal Bafna and other contesting parties to this petition and thereafter pass appropriate orders in respect of the action/ decision to be taken by the authorities in respect of the subject matter of this petition..
d) It is clarified that, we have not expressed any conclusive opinion in respect of the merits of the claim of the contesting parties.
e) The appropriate authority issuing notice to the parties, shall complete the proceedings and pass appropriate orders within six weeks from today.
f) Parties shall maintain status quo in respect of the seized goods for a period of six weeks."

उपरोक्त आदेशानुसार मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर यांनी दि.०८/०८/२०१३ रोजीचे नोटीसी अन्वये दि.२१/०८/२०१३ रोजी जप्त केलेल्या गावरान तुपाचे विल्हेवाटी संदर्भात उपस्थित राहणेबाबत कळविले होते.

सदरच्या आदेशानुसार दि.२१/०८/२०१३ रोजी मा.सहा आयुक्त, अहमदनगर यांचे कार्यालयात तत्कालीन अधीक्षक श्री.कुलकर्णी व पुरवठादार मे.बाफना बाजार, नासिक हे समक्ष हजर होते. सदरचे दिवशी संस्थानतर्फे " जप्त कलेला साठा मा.सहा.आयुक्त कार्यालय अ.नगर यांचे अखत्यारीत असल्याने नियमांस अनुसरुन जो ऊचित निर्णय घेतील त्यास संस्थानची मान्यता गृहीत धरण्यात यावी" असे संस्थानतर्फे म्हणणे सादर केले तसेच पुरवठादार मे.बाफना बाजार यांनी " जप्त केलेला तुपाचा साठा हा मुदतबाह्य झालेला असल्याने ते तुप इंडस्ट्रीज अथवा अखाद्य वापरासाठी आदेश झाल्यास काही हरकत नाही. सदरचा माल हा मला देवून तो मी विक्री करुन त्या मालाची रक्कम मला मिळावी " असे म्हणणे सादर केले होते.

उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या दोनही पत्रांवर मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांनी खालिलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

" ORDER

a) That the seized of Cow Ghee (Maharashtra Brand Bench No 12) 427 tins each of 15 kg measuring 6404.2 kg cost Rs.13,91,952.87 (In Rupees Rhirteen Lacs Ninety one thousand nine hundred fifty two and paise Eighty seven only) has been found substandard and not conforming to the standards of Ghee as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 211. That the said food has also crossed the time limit of expiry as evident from the contents on its label, lebelled by the manufacturer and thus the said food has become unfit as food for human consumption.
b) That the seized stocked stocked Cow Ghee (Maharashtra Brand bench No 15) 904 tins each of 15 kg measuring 13559.2 kg cost Rs.2947092.12 (In Words Rupees Twenty nine Lacs forty seven thousand ninety two and paise Twelve only) has been found unsafe and not conforming to the standards of Ghee as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 211. That the said food has also crossed the time limit of expiry as evident from the contents on its label, lebelled by the manufacturer and thus the said food has become unfit as food for human consumption..
c) Therefore in the interest of public health and in the interest of protecting human life. I order that both stocks of seized Cow Ghee should not be used as food or as an ingredient of food for human consumption.
d) That the both seized stocks of cow Ghee be returned to the Non-applicant No.1 from whose possession the same was seized, on executing a bond for a sum of money equal to the value of said food cow Ghee for being used for non-edible purpose. e.g. soap making or any other suitable non edible purpose. That the proceeds from sale for non edible purpose shall be deposited Seperately for two stocks of cow ghee by the Non-applicant No.1 in the office of the Asstt. Commissioner of food & Drug Administration(MS) Ahmednagar.
e) That the Compliance order Shall be under the supervision of applicant food and Safety officer. That the report of the compliance with this order shall be submitted by the applicant."

तद्नंतर दि.२६/०८/२०१३ रोजी मा.सहा.आयुक्त, अ.नगर यांनी त्यांचे कार्यालयात उपरोक्त आदेशप्रत घेणेकामी बोलाविले होते. सदरचे दिवशी जप्त केलेल्या गावरान तुपासंदर्भात चर्चा झाली चर्चेमध्ये" जप्त केलेल्या गावरान तुपाचा साठा अखाद्य असल्याने त्याचा वापर लिक्वीड सोफ तयार करणे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



इ. अखाद्य वापरासाठी करावयाचा आहे. याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देवून लिलावाव्दारे सदरच्या जप्त केलेल्या गावरान तुपाची विक्री करण्यात यावी विक्री केल्यानंतरची सर्व रक्कम मा.सहा.आयुक्त कार्यालय, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचेकडे जमा करण्यात यावी" असे मा.श्री.माने सोा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी सांगितले आहे.

उपरोक्तप्रमाणे झालेल्या आदेशानुसार श्री.का.सु.शिंदे, अन्न सुरक्षा अधिकारी, मा.सहा.आयुक्त कार्यालय, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचे पयर्वेक्षणाखाली जनसंपर्क विभागामार्फत वर्तमान पत्रात जाहीरात देवून जप्त केलेल्या गावरान तुपाची लिलावाव्दारे विक्री करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यानंतर खालीलप्रमाणे नियोजन करता येईल. असे मत आहे.

१. संस्थानचे विहीत पद्धतीनुसार जप्त केलेल्या गावरान तुपाचे डब्यांबाबतचा लिलाव अभिलेख कक्षामार्फत करणे योग्य होईल.

२. जप्त केलेल्या गावरान तुपाचे डब्यांबाबतचा पंचनामा कायदेशीररित्या होणे गरजेचे असल्याने विधी विभागामार्फत सदरचा पंचनामा करणे योग्य होईल.

३. जप्त केलेल्या गावरान तुपाचे १३३१ डबे स्टॉक रजिस्टर नं.१ मधून कमी करावे लागेल.

४. जप्त केलेल्या गावरान तुपाचे लिलावाची व्हीडीओ शुटिंग ध्वनीक्षेपण विभागामार्फत करणे योग्य होईल.

तरी जप्त केलेल्या महारतन गावरान तुपाचे १३३१ डबे लिलावाव्दारे विक्री करणेस व सदरची रक्कम मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचे कार्यालयात जमा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे जप्त केलेले महारतन गावरान तुपाच्या १३३१ डब्यांची लिलावाद्वारे विक्री करणेकामी मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचेकडून तारीख निश्चित करुन, त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देण्यात येऊन मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचे प्रतिनिधींचे उपस्थितीत सदरच्या तुपाची जाहिर लिलावाद्वारे विक्री करणेत यावी. याकामी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, उपरोक्त प्रमाणे जप्त केलेल्या महारतन गावरान तुपाच्या १३३१ डब्यांची लिलावाद्वारे विक्री केल्यानंतर सर्व रक्कम मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचेकडे डी.डी. द्वारेजमा करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग/ मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२२** **साईआश्रम भक्तनिवास विभागातील वातानुकूलीत रुममधील टॉवेल धुण्याचे लॉण्ड्री कामासाठी उघडलेले दरपत्रकामधील दराचा तुलनात्मक तक्ता व न्युनतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** वातानुकूलीत रुममधील टॉवेल धुण्याचे दर जा.नं. एसएसएस/ वशी- साभनि /५८०४/२०१३ दि.२०/०३/२०१३ च्या कार्यादेशात मंजुर नसल्याने, मा. व्यवस्थापन त्रीसदस्य समिती दि.१७/०९/२०१३ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं.६६७ अन्वये टॉवेल धुण्याचे कामासाठी वार्षिक कोटेशन्स मागविणेत यावे असे ठरले.

सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन मंडळासमोर सादर करतांना १००% एसी रुम रुमचा वापर झाल्यास एका वर्षासाठी अंदाजे एकूण रु ५,६०,६४०/- इतका खर्च अपेक्षित होता. यानुसार उपरोक्त मा. व्यवस्थापन मंडळाचे निर्णयानुसार दरपत्रके मागविणेसाठी दैनिक वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देऊन दर मागविण्याची प्रक्रीया करावी लागणार होती. परंतु तदपुर्वी दि.२०/०६/२०१३ रोजीचे मंजुर प्रस्तावानुसार एसी रुममध्ये भक्तांचे सुविधेसाठी टॉवेल वापरणेची सुरुवात केल्याने माहे जुन २०१३ पासुन ते सप्टेंबर २०१३ अखेर फक्त ५९५९ नग टॉवेल धुण्यासाठी निघाल्याने उर्वरीत पुढील मार्च -२०१४ अखेर अंदाजे १४,०४१ नग टॉवेल धुण्यास येतील. यासाठी माहे जुन -२०१३ ते ३१ मार्च २०१४ अखेर कालावधीसाठी फक्त अंदाजे रु.८०,०००/- खर्च होणार असल्याने दि.१५/१०/२०१३ रोजी सादर करण्यात आलेले मंजुर प्रस्तावातील निर्देशानुसार, जा.नं. एसएसएस/ वशी- साईआश्रम भक्तनिवास/ ३३३२/२०१३ दि.२४/१०/२०१३ ने खालील ४ लॉण्ड्री कॉन्ट्रॅक्टरना दि.०१/११/२०१३ अखेर पर्यंत दरपत्रके पाठविणेबाबत कळविण्यात आलेले होते.

| अ.नं. | दरपत्रकाधारकाचे नाव | अ.नं. | दरपत्रकाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ०१) | श्री विजय अशोकराव चव्हाण.<br>मु.पो.सावळीविहिर,ता.राहाता,<br>जि.अहमदनगर.मो. नं. ९९७५५३३१३३ | ०२) | मे. गजानन ड्रायक्लिनर्स,<br>मु.पो.गणेशनगर,ता.राहाता,<br>जि.अहमदनगर मो. नं. ९८२२९१२९८९ |
| ०३) | मे. गजराज क्लिनर्स<br>मु. पो. ता. जि. अहमदनगर | ०४) | श्री महेश क्षत्रिय,<br>मु. पो. सिन्नर,ता.सिन्नर, जि. नासिक |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| | मो. नं. ९८९००४४३८८ | | मो. नं. ७७९८४७६६५६ |

त्यापैकी मुदती अखेर फक्त दोनच दरपत्रके प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | दरपत्रकाधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | श्री विजय अशोकराव चव्हाण.मु.पो.सावळीविहिर, ता.राहाता, जि.अहमदनगर.मो. नं. ९९७५५३३१३३ |
| ०२ | मे. गजानन ड्रायक्लिनर्स, मु. पो. गणेशनगर, ता. राहाता, जि. अहमदनगरमो. नं. ९८२२९१२९८९ |

दि.०२/११/२०१३ रोजीचे मंजुर प्रस्तावा अन्वये, दि.०६/११/२०१३ रोजी विषयांकीत सिलबंद दरपत्रक उघडण्यात आले आहेत. त्यातील दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| कामाचा तपशिल | अ.नं. | दरपत्रक धारकाचे नाव | सर्व करासह प्रतिनग दर |
|---|---|---|---|
| साईआश्रम भक्तनिवास कडील वातानुकूलीत रुम मधील टॉवेल धुणे (दरमहा अंदाजे २००० नग टॉवेल धुण्याच्या संख्येमध्ये कमी जास्त होऊ शकतात.) | १ | श्री विजय अशोकराव चव्हाण. मु.पो.सावळीविहिर, ता.राहाता, जि.अहमदनगर. मो. नं. ९९७५५३३१३३ | ०४/- |
| | २ | मे. गजानन ड्रायक्लिनर्स, मु. पो. गणेशनगर, ता. राहाता, जि. अहमदनगर मो. नं. ९८२२९१२९८९ | ०८/- |

उपरोक्त दराचा तुलनात्मक तक्त्याचा विचार करता श्री विजय अशोकराव चव्हाण, सावळीविहीर यांचे टॉवेल धुणेकामीचे दर रु.०४/- प्रति नग न्युनतम आहेत.

तसेच कामाची अडचण विचारात घेता धुऊन घेतलेल्या टावॅवेलच्या कामाचे बील व माहे मार्च २०१४ अखेर संभाव्य अदा करावयाचे बीलाबाबतचा तपशिल खालील तक्त्यात दर्शविलेला आहे.

| १ | **टॉवेल धुऊन घेतलेला तपशिल** | | **प्रति नग न्युनतम दर रुपये** | **एकुण अदा करावयाची रक्कम** | **संभाव्य खर्च** |
|---|---|---|---|---|---|
| | **कालावधी** | **टॉवेल संख्या** | | | |
| | दि. २४ जुन २०१३ ते सप्टेंबर २०१३ | ५९५९ नग | ४/- | २३,८३६/- | -- |
| २ | **पुढील कालावधीचे टॉवेल धुऊन घ्यावयाचा तपशिल (संभाव्य)** | | | | |
| | माहे ऑक्टोबर २०१३ ते ३१ मार्च २०१४ अखेर | १४०४१ नग | ४/- | -- | ५६,१६४/- |
| | | | | २३,८३६/- | ५६,१६४/- |
| | **एकुण खर्च** (२३,८३६/- + ५६,१६४ /-) | | | | **८०,०००/-** |

**सबब-**

**१)** न्युनतम दरधारक श्री विजय अशोकराव चव्हाण, मु.पो.सावळीविहिर यांना प्रति नग रु ४/- या दराने दि.२४ जुन २०१३ अखेर ते दि. ३१ मार्च २०१४ या कालावधीचे टॉवेल धुऊन घेणेकामीचा कार्यादेश व त्याकामी होणारा एकूण खर्च रु. ८०,०००/- मात्रच्या प्रस्तावास

**व**

**२)** उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे झालेल्या कामाचे (दि.२४ जुन २०१३ ते सप्टेंबर २०१३) बील रु.२३,८३६/- व पुढील कालावधीत (ऑक्टोबर २०१३ ते मार्च २०१४) होणाऱ्या संभाव्य खर्च रु. ५६,१६४/- मात्रचे खर्चाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.९११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे दि.२४ जुन २०१३ ते सप्टेंबर २०१३ चा आलेला खर्च रु.२३,८३६/- आणि पुढील संभाव्य ऑक्टोबर २०१३ ते मार्च २०१४ अखेर येणाऱ्या रु.५६,१६४/- अशा एकूण रु.८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात येऊन श्री विजय अशोकराव चव्हाण, मु.पो.सावळीविहिर यांना प्रति नग रु ४/- या दराने कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.२३** **संस्थान परिसरातील सेप्टीक टँक साफसफाईकामी मशिनरी खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** सन १९९९-२००० साली आधुनिक मशिनरीचे साहाय्याने संस्थानच्या ड्रेनेज लाईन व सेप्टीक टँकस्ची साफसफाई करण्यात आलेली होती. सदरची साफसफाई करुन सुमारे १३ वर्षाचा कालावधी झालेला आहे. आरोग्य विभागामार्फत संस्थान परिसरातील ड्रेनेज लाईनची दैनंदिन साफसफाई केली जात आहे. परंतू संस्थानच्या ड्रेनेज लाईनला शिर्डी शहरातील हॉटेल्स् व लॉजेसचे ड्रेनेज कनेक्शन जोडलेले असल्यामुळे त्यामधे मोठ्या प्रमाणात कचरा, प्लॅस्टीक, गाळ साचला जातो. त्यामुळे ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होत आहेत व परिसरात दुर्गंधी पसरते. त्याचा साईभक्तांना त्रास होतो. संस्थानचे सेप्टीक टँकस्

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



पुर्णपणे भरलेले आहेत. त्याकरिता संस्थानचे ड्रेनेज लाईनस् व सेप्टीक टँकस् मधील मटेरिअल काढणे अत्यंत गरजेचे आहे. यापुर्वी बांधकाम विभागामार्फत जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१११२६/१९९९ दि. १५/१२/१९९९ चे आदेशाने मे. सिध्दी विनायक एन्टरप्रायजेस, सोलापुर यांचेकडून आधुनिक मशिनरीच्या साहाय्याने ड्रेनेज लाईन व सेप्टीक टँकस्‌ची साफसफाई करुन घेण्यात आलेली होती. सदरची साफसफाई करुन सुमारे १३ वर्षाचा कालावधी झालेला असल्याने पुन्हा एकदा आधुनिक मशिनरीच्या साहाय्याने ड्रेनेज लाईन व सेप्टीक टँकस्‌ची साफसफाई करुन घेणे गरजेचे वाटते.

सन १९९९ साली मे. सिध्दी विनायक एन्टरप्रायजेस, सोलापुर यांचेकडून सेप्टीक टँकस् सफाई रु. ८४९/- प्रती घन ब्रास दराने व ६" ते ९" ड्रेनेज लाईन - रु. १३८.२५ प्रत्येक रनिंग मिटर ९" ते १८" ड्रेनेज लाईन रु. १७७.२५ प्रत्येक रनिंग मिटर १८" ते ३६" ड्रेनेज लाईन रु. २४८.८५ प्रत्येक रनिंग मिटर दराने काम केलेले आहे.

बांधकाम विभागाने दिलेल्या माहितीनुसार संस्थानचे सेप्टीक टँकस् अंदाजे १५४६ घन ब्रास इतके असून वरील तिन्ही साईजच्या अंतर्गत ड्रेनेज लाईनची प्रत्येकी १००० मीटर प्रमाणे एकुण लांबी अंदाजे ३००० रनिंग मीटर इतकी आहे.

**अ)** संस्थान मधील एकुण सर्व सेफ्टीक टँकच्या (एकूण १५४६ घन ब्रास) साफसफाईचे काम करावयाचे झाल्यास सध्याचे बाजारभावाप्रमाणे अंदाजे रु. २५००/- प्रती घन ब्रास दराने रु. २५००x१५४६ = **रु. ३८,६५,०००/-** इतका खर्च अपेक्षीत आहे.

**ब)** संस्थानच्या वेगवेगळया साईजच्या अंतर्गत ड्रेनेज लाईनची साफसफाई करावयाचे झाल्यास त्यासाठी सध्याचे बाजारभावाप्रमाणे अंदाजे खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

१. ६" ते ९" ड्रेनेज लाईन (१००० मीटर) रु. २५० रनिंग मिटर x १००० = रु. २५००००/-
२. ९" ते १८" ड्रेनेज लाईन (१००० मीटर) रु. ३२५ रनिंग मिटर x १००० = रु. ३२५०००/-
३. १८" ते ३६" ड्रेनेज लाईन (१००० मीटर) रु. ४७५ रनिंग मिटर x १००० = रु. ४७५०००/-

एकूण अंदाजे रु. १०,५०,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

संस्थानचे सेफ्टीक टँक मशीनरीच्या साहाय्याने साफसफाई करणेकामी रु. ३८,६५,०००/- व ड्रेनेज लाईन मशीनरीच्या साहाय्याने साफसफाई करणेकामी रु.१०,५०,०००/- एकूण अंदाजे रु. ४९,१५,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

इतर नगर पालिका, महानगर पालिका आदि ठिकाणी सेप्टीक टँकची साफसफाई कशी केली जाते याबाबत माहिती घेणेसाठी आरोग्य विभाग प्रमुख व कर्मचारी यांनी दि. ०८/११/२०१३ रोजी श्रीरामपूर नगरपालिका श्रीरामपूर येथे आरोग्य विभाग प्रमुख श्री. श्रीधर व्हटकर यांची त्यांचे कार्यालयात जावून भेट घेतली. त्यावेळी त्यांनी संस्थानचे अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचेकडे असलेली अहमदाबादच्या मनियार कंपनीची सेप्टीक टँक उपसा करणारी गलिमन ट्रेलर मशिनरी दाखवून तिचे प्रात्यक्षिक एका सार्वजनिक शौचालयाचे सेप्टीक टँकमधे करुन दाखविले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, सेप्टीक टँकचे सफाईसाठी गलिमान ट्रेलर अती उपयोगाचा आहे त्याची क्षमता ३५०० लिटर असून त्याने ३० मीटर खोलीपर्यंतचे मटेरीयल काढता येते. सदर मशिनरी श्रीरामपूर, मुर्तिजापूर, धुळे, मुंबई कार्पोरेशन आदि ठिकाणी कार्यरत आहे. श्रीरामपूर यांनी सन २००६ साली ट्रेलर घेतलेला आहे. त्यांना आजतागायत काहीही मेंटनन्स आलेला नाही. सदर मशिनरी अत्यंत लाभदायक असून सन २००६ पासून आमचेकडे कार्यरत आहे. तसेच सदर मशिनने सेप्टीक टँक मधील मटेरीयल उपसा करुन वाहून नेवून टाकता येते व टँक बंदिस्त असल्याने वाहून नेताना दुर्गंधी येत नाही. सेप्टीक टँकमधील गाळ फोडून ओढण्याची क्षमता आहे. सदर मशिनरीची अंदाजे किंमत ६,५०,०००/- मात्र आहे. तसेच त्यांचेकडे मूल जेट नावाची एक थ्री व्हीलर मधे फिटींग असलेली मशिनरी आहे. त्याचा उपयोग, ड्रेनेज चोकअप काढणे, लाईन स्वच्छ करणे, लाईन सफाई, फायर, आदि कामांसाठी होतो. त्याची क्षमता ५०० लिटर आहे. त्यामुळे ड्रेनेज लाईन व चेंबर स्वच्छ करता येतात तसेच अडकलेला गाळ प्रेशरने निघून जातो. सदर मशिन ॲपेरिक्षात फिट असून कमी जागेत जावून अंतर्गत ड्रेनेज लाईन सफाईकामी त्याचा चांगला उपयोग असून अंदाजे किंमत रुपये ६,७५०००/- एवढी असल्याचे सांगितले.

उपरोक्त अ आणि ब मधील कामांसाठी ठेकेदाराकडून काम करुन घेणेस अंदाजे एकूण रुपये ४९,१५,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. त्याऐवजी इतर महानगरपालिका, नगरपालिका यांचे प्रमाणे मशिनरी खरेदी केली तर गलीमॅन ट्रेलरसाठी रु.६,५०,०००/- आणि मूल जेट साठी रु.६,७५,०००/- असे एकूण रु. १३,२५,०००/- मात्र खर्च येईल.

उपरोक्त कामे ठेकेदाराकडून करणे कामी अंदाजे रु.४९,१५,००० इतका खर्च होईल. त्यापेक्षा संस्थानने स्वत:ची मशिनरी घेणे योग्य वाटते कारण खरेदीचा खर्च रु. १३,२५,०००/- इतका होईल. म्हणजे संस्थानचा रुपये ३५,९०,०००/- इतका खर्च कमी होईल व नेहमीचे कामासाठी त्याचा वापर करता येईल. सदरचे वाहन युक्त मशिनरीचे खरेदीची कार्यवाही वाहन विभागामार्फत करता येईल. मशिनरी खरेदीबाबत वाहन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय घेतला असता त्यांनी गलीमन ट्रेलर व मूल जेट या दोन्ही

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मशिनरींची प्रत्यक्ष पाहणी केली. दोन्ही मशिनरी उपयुक्त असून खरेदी करणेस हरकत नाही असा अभिप्राय दिला आहे.

तरी गलीमॅन ट्रेलर (३५०० लिटर क्षमता) व मूल जेट (५०० लिटर क्षमता) ही वाहन युक्त मशिनरी वाहन विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१३,२५,०००/- (अक्षरी रुपये तेरा लाख पंचविस हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरातील सेप्टीक टँक साफसफाईसाठी आवश्यक असलेले सक्शन मशिन (ट्रेलर माऊंटेड ३५०० लिटर क्षमता) व जेट मशिन या वाहन युक्त मशिनरी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१३,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाचे मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- आरोग्य विभाग/ वाहन विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२४** **नवीन ट्रेलर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष साहेब यांनी दि.०९/१०/२०१३ रोजी श्री साई निवास अतिथीगृहाच्या समोरील बाजुस परिसरातील जमा होणारा कचरा खाली जमिनीवर टाकण्या ऐवजी पर्यायी वाहनाची व्यवस्था करणे बाबत तोंडी आदेश दिले होते.

सध्या वाहन विभागाकडे खालील प्रमाणे ट्रेलर वापरात आहेत.

| अ.नं. | वाहन क्रमांक | वापर |
|---|---|---|
| ०१ | MH-17-AF-5645 | मंदीर परिसरातील हारा करीता (कायम स्वरुपी) |
| ०२ | MH-17-AF-9099 | प्रसादालय खरकाटे अन्नाकरिता (कायम स्वरुपी) |
| ०३ | MH-17-AF-6001 | बांधकाम, बगीचा, प्रसादालय, मंदीर, विद्युत विभागाचे मागणीनुसार वापर |
| ०४ | MH-17-AF-5545 | |
| ०५ | MH-17-AF-0848 | |

उपरोक्त पाच ट्रेलर पैकी अ.नं.०१ व ०२ चे ट्रेलर बगीचा व प्रसादालय विभागाचे कामासाठी कायम स्वरुपी दिलेले असलेने दैनंदिन कामाकरीता तीन ट्रेलरच उपलब्ध असतात, पैकी अ.नं. ०५ चा ट्रेलर टुव्हिलर लहान (१ टनी) असलेने जड कामाकरीता त्याचा वापर होत नाही.

उर्वरित अ.नं.०३ व ०४ या दोन ट्रेलरसाठी बांधकाम विभाग, स्वच्छता विभाग (कचरा वाहतुक) मंदीर विभाग (गौरी वाहतुक) यांचेकडून नियमित मागणी असते तसेच गर्दीचे कालावधीत श्री साईबाबा भक्त निवासस्थान येथे बाहेरील जागेत पार्किंगमध्ये मंडपात साईभक्तांची निवासाची व प्रसाद भोजनाची सोय करण्यात येते सदर ठिकाणी पत्रावळी साठविणे करीता व वाहतुकीकरीता ट्रेलरची आवश्यकता असते व ट्रेलर तेथे उभा ठेवावा लागतो, तसेच पाणी टंचाईचे काळात श्री साईबाबा भक्त निवासस्थान, द्वारावती निवासस्थान, व श्री साईबाबा प्रसादालय या ठिकाणी सर्रास पत्रावळीचा वापर केला जातो, व त्या पत्रावळी टाकणेकरीता प्रसादालयकडून प्रत्येक ठिकाणी ट्रेलरची मागणी करणेत येते, अशावेळी वेळेवर ट्रेलर भाडोत्री मिळत नाहीत/ उपलब्ध होत नाहीत.

त्यामुळे साईनिवास (अतिथीगृह) परिसरात जमा होणारा कचरा टाकणे कामी उपलब्ध ट्रेलर मधुन एक ट्रेलर देता येणार नाही. सदर ठिकाणी कचरा साठवुन/ वाहतुक करणे कामी एक ट्रेलर कायम स्वरुपी देणे झाल्यास एक नवीन दुचाकी हायड्रोलिक ट्रेलर खरेदी करावा लागेल. या कामी अंदाजे रु.१,४०,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख चाळीस हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी नवीन ट्रेलर खरेदी कामी परिसरातील नामांकित ट्रेलर बनविणारे पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन बोलाविणेस व या कामी येणाऱ्या रु.१,४०,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख चाळीस हजार मात्र) चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागासाठी आवश्यक असलेला नवीन ट्रेलर खरेदीकामी परिसरातील नामांकित ट्रेलर बनविणारे पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन बोलाविणेस व याकामी येणाऱ्या रु.१,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५** **नवीन एक क्रेन व एक टाटा ४०७ वाहने खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१० व ११ जुलै रोजी केंद्रीय गुप्तचर विभाग (आय.बी.), राज्य गुप्तवार्ता विभाग आणि दहशतवादी विरोधी पथक (एटीसी) नाशिक व अहमदनगर यांच्यावतीने श्री साईबाबा मंदिर शिर्डी येथील सुरक्षा आढावा संयुक्तपणे घेण्यात आलेला आहे. सुरक्षा आढावा दरम्यान काही त्रुटी आढळुन आल्या याबाबत

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मा.पोलीस अधिक्षक सो., अहमदनगर दि.११/०९/२०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी (श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी) यांचे अध्यक्षतेखाली मिटींग घेण्यात आली होती.

सदर मिटींग मध्ये झालेल्या चर्चेनुसार संदर्भिय आदेशान्वये, पोलीस विभागाकरीता रोडवर उभी राहणारी चारचाकी वाहने उचलणेसाठी आणखी एक क्रेन व मोटारसायकल उचलणेसाठी ४०७ टेम्पो देणेबाबत व्यवस्थापन मंडळासमोर टिपणी सादर करणे बाबत कळविण्यात आलेले आहे.

क्रेन खरेदी करणे पुर्वी शिर्डी पोलीस स्टेशन यांना कशा प्रकारचे क्रेनची आवश्यकता आहे या बाबत इकडील जा.न.एसएसएस/वाहन/२९२६/२०१३, दि.३०/०९/२०१३ रोजीचे पत्राने, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांना विचारणा करण्यात आली असता, पोलीस निरीक्षक (वाहतुक शाखा), शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांनी त्यांचे कडील पत्र क्रं.६७९/२०१३, दि.०२/१०/२०१३ रोजीचे पत्राने १५ टन वजना पर्यंत जडवाहतुक वाहन ओढण्याची तसेच इतर लहान वाहने टोईंग करण्याची सोय असलेल्या क्रेनची आवश्यकता असले बाबत कळविलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांनी कळविलेनुसार, क्रेन खरेदी करावयाचे झाल्यास अशोक लेलॅण्ड/ टाटा कंपनीचे १६१३ या मॉडेलची चेसीज खरेदी करुन त्यावर नामांकित बॉडीबिल्डर यांचेकडून आपले आवश्यकतेनुसार क्रेन माउंटींग करुन घेता येईल. तसेच मोटार सायकली उचलणे करीता टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून एक टाटा४०७ टेम्पो खरेदी करता येईल. सदर दोन्ही वाहने खरेदी करणे कामी अंदाजे रु.४१,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकेचाळीस लाख मात्र) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

तरी **अ)** १५ टन क्षमतेचा एक क्रेन बनविणे कामी अशेक लेलॅण्ड/ टाटा कंपनीचे अधिकृत डिलर्स यांचेकडून १६१३ या मॉडेलची चेसीज खरेदी कामी तसेच सदर वाहनावर क्रेन माउंटींग करुन घेणे करीता बॉडीबिल्डर्स यांचेकडून कोटेशन बोलाविणेस व **ब)** एक टाटा४०७ वाहन खरेदी कामी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलाविणेस आणि सदर दोन्ही वाहने खरेदी कामी येणाऱ्या रु.४१,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकेचाळीस लाख मात्र) चे खर्चास प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रस्त्यावर उभी राहणारी चारचाकी वाहने उचलणेसाठी शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांना पुर्वीप्रमाणेच भाडोत्री क्रेन देणेत यावे.**

**तसेच, छोटी वाहने, मोटारसायकल्स उचलणेकामी नवीन टाटा- ४०७ टेम्पो देणेसाठी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर्सकडून कोटेशन बोलविणेत यावे. याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६** **भाडोत्री मालवाहतुक वाहनांचे बीलाबाबत.**

**निर्णय क्र.९१५** **सदरहू विषय मागे घेण्यात आला.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **संस्थान वापरासाठी निळवंडे धरणातून पाणी आरक्षण ठेवणेपोटी संस्थान निधीतून रु.५०० कोटी निधी शासनास उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.४ अन्वये संस्थानला वाढीव पाणी पुरवठा होणेसाठी लोकवर्गणीच्या १० % रक्कम भरुन या योजनेसाठी अनुदान मंजुर करुन घेणेसाठी मा.मंत्री महोदय यांची तारीख घेवून, त्यांचे समवेत मा.विश्वस्तांच्या समितीने बैठक लावून चर्चा करावी व अनुदान मंजुर करुन घेणेसाठी प्रयत्न करावे. तसेच यापुर्वी संस्थानकरीता थेट दारणा व निळवंडे धरणातून पाणी आणणेकामी सर्व्हे करण्यात आलेला आहे. त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सन्मा.नामदार प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांना मा.अध्यक्ष यांनी दि.०१/०३/२०११ चे पत्राव्दारे विनंती वजा प्रस्ताव सादर केला आहे. तद्नंतर दिनांक १२/०६/२०११ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४१ अन्वये संस्थानसह कनकुरी, पिंपळवाडी, निमगांव-को-हाळे या गावांसह वाढीव पाणी पुरवठा योजना लवकरात लवकर कार्यान्वित करणे संदर्भात महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा व त्याची प्रत मा.जिल्हाधिकारी यांना माहितीसाठी देण्यात यावी असे ठरले.

मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, संगमनेर यांनी जा.क्रं./ तांशा/ १७५०/ २०११, दिनांक १७/०९/२०११ चे पत्रान्वये कळविले आहे की, अहमदनगर जिल्हयातील शिर्डी व राहाता मतदार संघातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत सुरु असलेल्या विविध पाणी पुरवठा योजनांची आढावा बैठक मा.मंत्री, कृषी व पणन यांचे अध्यक्षतेखाली दि.८/८/२०११ रोजी मंत्रालयात संपन्न झाली. बैठकीच्या प्राप्त झालेल्या इतिवृत्तानुसार निळवंडे धरण उद्भव घेवून नविन शिर्डी देवस्थान पाणी पुरवठा योजना तयार करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर योजनेचे सर्वेक्षण व त्यानुसार सविस्तर

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



अंदाजपत्रक व आराखडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत तयार करावयाचे असल्याने त्याकामी २ % Preparation Charges च्या against महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सुरुवातीस कमीत कमी रु.१५.० लक्ष इतका निधी त्वरीत वर्ग करणेत यावा म्हणजे पुढील कार्यवाही करणे शक्य होईल असे कळविले आहे.

संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रमांक ०४, दि. १३/०२/२०११ अन्वये संस्थानसाठी स्वयंचलित पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत राबविणेचे ठरले असून त्यानुसार सदर योजनेबाबत कार्यवाही जीवन प्राधिकरणामार्फत सुरु आहे. सदर प्रकल्पाचे सर्वेक्षण, प्लॅन व एस्टिमेट तयार करणे कामासाठी संस्थानतर्फे मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, संगमनेर यांना रु.१० लाख मात्र इतका निधी दि. २३/११/२०११ रोजी धनाकर्षाव्दारे उपलब्ध करणेत आलेला आहे.

**संदर्भ क्रं.१** अन्वये मा.मंत्री, कृषी व पणन, महाराष्ट्र राज्य यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित पत्रात शिर्डी परिसर निळवंडे धरणांपेक्षा भौगोलिकदृष्टया खालच्या बाजूस असल्याने पाणी पुरवठयासाठी विजेचा खर्च लागणार नाही. तसेच निळवंडे धरणाचा उद्‌भव असल्याने साठवण तलावाच्या भुसंपादनासाठी बांधकामासाठी मोठया प्रमाणावर येणारा खर्च वाचणार आहे. निळवडे धरणांतून पाणी आरक्षण ठेवण्यापोटी संस्थानचे डाव्या कालव्याच्या कामांसाठी पाचशे कोटी निधी शासनास उपलब्ध करुन दिल्यास कालव्याचे काम जलद गतीने पुर्ण होवू शकेल व निळवंडे कालव्याची कामे पुर्ण झाल्यास कालव्याव्दारे पाणी पुरवठा झाल्याने बाजूच्या गावांतील भूजल पातळीत वाढ होवून विहीरींना पाणी उपलब्ध राहू शकेल. यामुळे शिर्डी शहरावरील पाण्याचा ताण कमी होऊ शकणार आहे. सदरचा प्रस्ताव शिर्डी शहर, श्री साई संस्थान परिसराच्या दृष्टीने महत्वपुर्ण असलेल्या या प्रकल्पाबाबत विचार विनिमय करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांचे उपस्थितीत सर्व संबंधीतांची तातडीने बैठक आयोजित करणेबाबत विनंती केलेली आहे.

**संदर्भ क्रं.०२,** महाराष्ट्र शासन, पत्र क्रं. सासवि-२०१२/सं.क्र.४९२/सोळा,विधी व न्याय विभाग,मंत्रालय यांचे दिनांक ५ नोव्हेंबर,२०१२ चे पत्र प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी मा. श्री राधाकृष्ण विखे पाटील,मंत्री, कृषी व पणन, महाराष्ट्र राज्य यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित पत्रात नमुद केलेल्या मुद्दयांचे अनुषंगाने श्री साईबाबा संस्थानचे अभिप्राय पाठविण्यात यावेत अशी विनंती केलेली आहे.

सदर प्रकल्पासाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत अद्याप निर्णय झालेला नसल्याने मा. विधी व न्याय विभाग,मंत्रालय महाराष्ट्र शासन मुंबई यांना संस्थान अभिप्राय देण्यात आलेला नाही.

**संदर्भ क्रं.३,** अन्वये मा.मंत्री, कृषी व पणन, महाराष्ट्र राज्य यांनी निळवंडे धरणाच्या कामांसाठी आवश्यक सुमारे १२०० कोटी रुपयापैकी ५०० कोटी रुपये संस्थानने उपलब्ध करुन दिल्यास दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा प्राप्त होण्याबरोबरच संस्थानला कायमस्वरुपी शाश्वत पाणी पुरवठा होऊ शकणार आहे. तरी संस्थानसाठी निळवंडे धरणांतून पाईपलाईन करण्यापुर्वी कालव्यांच्या कामांसाठी संस्थानकडुन ५०० कोटी रुपये निधी राज्यशासनास उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

तरी याबाबत योग्य तो आदेश होणेसाठी सदरचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.९१६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८ शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना दि.०१.०४.२०१३ ते दि.३१.०३.२०१४ या कालावधीची विशेष स्वच्छता कर/ आरोग्य कर (नाके) अनुदान अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **१)** शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी देशातून व परदेशातून दररोज हजारो साईभक्त येतात. संस्थानतर्फे साईभक्तांना आवश्यकतेप्रमाणे सेवा सुविधा देण्यात येतात. तसेच शिर्डी नगरपंचायतीमार्फत देखिल आवश्यक उपाय योजना राबविल्या जातात. शिर्डी नगरपंचायतीकडून दि.०१/०४/१९९२ पासून वाहन कर (विशेष स्वच्छता व आरोग्य कर) आकारला जात होता. मात्र या कर आकारणीमुळे भक्तांच्या भावना दुखावतात व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडूनच सदरचे कराची आकारणी होते, असा साईभक्तांचा गैरसमज निर्माण होतो, असे दिसून आले.

शिर्डी नगरपंचायतीने अशी कर आकारणी करु नये, यासाठी संस्थानने जा.नं. एसएसएस/ वशी-०२/१३२१०/२००४ दि. ३१/१२/२००४ चे पत्राने शिर्डी नगरपंचायतीस लेखी कळविले होते. याबाबत नगरपंचायतीने दि. ११/०५/२००५ चे पत्राने टोल नाक्यापासून प्रतिवर्ष मिळणाऱ्या रक्कमे एवढी रक्कम त्यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत मिळावी. सन २००४-०५ साली रुपये-४५,६१,९९०/- एवढी रक्कम त्यांना प्रतिवर्षी मिळावी व प्रतिवर्षी त्यात २०% वाढ करण्यात यावी, असे संस्थानला कळविण्यात आले होते.

नगरपंचायतीचे उपरोक्त पत्राबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत सविस्तर चर्चा होऊन शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना द्यावयाच्या अनुदानाबाबत तत्वःता मान्यता देण्यात आली. शिर्डी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



नगरपंचायत शिर्डी यांना द्यावयाच्या रक्कमेबाबत मा.जिल्हाधिकारी,अ.नगर व स्थानिक विश्वस्त यांचे समंतीने निर्णय घ्यावयाचे ठरले. त्यानंतर दि.०१/१०/२००५ रोजीचे सल्लागार परिषद सभेमध्ये भक्तांकडुन शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना स्वच्छता व आरोग्य (प्रदुषण) नियंत्रण कर आकारु नये, यासाठी शिर्डी नगरपंचायतीने मागणी केलेली रक्कम प्रतिवर्षी रुपये- ४०,००,०००/- (अक्षरी रुपये- चाळीस लाख) मात्र म्हणजेच प्रति ३ महिन्यास रुपये- १०,००,०००/- (अक्षरी रु.- दहा लाख) आगाऊ देण्यात यावे, असे मा.जिल्हाधिकारी, अ.नगर यांनी सांगितले व सर्वानुमते त्यांस मान्यता देण्यात आली.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/११/२००५ च्या सभेत विषय नं.०२, निर्णय क्रं.६५१ (६) उपरोक्त प्रमाणे रक्कम अदाईसाठी मान्यता देणेत आली. तसेच याकामी शासनाची परवानगी घ्यावी, असे ठरले.

**२)** उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी भक्तांकडुन स्वच्छता व आरोग्य (प्रदुषण) कर आकारु नये. भक्तांच्या सोईसाठी अनुदान रक्कम रु.- ४०,००,०००/- (अक्षरी रु. चाळीस लाख) मात्र शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना प्रतिवर्षी देण्यास मान्यता मिळणेकामी संस्थानने

जा.नं.एसएएसएस/वशी-०२/१३०५४/०५ दि.०९/११/२००५ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव सादर केला होता. त्यावर महाराष्ट्र शासनाचे क्र. बैठक २०१०- प्र.क्र.१६/१०/का-सोळा विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई दि. ७/०४/२०१० रोजीचे पत्रा सोबतचे दि. २७/०१/२०१० रोजीचे बैठक इतिवृत्तात रक्कम रु.५०,००,०००/- मात्र दर वर्षी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना अदा करणेबाबत मान्यता दिलेली आहे. परंतू त्याबात इतिवृत्ता शिवाय वेगळा आदेश आलेला नाही.

**३)** दरम्यानच्या काळात संस्थानने शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना मा.व्यवस्थापन मंडळाच्या ठरावास अनुसरुन शासन मान्यतेस अधिन राहुन खालील प्रमाणे रक्कम अदा केलेली आहे.

**नोव्हेंबर-२००५ ते मार्च-२०१२ अखेर शिर्डी नगरपंचायत यांना अदा करण्यात आलेली रक्कम-**

| अ.नं. | शिर्डी नगरपंचायत यांचे कडील मागणी दिनांक/ महिना | शिर्डी नगरपंचायत यांना अदा केलेली रक्कम | मा.व्यवस्थापन मंडळाचा ठराव क्रं. निर्णय क्रं. | शिर्डी नगरपंचायत यांना अदा केलेली रक्कम पा.क्र. |
|---|---|---|---|---|
| ०१ | नोव्हेंबर-/डिसेंबर -०५ ते जानेवारी -२००६ | रु.१०,००,०००/- | दि.०४/०२/२००६ आ.वे.वि.नं.२३, निर्णय क्रं.९८ | पा.न.५०३०३ दि.१३/०३/२००६. |
| ०२ | फेब्रुवारी /मार्च / एप्रिल-२००६ | रु.१०,००,०००/- | दि.०३/०६/२००६ आ.वे.वि.नं.३३,निर्णय क्रं.४०८ | पा.न.५१७४६ दि.२७/०६/२००६. |
| ०३ | मे-२००६ ते जुलै-२००६ | रु.१०,००,०००/- | दि.१४/१०/२००६,आ.वे.वि. नं.४४,निर्णय क्रं.८२७ | पा.न.५३२२९ दि.१९/१०/२००६. |
| ०४ | ऑगष्ट-२००६ ते ऑक्टोबर-२००६. | रु.१०,००,०००/- | दि.०६/०१/२००७ आ.वे.वि.नं.३८,निर्णय क्रं.१०६ | पा.न.५४६६४ दि.२६/०१/२००७. |
| ०५ | नोव्हेंबर/ डिसेंबर-०६, ते जानेवारी-२००७ | रु.१०,००,०००/- | दि.०६/०१/२००७ आ.वे.वि.नं.३८,निर्णय क्रं.१०६ | पा.न.५४६७९ दि.१३/०३/२००७. |
| ०६ | फेब्रुवारी-२००७ ते डिसेंबर-२००७ | रु.३६,६६,६६६/- | दि.१०/०१/२००८ आ.वे.वि.नं.२२,निर्णय क्रं.१३३ | पा.न.५६७०७ दि.०१/०२/२००८. |
|  | जानेवारी-२००८ ते जून-२००८ | रु.२०,००,०००/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.१९, निर्णय क्रं.६२४ | पा.न. २६७६ दि.१६/०७/२००८. |
| ०८ | जून -२००८ अखेर १०% वाढ | रु.९,५९,९९९/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५,निर्णय क्रं.५९३ | पा.न.६३४४० दि. १८/०८/२००८. |
| ०९ | जुलै-२००८ ते ऑगष्ट-२००८ | रु.८,०६,६६६/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.न.४६२२५१ दि.१८/१०/२००८. |
| १० | सप्टेबर-२००८ ते डिसेंबर-२००८ | रु.१६,१३,३३२/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.न.६५५१० दि. १८/०२/२००९. |
| ११ | जाने.२००९ ते मार्च -२००९ | रु.१२,०९,९९९/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.नं.६६८८९ दि.०४/०५/२००९ |
| १२ | एप्रिल २००९ ते मार्च २०१० | रु. ५०,००,०००/- | शासन मंजूरी क्र. २०१०/ (प्र.क्र.१६/१०/का.सोळा विधी व न्याय विभाग, मुंबई येथील विशेष सभा दि.२७/०१/२०१० रोजी सभेतील विषय नं.१३ अन्वये मंजूरी | पा.नं. ७६७०२ दि. १४/०५/२०१० |
| १३ | एप्रिल २०१० ते मार्च २०११ | रु. ५०,००,०००/- | शासन मंजूरी क्र. २०१० / (प्र. क्र. १६ / १० / का. सोळा विधी व | रु. ५०,००,०००/- युनियन बँक शाखा, |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | न्याय विभाग, मुंबई येथील विशेष सभा दि. २७/ ०१/ २०१० रोजी सभेतील विषय नं.१३ अन्वये मंजूरी व दि. २६/०३/२०११ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभे तील विषय नं.४१ निर्णय क्र.२४१ अन्वये | शिर्डी चा चेक क्र. ५८७७४१ दि.०८/०६ / २०११ ने रक्कम अदा केली पावती क्र. ८५९०६ दि. ०६/०७/२०११ |
| **१४** | एप्रिल २०११ ते जुन २०११ | रु.१२,५०,०००/- | शासन मंजूरी क्र. २०१० / (प्र. क्र. १६ / १० / का. सोळा विधी व न्याय विभाग, मुंबई येथील विशेष सभा दि. २७/ ०१/ २०१० रोजी सभेतील विषय नं.१३ अन्वये मंजूरी व दि. २८/०८/२०११ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभे तील विषय नं.५७ निर्णय क्र. ६५२ व दि. २४/०९/२०११ विषय नं. १ निर्णय क्र. ६७४ अन्वये. | रु.१२,५०,०००/- कार्पोरेशन बँक शाखा, शिर्डी चा चेक क्र.०३९१७२ दि. १८ /१०/ २०११ ने रक्कम अदा केली पावती क्र. ८५९४७ दि.२९/१०/ २०११ |
| **१५** | जुलै २०११ ते सप्टेंबर २०११ | रु.१२,५०,०००/- | वरिल प्रमाणे | रु.१२,५०,०००/- कार्पोरेशन बँक शाखा, शिर्डी चा चेक क्र. ३८८९२ दि. १९/०३/ २०१२ ने रक्कम अदा केली पावती क्र. ९१३५० दि. ३०/०३/२०१२. |
| **१६.** | आक्टोबर ११ ते मार्च २०१२ | रु.२५,००,०००/- | वरिलप्रमाणे | रु. २५,००,०००/- युको. बँक शाखा, शिर्डी चा चेक क्र. ९६४५८०, दि. ०१/०८/२०१२ ने रक्कम अदा केली. |
| | **एकुण रक्कम रुपये-** | **रु.३,०२,५६,६६२/-** | | |

**४)** शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी जा.क्रं.नपं/साप्र/कावि-०१/८६/२०१३ दि.१७/१०/२०१३ रोजीच्या पत्राने शिर्डी नगरपंचायतीस दिपावली, नाताळ निमीत्त होणाऱ्या गर्दीचे नियोजन करणेसाठी शहरातील विविध विकास कामे करावयाची असून त्याकरीता निधीची आवश्यकता असल्यामुळे खालील प्रमाणे रक्कम मिळणेस विनंती केली आहे.

१) माहे ०१ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च-२०१३ अखेरची रक्कम रु. ५०,००,०००/-

२) माहे ०१ एप्रिल २०१३ ते ३० सप्टेंबर २०१३ अखेरची रक्कम रु. २५,००,०००/-

३) माहे ०१ ऑक्टोंबर २०१३ ते ३१ मार्च-२०१४ अखेरची रक्कम रु. २५,००,०००/- (आगाऊ)

अशी एकुण रु. १,००,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी ) अनुदान लवकरात लवकर मिळणेस विनंती केलेली आहे.

५) शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी यापुर्वीच जा.क्रं.नपं/साप्र/कावि-०१/२२९/२०१३ दि.१३/०२/२०१३ रोजीच्या पत्राने माहे ०१ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च-२०१३ अखेरची रक्कम रु. ५०,००,०००/- मिळणेस विनंती केलेली आहे. त्याबाबत मा.त्रिसदस्य समितीच्या दि. २७/०४/२०१३ रोजीचे सभेतील विषय नं. ६८ निर्णय क्र. ४११ अन्वये रक्कम रु. ५०,००,०००/- शिर्डी नगरपंचायतीस अदा करणे कामी शासन मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवून शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद योचेकडील मान्यता घेऊन सदरची रक्कम अदा करणेचे प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तुतचे ठरावास अनुसरुन व त्याआगोदर जा.क्र. एसएसएस वशी- विधी/५९३५/२०१३ दि. २८/०३/२०१३ व जा.क्र. एसएसएस वशी - विधी/ १९१६ /२०१३ दि. २२/०७/२०१३ चे पत्राने मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांना शिर्डी नगरपंचायतीस अदा करावयाचे रु. ५०,००,०००/- चे रक्कमेस मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यावर शासनाकडून अद्याप काहीही निर्णय आलेला नाही.

६) शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी जा.क्रं.नपं/साप्र/कावि-०१/८६/२०१३ दि.१७/१०/२०१३ रोजीच्या पत्राने माहे ०१ एप्रिल २०१३ ते ३० सप्टेंबर २०१३ अखेरची रक्कम रु. २५,००,०००/- व माहे ०१ ऑक्टोंबर २०१३ ते ३१ मार्च-२०१४ अखेरची रक्कम रु. २५,००,०००/- (आगाऊ) असे एकुण रु. ५०,००,०००/- मिळणेस विनंती केलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त परिस्थीतीचा विचार करता माहे ०१ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च-२०१३ अखेरचे रक्कम रु. ५०,००,०००/- चे अदाईबाबत शासनाची मान्यता व मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेबाबत मा.त्रिसदस्य समितीचा निर्णय झालेला असल्याने सदरची रक्कम सद्यस्थीतीत अदा करता येणार नाही. शासनाची व मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेनंतर सदर रक्कम अदा करणे शक्य होईल.

आता माहे ०१ एप्रिल २०१३ ते ३० सप्टेंबर २०१३ अखेरची रक्कम रु. २५,००,०००/- व माहे ०१ ऑक्टोंबर २०१३ ते ३१ मार्च-२०१४ अखेरची रक्कम रु.२५,००,०००/- असे एकुण रु. ५०,००,०००/- अदाईबाबत महाराष्ट्र शासनाचे सासंवि-२०११/५३८/प्र.क्र. ६९/ पुर्नबांधणी -१२/का.सोळा विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचे दि. २३/०१/२०१३ रोजीचे पत्रानुसार रक्कम अदाईबाबत शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यानुसार रक्कम रु. ५०,००,०००/- शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना अदा करणे कामी प्रथम शासन मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवून शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतर पी.आय.एल. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं. १२०५६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालयाचे दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशाचा विचार करता मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेऊन रक्कम अदा करणेबाबतचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.९१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना दिल्या जाणाऱ्या विशेष स्वच्छता कर/ आरोग्य कर (नाके) अनुदानाबाबत अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही. शासनाकडून मान्यता आल्यानंतर संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी व त्यानंतर सदरहू अनुदान शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना आदा करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.२९** **शिर्डी येथील आरक्षित जागा, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांसाठी संपादित करण्याकरिता निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद अहमदनगर यांचे दि.०८/१०/२०१३ चे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे. शिर्डी नगरपंचायतीने, जि.प.प्राथमिक शाळेसाठी श्री.रंगनाथ शिवराम गोंदकर यांचे सर्वे नं.५३/६ या जागेवर आरक्षण क्र.२४ अन्वये आरक्षण टाकलेले आहे. श्री. गोंदकर यांनी नगरपंचायतीकडे चालु बाजारभावाप्रमाणे आरक्षित जागा खरेदी करुन रुपये १४,७९,५०,०००/- (चौदा कोटी एकोणऐंशी लाख, पन्नास हजार) ची मागणी केली आहे. अन्यथा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५० अन्वये आरक्षित केलेल्या जागेवरील आरक्षण वगळण्यात यावे, (शासकीय दराप्रमाणे सदरच्या जागेची किंमत रु.६,०८,२४,४००/- इतकी आहे.) शिर्डी हे आंतराष्ट्रीय क्षेत्र असल्याने लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे अतिरिक्त शाळांची गरज भासणार आहे. त्यामुळे सदरचे आरक्षित क्षेत्र संपदित करण्यासाठी निधीची मागणी ग्राम विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे केली होती. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दि.०१.१०.२०१३ चे पत्राने, शिक्षण हक्क अधिनियमानूसार जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी जागा आवश्यक असल्यास जिल्हा परिषदेने जागा संपादनाकरिता त्यांच्या स्वतंत्र फंडातून आवश्यक ती तरतूद करावी डअसे कळविले आहे. सदर निधी जिल्हा परिषद उपलब्ध करुन शकत नाही. तरी सदर निधीस श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचेकडून खास बाब म्हणून मंजूरी देण्यात यावी, अशी विनंती केली आहे. तसा राहाता पंचायत समितीचा ठराव क्र.७८ झालेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधियम २००४ चा कलम २१ मधील (२) पोट कलम (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे. "एखाद्या नोंदणीकृत सार्वजनीक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून शैक्षणिक संस्था वा क्रिडा अकादमी अथवा संस्था, सार्वजनिक वाचनालय, दवाखाना, निराश्रीत अथवा शारीरीक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृहे किंवा इतर धर्मदाय अथवा धार्मिक संस्था, कला वा साहित्य क्षेत्रांशी सबंधीत असलेली एखादी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून स्थापना वा देखभाल करुन घेण्यासाठी छाननी समितीच्या शिफारसीनूसार व राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने अनुदान देण्याची तरतुद आहे. मात्र सदर अधिनियमात शासकीस-निमशासकीय संस्थांना अनुदान देण्याबाबत तरतुद नाही.

आरक्षित जागा संपादित करणेसाठी लागणारा निधी श्री साईबाबा संस्थान कडुन देणेबाबतचा प्रस्ताव निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.९१८** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३)

---

**विषय नं.३०** **खुले नाटयगृह व त्यासमोरील जागेत भजनाचे कार्यक्रमास परवानगीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री ए.एन.रेड्डी, हैद्राबाद यांनी दि २५/१०/२०१३ अर्जान्वये दि.२४/१२/२०१३ ते दि.३१/१२/२०१३ अखेर मागील वर्षाप्रमाणे खुले नाटयगृह येथे अखंड भजनाचे कार्यक्रमास परवानगी तसेच खालील प्रमाणे इतर सुविधा मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दिनांक १०/०१/२००८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१० खालील प्रमाणे झालेला आहे.

दि.२८/०७/२००७ सभेत निर्णय क्र.५७४ अन्वये साईभक्त ए.एन.रेड्डी ,चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर, ए.एम.आर कन्स्ट्रक्शन लि.हैद्राबाद यांना श्री चे सिंहासनासाठी व श्री च्या मुर्तीच्या पाठीमागील भिंतीवर जे चांदी काम केलेले आहेत. त्यासाठी सर्व काम सोन्यामध्ये तयार करुन देणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार श्री रेड्डी यांनी सुमारे ११ कोटी खर्च करुन ९६ किलो वजनाचे श्री चे सिंहासन व श्री च्या मुर्तीच्या पाठीमागील भिंतीवरची प्रभावळ इ. (भितींवर जे चांदी काम केलेले आहे त्याठिकाणी) सर्व काम सोन्यामध्ये करुन दिलेले आहे.

तसेच त्यांच्या कुटुंबियातील फक्त खालील व्यक्ती शिर्डीस येतील. त्या त्या वेळेस त्यांना प्रत्येकी जास्तीत जास्त १० कुटुंबियासमवेत तहयात आरती व दर्शन व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी. तसेच दि. २० डिसेंबर ते ३१ डिसेबर पर्यत त्यांचे मार्फत लेडीबागेत आयोजित करण्यात येणाऱ्या नाम सप्ताहास कायम स्वरुपी मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

त्यानुसार ए.एन.रेड्डी यांना सन २००७ पासून ते २००९ पर्यत लेडीबागेजवळ असलेल्या मोकळया जागेत भजन करण्यास परवानगी देण्यात आली होती. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० च्या सभेत निर्णय क्र.३१५ नुसार "श्री ए.एन.रेड्डी, हैद्राबाद यांचेसह कोणासही मंदिर परिसरात तसेच लेडीबागेत भजन व अन्य कार्यक्रमासाठी परवानगी देण्यात येवू नये. असे ठरले आहे. त्यानंतर सन २०१० पासून लेडीबाग ऐवजी खुले नाटयगृहात भजन करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

| अ.नं. | मागणीचा तपशिल | कार्यालयीन अभिप्राय |
|---|---|---|
| १ | दि. २४/१२/२०१३ ते ३१/१२/२०१३ या कालावधीत खुले नाटयगृह व त्यासमोरची जागा मिळावी. | विशेष देणगीदार साईभक्त असलेने मागील वर्षाप्रमाणे सदर जागेवर भजनास परवानगी देता येईल. |
| २ | इलेक्ट्रीक कनेक्शन, साऊंड सिस्टीम संस्थानकडून मिळावी | वीज वापर ५ केव्हीपेक्षा जास्त असेल तर वीज पुरवठयाची व्यवस्था सबंधीत अयोजकांनी स्वतः करावयाची आहे. जर वीज वापर ५ केव्हीपेक्षा कमी असेल तर आयोजकाकडून डिपॉझिट म्हणून रक्कम रु.३०००/- भरुन घेणे. मिटरप्रमाणे (महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या चालू आकारानुसार) वापरलेले वीजेचे बील देऊन डिपॉझिट मधून या बीलाची रक्कम वजा करुन घेऊन राहिलेली रक्कम त्यांना परत दयावी. |
| ३ | साईभक्त निवासस्थान मध्ये साधारणतः ४०० साईभक्तांसाठी खोल्या व त्यांना जेवण तयार करण्यासाठी जागा मिळावी. | या कालावधीत गर्दी जास्त असल्याने तसेच काही खोल्यांचे आरक्षण ऑन लाईन होत असलेने उपलब्धते नूसार खोल्या सशुल्क देता येतील. खोल्या उपलब्ध नसल्यास त्यांची निवासाची व्यवस्था आयोजकांना करावी लागेल. तसेच जेवण करणेसाठी जागा उपलब्ध नसलेने त्यांनी इतरत्र जेवण तयार करणेसाठी व्यवस्था करावी. |

तरी श्री रेडडी यांना दिनांक २४/१२/२०१३ ते ३१/१२/२०१३ या कालावधीत खुले नाटयगृह व त्यासमोरील जागेत भजन करण्यास परवानगी दयावी किवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रेडडी यांना दिनांक २४/१२/२०१३ ते ३१/१२/२०१३ या कालावधीत खुले नाटयगृह व त्यासमोरील जागेत भजन करण्यास परवानगी देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१** **व्हेट्रीफाईड टाईल्स देणगी दाखल स्विकारणेस तसेच सदरचे टाईल्स मोरबी (गुजरात) ते शिर्डी पर्यंतचे टाईल्स वाहतुकीचे व टाईल्स उतरवुन घेणेकरीता हमाली बील रोखीने आदा करणेसाठी आगाऊ रक्कम मिळणेबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** **(अ)** मा. संचालक, सिम्पोलो व्हेट्रीफाईड प्रा. लि., मोरबी (गुजरात) यांचा दिनांक १३ नोव्हेंबर २०१३ रोजी इकडील विभागात दुरध्वनी आला असता त्यांनी संथानला त्यांचे कंपनीमार्फत नव्याने उत्पादन चालू केलेल्या ६०० mm x ९०० mm साईजच्या CREMA शेडच्या ४८० बॉक्स देणगी दाखल पाठविलेले असून त्याची किंमत खालीलप्रमाणे कळविलेली आहे.

1. Crema Vitrified Tiles: (600 x 900 mm)- 480 box @ Rs. 780 Per box= 3,74,400/-
2. Ass. Value 55% = Rs. 2,05,920/-
3. Taxes and duties = Rs.29,268/-

यासाठी वहातुक खर्च (Transport) व टाईल्स उतरवून घेण्याचे काम संस्थानमार्फत करुन घेणेस देणगीदार यांनी विनंती केली आहे. याकरीता रु. ३०,९७५/- मात्र वहातुक खर्च तसेच टाईल्स उतरवून घेणेकरीता रु. १,७००/- असा एकूण रु. ३२,६७५/- मात्र खर्च येणार आहे.

**(ब)** देणगीदार यांनी देणगी दाखल दिलेल्या टाईल्स (४८० बॉक्स) ची किंमत रु. २,०५,९२०/- मात्र बिलात दर्शविलेली आहे. परंतू त्यांनी सदर रकमेवरील फक्त टॅक्सेसची रु. २९,२६८/- मात्र रक्कम एकूण बिलात दिलेली आहे. देणगीदार यांनी बिलात दर्शविलेल्या प्रमाणे टाईल्सची बाजारातील प्रत्यक्षात किंमत रु.३,७४,४००/- मात्र आहे. सदरचे टाईल्स संस्थान इमारतीचे दुरुस्ती देखभाल कामासाठी वापरता येतील.

तरी उपरोक्तप्रमाणे सिम्पोलो कंपनीमार्फत आलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स देणगी दाखल स्विकारणेस व त्याकरीता रोखीने अदा केलेल्या वहातुक खर्च व हमाली बिल रु.३२,६७५/- मात्र चे खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे सभेत कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९२० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ रुग्णालयांसाठी वैद्यकीय संचालक, निवासी उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक व इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांचे जाहिरातीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे दोन्ही रूग्णालयांकरीता वैद्यकीय संचालक, निवासी उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अिाक्षक व इतर वैद्यकीय अधिकारी व इतर पदे भरणेच्या मान्यतेस्तव मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील ॲप्लीकेशल दाखल करण्यात आले होते. सदरचे ॲप्लीकेशनवर मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर दि. १३/०८/२०१३ रोजी सुनावणी होऊन, उपरोक्त पदे जाहिरातीद्वारे भरणेस मान्यता दिलेली आहे.

मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार कार्यवाही करणेच्या मान्यतेस्तव त्रिसदस्यीय समितीचे दि. १७/०९/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६९९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी असे ठरले. त्यास अनुसरुन देशातील प्रमुख शहरांमध्ये टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ या वर्तमान पत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करणेकामी मान्यता देण्यात आलेली आहे. सदरची जाहीरात संस्थान जनसंपर्क कार्यालयामार्फत मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०९/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७८६ अन्वये शासकिय दराने डीएनए- मुंबई, न्यू एक्सप्रेस चेन्नई, पायोनारो दिल्ली, डेक्कस कोमीयला, हैद्राबाद, पुढारी नगर-पुणे या वर्तमानपत्रात व संस्थान वेबसाईवर प्रसिध्द करणेत आली आहे.

उपरोक्त जाहीरातीस अनुसरून वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक, न्युरोलॉजीस्ट, फिजिशियन, ऑर्थोपेडीक सर्जन या महत्वाच्या पदांसाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नसून इतर वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडीकल पदांसाठी अतिशय कमी प्रतिसाद मिळत आहे. अर्ज सादर करण्याची अंतीम मुदत दि. १६/११/२०१३ ठेवण्यात आलेली आहे. परंतु जाहिरातीस पाहिजे तसा प्रतिसाद आजपावेतो मिळाला नाही.

जाहीरातीतील पदे महत्वाची असल्याने व ती तातडीने भरणे आवश्यक असल्याने सदर पदांची फेर जाहीरात देशातील प्रमुख शहरांमध्ये टाईम्स ऑफ इंडिया, इडियन एक्सप्रेस, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ या वर्तमानपत्रात देण्यात यावी व तसा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे प्र. वैद्यकीय संचालक यांनी सुचविले आहे.

तरी वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्रायाप्रमाणे देशातील प्रमुख शहरांमध्ये टाईम्स ऑफ इंडिया, इडियन एक्सप्रेस, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ या वर्तमानपत्रात फेर जाहीरात देणेस व त्याकामी अंदाजे रूपये दहा लाख खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.९२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित कामी विशेष बाब म्हणून देशातील प्रमुख शहरांमधील टाईम्स ऑफ इंडिया, इडियन एक्सप्रेस, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ या वर्तमानपत्रामध्ये संस्थान रुग्णालयांसाठी वैद्यकीय संचालक, निवासी उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक व इतर वैद्यकीय अधिकारी पदे भरावयाची आहेत व इच्छूक उमेदवारांनी संस्थानच्या वेबसाईटला भेट द्यावी, याप्रमाणे जाहीरात देणेत यावी, असे ठरले.**

**तसेच, याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **आयकर कायदा १९६१ कलम ३५ एसीच्या देणगीवर १००% सुट असलेल्या प्रकल्पाचे नुतनीकरण व त्याचे मानधन आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला आयकर कायदा १९६१ कलम ३५एसी अंतर्गत देणगी प्राप्त होणेसाठी संस्थानने केद्र संरकारकडे रुपये ७५ कोटीचा प्रस्ताव सादर केला होता. त्यास २००५-०६ पासून तीन वर्षासाठी मान्यता देण्यात आली होती. सदर प्रस्ताव सादर करणेपासून ते त्यासंबंधीत पुढील संपूर्ण कामकाज पहाणेसाठी तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ५ नोव्हेंबर, २००५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय क्र. ७२५ नुसार श्री अभय ए. शास्त्री ॲन्ड असोशिएटस्, पुणे यांची मानधनावर नेमणुक करण्यात आली होती. प्रत्येक तीन वर्षानंतर या प्रकल्पाचे नुतनीकरण करण्यात येते. सदरील प्रस्ताव सादर करणेपासून ते त्यासंबंधीत पुढील संपूर्ण कामकाज श्री अभय ए. शास्त्री ॲन्ड असोशिएटस्, पुणे हे करीत आलेले आहेत. श्री अभय ए. शास्त्री ॲन्ड असोशिएटस्, पुणे यांना सदर प्रकल्पाचे सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ पर्यंतचे नुतनीकरण व त्यासंबंधीचे काम पुर्ततेसाठी रुपये २,५०,०००/- मानधन देण्यास मा. व्यवस्थापन समितीच्या २१ नोव्हेंबर २०१० च्या बैठकीतील निर्णय क्र. ९०० नुसार मान्यता दिली होती.

३५ एसी प्रकल्पाची मुदत ३१ मार्च, २०१४ रोजी संपत आहे. आक्टोबर २०१३ अखेर सदर प्रकल्पा अंतर्गत रु. १६,९३,५५,६३३/- रक्कम जमा झालेली असून, पुढील तीन वर्षासाठी (सन २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७) प्रकल्पाचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. सदर तीन वर्षाचा कालावधी वाढविण्यासाठी श्री अभय ए. शास्त्री ॲन्ड असोशिएटस्, पुणे यांनी त्यांचे दिनांक ६ नोव्हेंबर, २०१३ चे पत्र संस्थानला दिले आहे. या पत्राप्रमाणे त्यांनी सदर प्रस्ताव नुतनीकरणासाठी केंद्र शासनाला सादर करणे तत्संबंधीचे कामकाजासाठी एकूण रुपये ३,५०,०००/- ची मागणी पुढीलप्रमाणे केली आहे :

(अ) प्रस्ताव स्विकारलेनंतर : रुपये ५०,०००/-
(ब) प्रस्तावास मान्यता मिळालेनंतर : रुपये ३,००,०००/-

वरीलप्रमाणे श्री अभय ए. शास्त्री ॲन्ड असोशिएटस्, पुणे यांना ३५एसी अंतर्गत देणगी प्रकल्पाची मुदतवाढ घेणेसाठी व इतर संबंधीत अनुषंगीक कामकाजासाठी त्यांनी मागणी केलेल्या मानधन रु. ३,५०,०००/- च्या ऐवजी त्यांना रु.३,००,०००/- मानधन पुढीलप्रमाणे अदा करावे असे मत आहे:

(अ) प्रस्ताव नुतनीकरणाचे काम स्विकारतांना : रुपये ५०,०००/-
(ब) रिपोर्ट तयार करुन केंद्र शासनाला सादर केल्यानंतर : रुपये ५०,०००/-
(क) प्रकल्पास मंजुरी मिळाल्यानंतर त्याचे विवरण केंद्र : रुपये २,००,०००/-
सरकारला सादर केल्यानंतर पहिल्या वर्षी रुपये १,००,०००/-
नंतरच्या दोन वर्षी प्रत्येकी रुपये ५०,०००/- प्रमाणे

वरीलप्रमाणे ३५एसी च्या अंतर्गत स्विकारणेत येणाऱ्या देणगी प्रकल्पास पुढील तीन आर्थिक वर्षासाठी (सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७) केंद्र शासनाकडून नुतनीकरण करण्यास व त्यांचे संपूर्ण कामकाज पहाण्यास श्री अभय ए. शास्त्री ॲन्ड असोशिएटस्, पुणे यांना त्याबाबतचा आदेश व रुपये ३,००,०००/- मानधन देण्याचा प्रस्तावास मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.९२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास, शासकीय नियमाप्रमाणे सेवाकरासहीत रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **सोने व चांदी नाण्यांच्या विक्री किंमतीचे बदलाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्रींची प्रतिमा असलेली सोन्याची ५ ग्रॅम, १० ग्रॅम वजनाची व चांदीची २० ग्रॅम वजनाची नाणी तसेच २.५ ग्रॅम सोन्याचे पेंडन्टस साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ जुलै, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५९८ अन्वये, सोने-चांदीच्या बाजाराभावात वेळोवेळी जसजशी वाढ अथवा घट होईल त्याप्रमाणात यांच्या विक्री मुल्यात वाढ अथवा घट करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त निर्णयान्वये, दिनांक १८ सप्टेंबर, २०१३ ते २६ आक्टोंबर, २०१३ या कालावधीत सोने व चांदीचे बाजारभावात वाढ तथा घट (संदर्भः- दैनिक सकाळ) झाल्याने मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात वेळोवेळी, सोने-चांदी नाणी व पेंडन्टसच्या विक्री मुल्यात बदल करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रमाणे विक्री मुल्यात केलेल्या बदलाचे विवरण खालील प्रमाणे-

| अ. क्र. | दरात बदल केल्याचा दिनांक | सोने २.५ ग्रॅम | सोने ५ ग्रॅम | सोने १० ग्रॅम | चांदी २० ग्रॅम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | १८/०९/२०१३ | ८,२००/- | १६,१००/- | ३२,०००/- | १,१५०/- |
| ०२. | २६/१०/२०१३ | ८,५००/- | १६,७००/- | ३३,२००/- | १,१५०/- |

तरी सोने-चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीचे नाणी व पेंडंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दिनांक १८ सप्टेंबर २०१३ ते २६ आक्टोबर २०१३ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलास कार्योत्तर मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सोने-चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीचे नाणी/ पेंडंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दि. १८ सप्टेंबर २०१३ ते दि.२६ आक्टोबर २०१३ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री दत्त जयंती निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेस परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री राजेंद्र डंग, दिल्ली यांनी कळविले की, श्री दत्त जयंती- २०१३ निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन देण्यास तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान,संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी स्वरुपात सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

श्री मुकेश गुप्ता यांना श्री पुण्यतिथी उत्सव-२०१३, श्री राजेंद्र तलवार, यांनी दिपावली निमित्ताने फुलांची सजावाट करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच संरक्षण विभागा मार्फत फुल सजावटीचे सामान तपासणी करण्यात येते, फुल सजवाटीचे काम करणारे कारागीर यांचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर व फोटो इ. माहिती घेण्यात येते.

श्री राजेंद्र डंग, दिल्ली यांनी श्री दत्त जयंती निमित्ताने दि.१६/१२/२०१३. रोजी फुल सजावट करणेस परवानगी देणेस व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०७/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र .६०९ अन्वये देणगीदार यांना राहण्यासाठी ०१ AC रुम, दर्शन, भोजन पास व फुल सजावट करणारे कारागीर यांना सामान ठेवणेसाठी हॉल व जेवाणाची व्यवस्था संस्थान मार्फत मोफत करता येईल

तरी फुल सजावट करणेस व देणगीदार,फुल सजावट करणारे कारागीर यांना राहण्याची, जेवणाची, दर्शनाची सोय करणेस मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.९२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे मान्यवरांना श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका सन २०१४ विनामुल्य भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४.कलम नं.१७.(ठ) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**<u>१७ (ठ) समितीचे कर्तव्ये व अधिकार</u>**

**"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्याच्यां विहत व त्यांची शिकवण या बाबतच्या माहीतीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहीत्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील."**

श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार म्हणून इतर प्रकाशनाखेरीज दर वर्षी संस्थान मार्फत साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशीत केली जाते.

दरवर्षी व्हीआयपी, व्हीव्हीआयपी संस्थान कामा संदर्भातील विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी वगैरेना तसेच मा. अध्यक्ष महोदय, मा विश्वस्त, मा. कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी महोदय,व सर्व प्रशासकीय अधिकारी यांना संस्थानच्या वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका विनामुल्य भेट म्हणुन दिल्या जातात व त्याची रक्कम प्रकाशने विभाग खाते (Publication Expenses) खर्ची टाकली जाते.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सन.२०१४ च्या दैनंदिनी व दिनदर्शिका संस्थानतर्फे विनामूल्य भेट देणेकामी संबंधीतांना देणेस खालील प्रमाणे मान्यता असावी.

| अ. नं. | तपशील | दैनंदिनी २०१४ किंमत रु.५५/- | साई दिनदर्शीका १ पानी (लहान आकारात) किंमत रु.१५/- | साई दिनदर्शीका १ पानी (मोठ्या आकारात) प्रती किंमत रु.२०/- |
|---|---|---|---|---|
| ०१ | मा.विधिमंडळ सदस्य | ५०० | ५०० | - |
| ०२ | मा.अध्यक्ष महोदय | १०० | १०० | १०० |
| ०३ | मा.सदस्य, त्रिसदस्य समिती | १०० | १०० | १०० |
| ०४ | मा.कार्यकारी अधिकारी महोदय | १०० | १०० | १०० |
| ०५ | मा.उपकार्यकारी अधिकारी महोदय | १०० | १०० | १०० |
| ०६ | प्रशासकीय अधिकारी/ प्र.प्रशासकीय अधिकारी ५ (प्रत्येकी २५ प्रमाणे) | १२५ | १२५ | १२५ |
| ०७ | पत्रकार | २५० | - | - |
| ०८ | जनसंपर्क कार्यालय तसेच विविध विभाग प्रमुख | गरजेनुसार | गरजेनुसार | गरजेनुसार |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१२.२०१२ सभेतील निर्णय क्र.१०५० अन्वये सन्माननीय साईभक्तांना संस्थानतर्फे वेळोवेळी प्रकाशने/ फोटो/ दिनदर्शिका, सी.डी. उपलब्धतेप्रमाणे सप्रेम भेट देण्याची प्रथा आहे. तसेच सन्माननीय साईभक्तांचा सत्कार करण्यात येतो. सदर पध्दतीस मा.व्यवस्थापन समितीची दि.१२.०६.२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४२९ नुसार स्थायी मान्यता मिळालेली आहे. सदर खर्चास एकत्रित मा.व्यवस्थापन समितीची मान्यता आर्थिक वर्षाअखेर घेणेत येते.

मागिल वर्षी श्री संजय काळे, सामाजिक कार्यकर्ते यांनी माहितीचा अधिकारात उपरोक्तप्रमाणे विनामुल्य श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिका वाटप करणेस विरोध दर्शविल्यामुळे वाटप करण्यात आले नाही.

सबब उपरोक्तप्रमाणे श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका सन-२०१४ विनामुल्य भेट देणेकामी तरतुद करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७ राष्ट्रीय शालेय खो खो स्पर्धा सन २०१३-१४ आयोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** कलम २१(२) (एक) मध्ये आर्थिक अनुदान देणेबाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे.

राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने व छाननी समितीच्या मान्यतेने एखादया नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतेही शैक्षणिक संस्था क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरीक दृष्या विकलांग व्यक्तीनसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करुन घेणेसाठी अथवा कला व साहित्य क्षेत्राशी सबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांना अनुदान देण्याची तरतुद आहे

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** दि.२७/१०/२०१३ च्या मा.त्रिसदस्यीय समितीच्या सभेत साई आश्रम (धर्मशाळा) पदयात्री, पालखी, शाळेतल्या सहली, तसेच रुग्णालयाकडील पेशेंटचे नातेवाईक यांना विनामुल्य देणेबाबत व क्रिडा, स्पर्धा आयोजीत करणारे संयोजक स्पर्धक किंवा बाहेरील ट्रिप घेऊन येणारे यात्रेकरु यांचेसाठी उपलब्ध असल्यास रुपये १०/- प्रति माणसी रितसर देणगी पावतीकरुन साईआश्रम धर्मशाळा देणेबाबतचा निर्णय झालेला आहे.

**प्रस्ताविक-** उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा क्रीडा परिषद अहमदनगर यांनी दि.१/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये "राष्ट्रीय शालेय स्पर्धा आयोजनाचा बहुमान मिळाला आहे. या स्पर्धेसाठी देशातील २८ राज्यातून ६७२ खेळाडू, १०० सामनाधिकारी, व ५० इतर शासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. उत्कृष्ठ स्पर्धा आयोजनासाठी उत्तम निवास, भोजन व क्रिंडागण असणे आवश्यक आहे.

शिर्डी शहर हे भारतातील तीर्थ-स्थानापैकी एक असून स्पर्धेसाठी आवश्यक असणारे खेळाडूंची निवासव्यवस्था ही संस्थानच्या अधिपत्याखालील भक्तनिवासमध्ये करणे शक्य आहे. तसेच भोजन हे संस्थानच्या प्रसादालयामध्ये आणि क्रिडांगण हे साईबाबा संकुलाच्या क्रिडांगणावर करणे शक्य आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तसेच स्पर्धेचे यजमान पद साईबाबा संस्थानने स्विकारावे किंवा उपरोक्त सुविधा उपलब्ध करुन सहकार्य करावे" असे नमुद केले आहे.

दि.१३/११/२०१३ चे पत्राने राष्ट्रीय शालेय खो खो स्पर्धेचे आयोजन शिर्डी येथे करण्याचे निश्चित झाले आहे. त्यांनी नमुद केलेल्या पत्रात स्पर्धा आयोजन खर्चाचे अंदाजपत्रकानुसार अंदाजीत खर्च रु.३९,६३,०००/-

**मागणी-** उत्कृष्ठ स्पर्धा आयोजनासाठी

१) निवासव्यवस्था खर्च रुपये-४,५०,०००/-
२) भोजन व्यवस्था रुपये -१४,००,०००/-
३) क्रिडांगण व्यवस्था रुपये ३,५०,०००/-
४) मंडप स्पिकर लाईट व प्रेक्षक गॅलरी रुपये -८,५००००/-
५) वाहतुक खर्च रुपये -१,००,०००/-
६) बक्षिसे रुपये - २,००,०००/-
७) पंच /सामनाधिकारी, स्वयंसेवक रुपये -३,६३,०००/
८) उद्घाटन व समारोप खर्च रुपये -५०,०००/-
९) प्रसिध्दी खर्च रुपये - १,००,०००/-
१०) सादिल खर्च रुपये- १,००,०००/-

एकुण खर्च ३९,६३,०००/- (एकोण चाळीस लाख, त्रेसष्ठ हजार रुपये मात्र) उपरोक्त खर्चासह संपुर्ण व्यवस्था संस्थानमार्फत करावी अशी विनंती केली आहे. (शासनास खर्चाची बीले सादर केल्यानंतर शासन रुपये २,००,०००/- अनुदान मंजुर करते. असे कळविले आहे.) तसेच ज्या त्या राज्यातील खेळाडूंना ते ते राज्य जेवणाचा खर्च व सामनाधिकारी यांना टि.ए व डी.ए देत असते.

**संस्थान अधिनियम/ ठरावः- यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** सन २००४ चा अधिनियम कलम २१ (२) (एक) या अधिनियमात नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था किंवा नोदणीकृत सोसायटी यांना क्रिडा अकादमीसाठी छाननी समितीच्या शिफारशीनुसार व शासनाच्या पुर्व मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे. मात्र सदरची संस्था हि शासकीय असल्याने सदर संस्था छाननी समितीच्या अखत्यारीत येत नाही.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** १) उपरोक्त कार्यक्रम हा संस्थानचा नसून तो जिल्हा क्रिडा परिषद, अहमदनगर यांचा असल्यामुळे त्याचा संपुर्ण खर्च संस्थानला करता येणार किंवा तो कार्यक्रम संस्थानला स्वतः राबविता येणार नाही.

२) सध्या छाननी समिती अस्तित्वात नाही. यजमान पद घेऊन कार्यक्रम करणे हे संस्थानच अधिनियमात कुठेही बसत नाही. त्यांनी अवास्तव खर्चाची मागणी केलेली आहे.

३) मागील वर्षी त्यांनी अशा कार्यक्रमासाठी रुपये २,००,०००/- लाखाची मागणी केलेली होती. तो कार्यक्रम होऊन गेल्यामुळे सदर प्रस्ताव मागे घेण्यात आला होता. अशा इतर कार्यक्रमांना अनुदान दिल्यास राज्य पातळीवर, जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर स्पर्धांसाठी आर्थिक अनुदान मागणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४) उपरोक्त कार्यक्रमास खासदार निधी/ आमदार निधीतून अनुदान मिळत असते असे चर्चेचे वेळेस सांगितले.

५) उपरोक्तप्रमाणे अनुदान दयावयाचे झाल्यास मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे मान्यतेने सदर प्रस्ताव राज्यशासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येऊन शासनाच्या मंजुरीनंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**निर्णय क्र.९२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, राष्ट्रीय शालेय खो खो स्पर्धा सन २०१३-१४ करीता येणारे खेळाडू, सामनाधिकारी, शासकीय अधिकारी यांची निवासव्यवस्था संस्थानचे साईधर्मशाळा या निवासस्थानामध्ये व गट नं.१७२ मधील साईधर्मशाळे शेजारील मोकळे पटांगण त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.**

**तसेच, त्यांची संस्थानचे श्री साईप्रसादालयामध्ये सशुल्क भोजन व्यवस्था इतर साईभक्तांप्रमाणेच करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **सन २००७ साली पुरग्रस्तांसाठी खरेदी केलेल्या चादरी बाबत.**

**प्रस्ताव-** सन २००७ मध्ये नैसर्गीक आपत्ती निर्माण होऊन नदया नाल्यांना पुर आल्याने विशेषतः गोदावरी नदीकाठी व परिसरात अनेक लोकांची घरे विस्थापीत झाली होती. अशा लोकांना मदत म्हणुन देण्याकरीता संस्थानने सोलापूर चादरी खरेदी केल्या होत्या.

यातील काही सोलापूर चादरी पुरग्रस्तांना वाटप करुन उरलेल्या चादरी धर्मशाळा विभागास वर्ग

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



करण्यात आल्या होत्या. दि. ५/०३/२००९ रोजी द्वारावती निवासस्थानची इमारत भक्तांना निवासासाठी सुरु करण्यात आली. धर्मशाळा विभाग बंद करुन इमारत साईनाथ रुग्णालय विभागास हस्तंतरीत करण्यात आली. धर्मशाळा विभागाचा डेडस्टॉक द्वारावती भक्तनिवास विभागाकडे वर्ग करण्यात आला. यामध्ये उपरोक्त चादरीचा समावेश आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | संगणक कोड नं. | तपशील | नग | प्रती नग किंमत रुपये | एकूण किंमत रुपये | खरेदी तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | CLT/८८०१ | सोलापुर चादर | ४९३ | ८८/- | ४३,३८४/- | २७/१२/२००७ |
| २ | CLT/८८०२ | सोलापुर चादर | १५०० | ८८/- | १,३२,०००/- | २७/१२/२००७ |
| | | एकूण | १९९३ | - | १,७५,३८४/- | |

उपरोक्त १९९३ नग चादरीची नोंद या विभागाच्या डेडस्टॉकला आहे.सदरच्या चादरी या निवासस्थानांमध्ये वापरात असलेल्या चादरी सारख्या नसून साध्या आहेत.त्यामुळे साईभक्तांच्या वापरात आणता येणार नाही.

**अ)** त्यापैकी ९०० नग चादरीचा वापर झालेला नसल्याने पॅकींग मध्ये आहे. खरेदी केल्यापासुन ते आज पावेतो या चादरी इकडील विभागास पडून आहेत. काही दिवस अजून पडून राहील्यातर खराब होऊन घडयावर विरण्याची शक्यता नाकरता येत नाही.

**ब)** १०९३ नग चादरीचा वापर धर्मशाळा विभागाच्या रुम व जनरल हॉल तसेच उत्सव काळात भक्तांच्या निवासासाठी तात्पुरत्या स्वरुपात टाकण्यात आलेल्या साईनगर मंडपात व साईनाथ हायस्कूल मध्ये भक्तांसाठी वापर करण्यात आलेला आहे.

दिनांक १४/११/२०१३ अन्वये वनवासी कल्याण आश्रम,महाराष्ट्र जिल्हा अ.नगर जिल्हाध्यक्ष (उत्तर नगर) यांनी त्यांचे पत्रात वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही. सध्या हिवाळ्याची सुरुवात असल्याने वनवासी विद्यार्थ्यांच्या अंगावर पांघरण्यासाठी चादरींची आवश्यकता असल्याने खालील तपशिलात दर्शविलेल्या प्रमाणे विद्यार्थ्यांसाठी चादरीं मिळणेची विनंती केली आहे.

त्यानुसार उपरोक्त नवीन व वापर झालेल्या चादरी संबंधीत आश्रमाचे प्रतिनिधी श्री अशोक गोंदकर, श्री केकाणे सर यांना प्रत्यक्षपणे दाखविण्यात आल्या. त्यानुसार त्यांनी पत्राद्वारे सदरच्या नवीन व वापर झालेल्या सर्व चादरी आम्ही स्वखुशीने विनातक्रार घेण्यास तयार आहोत, असे कळविले आहे.

| अ.नं | जिल्हयाचे नाव | वसतीगृहाचे ठिकाण | वसतीगृहामधील विद्यार्थी संख्या | अ.नं | जिल्हया चे नाव | वसतीगृहाचे ठिकाण | वसतीगृहामधील विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | १. सुरगाणा | ४१० | ५. | नंदुरबार | १. कानडी | ३५ |
| | | २. कनाशी | ४० | | | २. अकलकुआ | ३४ |
| २ | धुळे | १. धुळे | ३५ | ६. | नांदेड | १. किनवट | १५ |
| ३ | ठाणे | १. बेरिस्ते | ३० | ७. | रायगड | १. जोंभिवली | ३० |
| | | २. चलतवड | ३८ | | | २. चिंचवाली | ३९ |
| | | ३. विक्रमगड | ४४ | | | ३. कोठिबा | २७ |
| ४ | पुणे | १. भोर | २२ | | | ४. माणगांव | ४४० |
| | | | | ८. | अ.नगर | १. अकोले | ४३ |
| | | | | | | **एकूण संख्या** | १२८२ |

उपरोक्त या विभागातील उपलब्ध चादरी वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र यांना वाटप करणे बाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, द्वारावती निवासस्थान)

---

**दि.१४.११.२०१३ चे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९ संस्था मंदिर परिसरात चालवत असलेल्या व्यवसायांचे नविन जागेत स्थलांतर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **१)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१० चे सभेतील विषय नं. ७६ निर्णय क्र. ५९७ अन्वये सविस्तर चर्चा होवून, व्यवस्थापन समितीचे दि.१०/०१/२०१० चे सभेतील निर्णय क्र. १९२ अन्वये ठरलेनुसार संस्थान मंदीर परिसरातील श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप. सोसायटीस देण्यात आलेले गाळे मंदीर परिसराबाहेर हलविल्यासच मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले आहे.

श्री साईबाबा समाधी मंदीर परिसरातील सदर स्टॉल खालील प्रमाणे आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | व्यवसायाचे नांव | ठिकाण |
|---|---|---|
| ०१ | एस.टी.डी.बुथ | शांती निवास उत्तर गेट स्टॉल |
| ०२ | दुध स्टॉल नं.०१, | अब्दुल बाबा समाधी जवळ गाळा |
| ०३ | दुध स्टॉल नं. | मुख्य प्रवेशव्दार गेट नं.०२ उत्तर गेट पश्चिमेस गाळा |
| ०४ | दुध स्टॉल नं.०६, | मुख्य प्रवेशव्दार गेट नं.०२ उत्तर गेट पुर्वेस गाळा |
| ०५ | दुध स्टॉल नं.०७, | शांतिनिवास दर्शन लाईन गेट गाळा |
| ०६ | दुध स्टॉल नं.०८, | भक्तनिवास दर्शन लाईन स्टॉल |

उपरोक्त स्टॉल/ गाळे मंदीर परिसराबाहेरील बाजूस स्थलांतरीत/ बंद करण्याबाबत पतपेढीस लेखी व तोंडी कळविण्यात आलेले असून त्यास अनुसरुन संस्थेस खालील ठिकाणी व्यवसाय करणेस जागा अथवा गाळे उपलब्ध करुन मिळावे अशी विनंती सोसायटीने आता दि. १०/११/२०१३ चे पत्राने केलेली आहे.

| अ.क्र. | ठिकाण | संख्य |
|---|---|---|
| १ | साईप्रसाद इमारतीचे नैऋत्य बाजू परिसर | मोकळी जागा |
| २ | व्दारावती निवासस्थान परिसर | ०२ गाळे/ जागा (इमारतीचे खालील बाजूस पार्किंगचे ठिकाणी) |
| ३ | श्री साई कॉम्प्लेक्स इमारत | ०२ गाळे |
| ४ | साईआश्रम फेज-१ | १० गाळे / जागा |
| ५ | नविन प्रसादालय परिसर | ०२ गाळे व १ मोकळी जागा |
| ६ | साईआश्रम फेज- २ | ०२ गाळे |
| ७ | मंदिर परिसराचे गेट नं. ४ | गेट नं. ४ चे बाहेरील बाजूस मोकळी जागा |
| | **नविन साईभक्तनिवास इमारतीमधील खालील प्रमाणे** | |
| १ | नविन साईभक्तनिवास इमारत डि ब्लॉक | गाळा नं. २ |
| २ | नविन साईभक्तनिवास इमारत डि ब्लॉक | गाळा नं. ३ |
| ३ | नविन साईभक्तनिवास इमारत डि ब्लॉक | गाळा नं. ४ |
| ४ | नविन साईभक्तनिवास इमारत डि ब्लॉक कॅन्टीन जवळ | मोकळी जागा |

उपरोक्त पत्राने साईभक्तनिवास इमारतीतील तात्पुरते बंद असलेले व संस्थेच्या ताब्यात असलेले पुन्हा संस्थेस पुर्ववत सुरु करणेस परवानगी मिळावी तसेच नविन भक्तनिवासस्थान इमारतीचे मेन गेट चे आतिल बाजूस पुर्वी संस्था चालवित असलेले क्लोकरुम जे सध्या श्री साई संस्थान मार्फत चालविले जात आहे ते पुन्हा संस्थेस चालविण्यास मिळावे अशी विनंती सोसायटीने केलेली आहे. तसेच उपरोक्त नमुद केलेल्या सर्व ठिकाणी संस्थेस व्यवसाय करण्यास गाळे, मोकळी जागा हे पुढील ५ वर्षा करीता भाडे तत्वावर चालविणेस मिळणेबाबत सदरचे पत्रात विनंती केली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०/०१/२०१०, दि.०४/०७/२०१०, दि.२६/०३/२०११, दि. २४/०७/२०११ व दि. १४/०१/२०१२ चे ठरावा नुसार मंदीर परिसरातील स्टॅाल स्थलांतर करणेबाबत, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीस खालील प्रमाणे पत्र दिलेले आहेत. परंतू त्यांनी गाळे खाली न करता आता उपरोक्त प्रमाणे मागणी केलेली आहे. सदरचे पत्रा मध्ये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटीने संदर्भीय पत्राने संस्था ही संस्थान मध्ये काम करणाऱ्या संस्थान कर्मचाऱ्यांचीच नोंदणीकृत सहकारी संस्था असून संस्था संस्थान मान्यतेने संस्थान परिसरात श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी स्नानगृह, क्लोकरुम, मोबाईल कॅमेरा क्लोकरुम, पादत्राणेगृह, कारपार्किंग, प्रसाद, पुजा साहित्य व नॉव्हेल्टी स्टोअर, होजीअरी कपड्यांचे स्टोअर, एस.टी.डी.बुथ तसेच थंडपेय व दुग्धजन्य पदार्थ विक्रीचे स्टॅाल चालवित असून त्यामध्यमातून श्री साईभक्तांना योग्य दरात उत्तमोत्तम सेवा सुविधा पुरवित आहे. त्याच बरोबर संस्थेमार्फत संस्थेच्या सभासदांना व कामगारांना त्यांचया आर्थीक गरजा भागविण्यासाठी कर्जरुपाने मोठ्या प्रमाणात अर्थ सहाय्य करत असल्याने संस्था हि संस्थेचे सभासदर व कर्मचारी यांची कामधेनु आहे असे पत्रात नमुद केले आहे.

१) जा.क्र. एसएसएस वशी-२/५७१६/१० दि.०९/०४/२०१०
२) जा.क्र. एसएसएस वशी-२/३०७५/१० दि. २९/०५/२०१०
३) जा.क्र. एसएसएस वशी-२/३९५३/१० दि.२०/०७/२०१०,
४) जा.क्र. एसएसएस वशी-विधी/१२०९०/११ दि.१४/०२/२०११,
५) जा.क्र. एसएसएस वशी- विधी /११५५/११ दि. ०१/०६/२०११,
६) जा.क्र. एसएसएस वशी- विधी /१३११/११ दि.२३/०६/२०११,

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



७) जा.क्र. एसएसएस वशी- विधी /३११२/११ दि. १७/०९/२०११,
८) जा.क्र. एसएसएस वशी-विधी /३५०६/११ दि.०४/११/२०११ ,
९) जा.क्र. एसएसएस वशी- विधी /५९६४/१२ दि. २७/०२/२०१२ ,
१०) जा.क्र. एसएसएस वशी- विधी /६२६३/१२ दि. १२/०३/२०१२
११) जा.क्र. एसएसएस वशी- विधी /७८४/१२ दि. २२/०५/२०१२
१२) जा.क्र. एसएसएस वशी- विधी /१२६२/१२ दि. २३/०६/२०१२
१३) जा.क्र. एसएसएस वशी- विधी /२३९४/१२ दि.१०/०९/२०१२ (शिर्डी पोलीस स्टेशनचे दि.०४/०८/१२ रोजीचे पत्रा नुसार)
१४) जा.क्र. एसएसएस वशी- विधी /३६१८/१३ दि.११/११/२०१३

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने दि. १०/११/२०१३ रोजीचे पत्राने मंदिर परिसरातील ६ स्टॉलचे स्थलांतर उपरोक्त ठिकाणी करणेबाबत आता तयारी दर्शविलेली आहे. तसेच दि. ३१/०५/२०१० नंतर मंदिर परिसरातील सदरच्या ६ गाळयांना / स्टॉलला पुढील मुदतवाढ देण्यात आलेली नाही.

**२)** श्री संजय भास्कर काळे यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचीका क्र. २५/२०१२ मध्ये उपस्थीत १४ मुद्यांमध्ये मंदिर परिसरातील गाळयांचा मुद्दा उपस्थीत केलेला आहे. शासनाकडून त्याबाबत नुकतेच दि. २८/१०/२०१३ चे पत्राने संस्थानने करावयाची कार्यवाही / उपाययोजना याबाबत सविस्तर विवरणपत्र देवून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीचे पेढा विक्रीबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करणेबाबत सुचीत केले आहे.

१) व्यवस्थापन समितीच्या ठरावा नुसार व मंदिर परिसरात भक्तांची जास्त गर्दी होऊ नये तसेच सुरक्षिततेच्या कारणास्तव मंदिर परिसरातील सोसायटीस देण्यात आलेले ६ स्टॉल बंद करण्यात यावीत व ते संस्थानने स्वतःच्या ताब्यात ठेवावे.
२) जुने प्रसादालय परिसरात व अन्य कोणत्याही परिसरात सोसायटीस स्टॉल्स द्यावयाचे झाल्यास जाहिरात / निविदा पध्दतीचा अवलंब करुन सर्वात जास्त रक्कमेची ऑफर स्विकारुन स्टॉल्स देण्यात यावेत.
३) सोसायटीमार्फत विक्री केल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थाची अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करुन घेणे सोसायटीस बंधनकारक करण्यात यावे.
४) मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यासाठी सोसायटीकडून अतिशय नाममात्र परवाना फी घेण्यात येत असल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होत असल्याने प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सोसायटीकडून काढून घेण्यात यावे व त्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात याव्यात.
५) मोबईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यास सोसायटीस दिल्यामुळे संस्थानचे आर्थीक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या मा.जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर व जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचा समावेश असलेल्या समितीमार्फत याबाबत सविस्तर चौकशी करण्यात यावी व त्यांच्या अहवालानुसार व शिफारशीनुसार पुढील कारवाई करण्यात यावी.
६) कर्मचाऱ्यांच्या सदर सोसायटीस संस्थानकडून वीज, पाणीपुरवठा या वा अन्य काही सुविधा पुरविल्या असल्यास त्यांचा भरणा सोसायटीने केलेला आहे किंवा कसे, याबाबतही कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करुन व संबंधितांकडून सदर रक्कमेची वसुली करुन तसा अहवाल तात्काळ राज्य शासरास सादर करावा.

उपरोक्त प्रमाणे जनहित याचीका क्र. २५/२०१२ मध्ये उपस्थीत मुद्यांबाबत संस्थानने करावयाची कार्यवाही / उपाययोजनाबाबत शासनाने कळविलेले आहे.

**३)** नविन साईभक्तनिवास इमारतीमधील गाळयांबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि. २६/०२/२०१३ रोजीचे सभेतील विषय नं. ५२ निर्णय क्र. १७२ प्रमाणे सोसायटीस वापरास दिलेले गाळे संस्थानचे वापरांत घेणे तसेच सर्व ताब्यात घेण्यात येणाऱ्या गाळयांचा वापर फक्त संस्थानसाठीच करण्यात यावा असे ठरले आहे. सदर ठरावा नंतर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सोसायटीस तोंडी व १) जा.क्र.एसएसएस वशी- विधी /६७८/२०१३ दि. १०/०५/२०१३. २) जा.क्र.एसएसएस वशी- विधी/ ९९५/२०१३ दि. ३०/०५/२०१३. ३) जा.क्र.एसएसएस वशी- विधी / ९९६/२०१३ दि. ३०/०५/२०१३. ४) जा.क्र.एसएसएस वशी- विधी / १७७३/२०१३ दि. १३/०७/२०१३. ५) जा.क्र.एसएसएस वशी- विधी/ १९९६/२०१३ दि. २९/०७/२०१३. रोजीचे पत्राने सदरचे गाळे संस्थान वापरास देणेबाबत कळविले आहे. मात्र श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने गाळे त्यावेळी खाली करुन संस्थानचे ताब्यात दिलेले नाही.

**४)** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात रिट पिटीशन नं. ६१३७/२०१२ दाखल केलेले आहे. प्रस्तुतचे रिट पिटीशन मध्ये

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मंदिर परिसरातील सोसायटीस वापरांस दिलेले ६ स्टॉल / गाळे स्थलांतरीत करु नये अशी विनंती केलेली आहे.

प्रकरणी दि.१५/०१/२०१३ रोजी रिट पिटीशनचे संदर्भात पॅरावाईज रिपोर्ट अॅड. श्री संजय चौकीदार यांचेकडे सुपूर्त केला आहे. तसेच दि. १६/०१/२०१३ रोजी पॅरावाईज रिपोर्ट सरकारी वकील श्री मोरे यांचेकडे सुपूर्त केला आहे. त्याबाबत संस्थानचे म्हणणे अॅड. चौकीदार यांनी तयार करुन दिलेनंतर दाखल करणे आहे. मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर दि. १७/०१/२०१३ रोजी मे.कोर्टने खालील प्रमाणे ऑर्डर केलेली आहे.

१) S.O. to २८th February २०१३.

४) It is clarified that no interim order is passed in the instant matter.

उपरोक्त आदेशात मे. कोर्टाने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.सोसायटीस गाळे स्थलांतरीत करणे कामी स्टे ऑर्डर दिलेली नाही.

राजेंद्र गोंदकर यांनी पी.आय.एल. १८/२०११ मध्ये प्रस्तुत ६ गाळ्यांचे संदर्भात सिव्हील अर्ज दाखल करुन ६ स्टॉल भक्तांचे सोयीचे दृष्टीने काढून टाकणेस विनंती केली आहे. याबाबत सदर स्टॉल काढून टाकणेबाबत कार्यवाही संस्थानकडून होत आहे असे दि. ११/१०/२०१३ रोजीचे शपथपत्र संस्थानने दिलेले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.सोसायटीस मंदीर परिसरातील ६ स्टॉल/ गाळे इतरत्र स्थलांतरीत करणेबाबतचे विचारार्थ सादर. सोसायटीचे स्टॉलसाठी पर्यायी व्यवस्थेचेबाबत मंदीर परिसरातील ६ स्टॉल स्थलांतरासाठी पर्यायी व्यवस्था मा.कोर्टाचे मान्यतेने १ वर्षासाठी लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर उचीत लायसन्स फी आकारुन देता येईल विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.९२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना मंदिर परिसरामध्ये चालविणेसाठी दिलेले ०६ स्टॉल्स मंदिर परिसराबाहेर स्थलांतरीत करणेत यावेत व श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी ही संस्था साईभक्तांसाठी सोयी-सुविधा पुरवित आहे, त्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून त्यांना श्री.के.व्ही. रमणी यांनी संस्थानला देणगी दिलेले १४ Kiosks खालील ठिकाणी लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर एक वर्षाचे कालावधीसाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून वापरास देणेत यावेत.**

| अ.नं. | ठिकाण | Kiosks संख्या |
|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग-१ परिसर | ४ |
| २ | साईआश्रम भाग-२ परिसर | १ |
| ३ | साई प्रसादालय परिसर | १ |
| ४ | द्वारावती निवासस्थान परिसर | २ |
| ५ | साईउद्यान परिसर | २ |
| ६ | साईप्रसाद निवासस्थान परिसर | १ |
| ७ | साईबाबा भक्तनिवासस्थान परिसर | ३ |
| | **एकूण-** | **१४** |

**तसेच, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना देण्यात येणाऱ्या Kiosks ची परवाना फी पी.डब्ल्यु.डी. विभागाकडील भुईभाडे प्रमाणे आकारणेत यावी. पी.डब्ल्यु.डी. विभागामार्फत भुईभाडे निश्चित होईपर्यंत संस्थानचे इतर अटी/ शर्तीवर प्रति महा प्रति Kiosks रु.३०००/- व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा याप्रमाणे त्यांचेकडून फी आकारणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.९२९** **मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** श्री साईबाबा संस्थानकडील सर्व निवासस्थानातील खोल्यांमध्ये साईभक्तांना हात धुण्यासाठी छोटा साबण ठेवण्यात यावा. (कार्यवाही- सर्व निवासस्थाने)

**(२)** श्री साईबाबांचे मंदिर व मंदिर परिसराचे संरक्षणासाठी C.I.S.F. चे डायरेक्टर जनरल यांचेशी यापुर्वी पत्रव्यवहार केलेला असून, त्याचा पाठपुरावा करणेत यावा. तसेच, त्यांचेमार्फत संस्थानसाठी संरक्षण यंत्रणा शक्य तेवढया लवकर कार्यान्वीत करणेबाबत कार्यवाही करणेत यावी.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



वरील निर्णय क्र. ८९० ते ९२९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्री ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (आप्पासाहेब शिंदे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| उपकार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी